# कृषिजल

एप्रिल २०१८, अंक ४, पृष्ठे ५२

## डॉ. आप्पासाहेब पवार सूक्ष्मसिंचन पुरस्कार वितरण समारंभ









"

आपल्या एकूण आर्थिक व्यवस्थेमध्ये शेतीला योग्य ते स्थान देणे आवश्यक आहे. तसे केल्यानेच भांडवली बाजारपेठांचा योजनाबद्ध विकास साधला जाईल व तो विकास परिपक्व तसेच लांबच्या पल्ल्याचा होऊन त्यांना स्थैर्य लाभेल. या नियोजनामुळेच रोजगार वाढून ७० टक्के ग्रामीण जनतेचे जीवनमान सुधारेल. त्यांची क्रयशक्ती वाढेल व त्यामुळेच सैरावैरा धावणाऱ्या भांडवली बाजारपेठा स्थिरावतील.

"

**– भवरलाल जैन**

(मुरलेलं लोणचं पृष्ठ १३–१४)

## अध्यक्षीय



**अशोक जैन**
अध्यक्ष, जैन इरिगेशन सिस्टिम्स लि.

**जगण्याची पृष्ठभूमी म्हणजे आधार. वाटचालीला चैतन्याचा गाभा तेवत ठेवणे म्हणजे आधार. आधारात पांगुळगाडा नसतो आणि मदतीचा हात ही अपेक्षित नसतो. यातले सहाय्य हे निमित्त असते. पण दोघांनी विश्वासाने हातात हात घालुन दोघांचेही हितसंबंध सांभाळीत काम करणे अभिप्रेत असते. हाच कराराच्या शेतीचा प्राण आहे. हा गाभा ज्यांना कळला त्यांच्या जीवनाची धार आसमंत होऊन कर्तृत्वाची घराणी निर्माण होत गेली. हाच खरा आधार असतो. तात्पुरते देण्याघेण्याने प्रश्न काही कायमचे सुटत नसतात. त्यासाठी निश्चित अशा ध्येयाचा, मेहनतीचा व सत्याचा मार्ग चोखाळावा लागतो तेव्हांच आधार निर्माण होऊ शकतो. तो एकतर्फी कधीच नसतो. आधारासाठी मन मोठे लागते आणि ज्याला आधार द्यायचा तो ही मोठा म्हणजे उदार असावा लागतो. असे मोठेपण कराराच्या शेतीतून आपल्याला प्राप्त होऊ शकेल.**

# पाऊले करार शेतीच्या दिशेने...

देशाची लोकसंख्या सतत वाढते आहे. जमीन मात्र आहे तेवढीच आहे. उलट शेतीची जमीन दिवसेंदिवस निरनिराळ्या कारणांसाठी वापरली जात असल्यामुळे कमी कमी होत चालली आहेत. कुटुंबातील वाटणीमुळे जमिनीचे लहान लहान तुकडे पडत चालले आहे. ८२ टक्के शेतकरी आज अल्पभूधारक म्हणजे ५ एकराच्या आतले आहेत. त्यातल्या ८० ते ९० टक्के लोकांची शेती ही पूर्णपणे पावसावर अवलंबून आहे. आठमाही किंवा बारमाही सिंचनाची सोय नसल्यामुळे या अल्पभूधारक शेतकऱ्यांना बारमाही रोजगार स्वतःच्या शेतीतून उत्पन्न होत नाही आणि रोजचा उदरनिर्वाह चालत नाही. त्यामुळे पोटाची खळगी भरण्यासाठी दुसरीकडे कामाला जावे लागते. मजुरी करावी लागते, शिवाय शेतीचे तुकडे लहान आणि ते ही विभागलेले. एका जागी सर्व शेती नाही. त्यामुळे अत्याधुनिक पद्धतीने व सर्व सोयीसुविधा निर्माण करून नविन हायटेक तंत्राची शेती करणे व स्वतः निर्यातदार बनणे शेतकऱ्याला शक्य होत नाही. इतकेच काय पण, वर्षभर खात्रीचे व विश्वासू पुरवठादार असा नावलौकीकही आजपर्यंत संपादीत करता आलेला नाही. कारण सगळी शेती पिकणे व पाणी उपलब्ध होणे हे निसर्गाच्या कृपेवरच अवलंबून आहे.

देशात किंवा परदेशात शेतमाल विकून दोन पैसे अधिकचे मिळवावयाचे असतील तर त्यासाठी मोठ्या प्रमाणात म्हणजे मालगाडी / कंटेनर भरेल इतका गुणवत्तेचा, दर्जेदार माल निर्माण करावा लागतो. छोट्या शेतकऱ्यांना हे शक्य नसल्याने दुसरा पर्याय त्यांच्यासाठी कराराच्या शेतीने (कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग) उपलब्ध करून दिला आहे. अनेक मोठमोठ्या कंपन्यांना प्रक्रियेसाठी खात्रीचा शेतीमाल लागतो. सर्व शेतमाल कंपन्या स्वतः उत्पादन करू शकत नाही. कारण तेवढी जमीन, यंत्रणा त्यांच्याकडे उपलब्ध नाही आणि आपल्या देशात जमीन राखण्यासंबंधीचा सिलींग कायदा असल्यामुळे फार मोठ्या प्रमाणावर म्हणजे हजारो एकरात जमिनी कोणालाही ठेवता येत नाही. त्यामुळे ह्या कंपन्यांना प्रक्रियेसाठी माल उपलब्ध होण्याचा चांगला सहकार्याचा मार्ग म्हणून करार शेतीकडे वळावे लागते. आमच्या जैन इरिगेशन कंपनीने २००१ पासून पांढऱ्या कांद्याच्या पिकामध्ये करार शेतीचे मॉडेल विकसित केले आहेत. त्याचा आता देशभर भरपूर प्रसार व प्रचार झालेला आहे. अनेक लोक देशाच्या वेगवेगळ्या भागात विविध पिकांवरील प्रक्रियेसाठी हे मॉडेल वापरीत आहे. अर्थात माल पुरवठादार शेतकरी आणि प्रक्रिया उद्योजक ह्या दोघांमधील परस्पर विश्वासाची व प्रेमाची आणि सहकार्याने हातात हात घालून काम करण्याची प्रवृत्ती जोपर्यंत वाढणार नाही तोवर ह्या मॉडेलला वारंवार धक्के बसत राहणार. वास्तविक लहान शेतकऱ्यांसाठी हे करार शेतीचे मॉडेल खूपच हितकारी व उपयुक्त आहे. आता आम्ही नव्याने जी मसाल्याची फॅक्टरी सुरू केली आहे त्यासाठी लागणारा माल (उदा. हिरवी व लाल मिरची, हळद, आले, जिरे, धने व लसूण इ.) हा शेतकऱ्यांशी करार करून त्यांच्याकडून घेणार आहोत. ह्या मसाला फॅक्टरीमुळे शेतकऱ्यांना नवीन पिके घेण्याचे दालन उपलब्ध झाले आहे. ह्या संधीचा त्यांनी वापर करून घेतला पाहिजे. कष्टाने दोन पैसे अधिक मिळविण्यात काहीही चूक नाही. शेतकरी हा ज्यादिवशी खात्रीचा व विश्वासू पुरवठादार बनेल आणि करार शेतीला पूरक व उत्साहवर्धक ठरतील अशी धोरणे सरकार बनवेल त्यादिवशी जगाची बाजारपेठ आपण पूर्णपणे काबिज करू शकतो. त्याकरीता आपण सारेजण ही करार शेती वाढविण्याच्या दिशेने पाऊले टाकूया.

## संपादकीय



डॉ. सुधीर भोंगळे

**दोघांनी एकमेकांना दिलेले आश्वासन, शब्द वा वचन म्हणजे करार. मग तो लेखी असो वा तोंडी. तो पाळण्याची जबाबदारी दोघांचीही असते. त्यासाठी जो काही विचार, मेहनत, कष्ट, त्याग करावा लागेल तो दोन्ही बाजूने होणे करारात अभिप्रेत असते. करार मोडणे फार सोपे असते पण त्याची तंतोतंत अंमलबजावणी करण्यासाठी दृढनिश्चय व सोशिकता लागते. दुसऱ्याच्या हिताचा विचार करण्याची सवय ही वाढीला लावावी लागते. समोरचा माणूस आपल्याही हिताचा विचार करेलच यावर विश्वास व श्रद्धा ठेवावी लागते. विचार आणि विश्वास यांच्या पायावर कराराची शेती जगभराची बाजारपेठ जिंकण्याचे स्वप्न पाहू शकते. गुणवत्तेचा व दर्जेदार आणि ग्राहकांना पाहिजे तसा माल उत्पादित करण्यात आपला शेतकरी मागे नाही पण आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत शेतीमाल निर्यातीचे युद्ध त्याला एकट्याला सक्षमपणे लढून जिंकणे शक्य नाही. त्यासाठी त्याला कंपन्यांच्या मदतीची गरज भासते. एकमेकांच्या गरजांची पूर्ती करण्यातच त्यांचे स्वत:चे आणि समाजाचे ही कल्याण आहे म्हणून ही करार शेती दिवसेंदिवस अधिकाधिक विकसीत होत जाण्याची गरज आहे. कायद्याचे चांगले पाठबळ या करार शेतीला लाभले तर जगाच्या बाजारपेठेत आपण आपले अधिराज्य निर्माण करू शकतो याची पक्की खूणगाठ मनाशी बांधा. तो दिवस लवकर उगवावा यासाठी आपण सारेजण मिळून एकजुटीने प्रयत्न करूया.**



# करार शेती

अन्नधान्यात स्वयंपूर्णता मिळविणे हे भारतीय शेती अर्थव्यवस्थेचे स्वातंत्र्यानंतरचे सुरुवातीचे एकमेव उद्दिष्ट होते. पहिल्या हरितक्रांतीच्या माध्यमातून या उद्दिष्टाची पूर्ती झाल्यानंतर आता आपण आधुनिक व्यापारी, भांडवलीप्रधान 'हायटेक' शेतीकडे ओढले जाऊ लागलो आहोत. कारण ती काळाची गरज आहे. गरज बदलाची जननी आहे. कदाचित हा नवीन बदल अनेकांना लगेचच पचेल, रुचेल, मानवेल किंवा अंगवळणी पडेल असे नाही. परंतु त्याच्याशी जुळवून घेण्याशिवाय अन्य पर्यायही शेतकऱ्यांसमोर नाहीत. खुल्या बाजारपेठेतले निर्यातीचे युद्ध तर आ वासून समोर उभे आहे. अशा वेळी दोनच पर्याय आमच्यासमोर उभे राहतात; ते म्हणजे आमच्या छोटयाशा जमिनीचा तुकडा हा मोठ्या कंपन्यांना विकून त्यांची लाखो एकराची शेती उभी राहू द्यायची का या कंपन्यांना प्रक्रिया करण्यासाठी लागणारा शेतमाल स्वत:च्या लहान लहान तुकड्यांमधून निर्माण करुन, त्यांना तो पुरवून आपल्या कुटुंबाच्या मालकीची शेती पूर्वापार चालू ठेवायची ? याचा निर्णय करण्याची वेळ येऊ घातली आहे. भारतीय शेतकऱ्यांची आजपर्यंतची मानसिकता लक्षात घेतली तर ते जमिनीचा तुकडा विकून कायमचे मजूर बनण्यापेक्षा कंपन्यांना लागणारा कच्चा शेतीमाल पुरविण्याची म्हणजे एका अर्थाने पुरवठादाराची भूमिका स्वीकारणे जास्त पसंत करतील, श्रेयस्कर मानतील कारण या संबंधीच्या व्यवस्थेचा काही एक अनुभव सहकारी व खासगी कारखानदारीच्या रुपाने किंवा अगदीच मागे जायचे झाले तर खंड किंवा कुळाने (बटई) शेती कसण्याला देण्याच्या पद्धतीतून आमच्या गाठीशी बांधला गेलेला आहे. या जुन्या अनुभवाचे नवीन थोड्या बदल व सुधारणेनंतरचे नाव 'कराराची शेती' (कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग) असे आहे.

ही कराराची शेती आम्हांला पूर्ण नवीन आहे किंवा ती आम्हाला पूर्णपणे लुटायला किंवा आमचे एकदम चांगभले करायला आलेली आहे, अशा टोकाच्या भूमिका मांडणे हे काही फार शहाणपणाचे लक्षण नाही. बाहेरच्या, सभोवतालच्या परिस्थितीचे ज्ञान व जाणीव असणारा कोणताही सुज्ञ मनुष्य अशी भूमिका घेणार नाही. कारण नव्याने जास्तीचा रोजगार पुरविण्याची ताकद ही इतर क्षेत्रांपेक्षा ज्ञान, विज्ञान व उच्च तंत्रज्ञानाने भारलेल्या आणि मोठी भांडवली गुंतवणूक असलेल्या शेतीतच आहे हे तो जाणून आहे. या आधुनिक शेतीचा यापुढच्या काळात 'करार' हा पाया तर 'विश्वास' हा पायाचा चिरा राहणार आहे, हे कायम स्मरणात ठेवावे लागून त्या दिशेने धोरणांची आखणी व उभारणी करावी लागेल. लहान, अल्प

भूधारक शेतकरी हा या कराराच्या शेतीचा केंद्रबिंदू मानला आणि सहभागीतेचे तत्त्व (पार्टनरशिप प्रोजेक्ट) वृद्धिंगत करीत राहिलो तर पुढची क्रांती कराराच्या शेतीनेच होईल याविषयी माझ्या मनात शंका नाही. आता प्रश्न आहे तो कराराची शेती येथे वृद्धिंगत कशी करायची याचा.

## पर्यायी पिकांचा विचार

सध्या बहुसंख्य शेतकरी हे ऊस, कापूस या पिकांना कंटाळलेले आहेत. पाहिजे तेवढे उत्पन्न या पिकातून त्यांना मिळत नाही. याची अनेक कारणे आहेत. त्यामुळे ते रोखीची, किफायतशीर ठरतील अशी आणि कापूस व उसापेक्षा दोन पैसे अधिक मिळवून देतील अशी पर्यायी पिके शोधण्याच्या मागे आहेत. अनेकांना यामध्ये यश येऊन टिश्यूकल्चर पद्धतीने बनविलेल्या डाळिंब, स्ट्रॉबेरी, केळीच्या रोपांची लागण, ग्रीनहाऊस किंवा हरितगृहामध्ये फुले, फळे व भाजीपाल्याचे उत्पादन, फळझाडे व शोभिवंत फुलांच्या रोपवाटिका, निर्जलीकरणासाठी लागणारा पांढरा कांदा, निर्यात व वाईनसाठी लागणारी द्राक्षे, पपईच्या दुधापासून (चिक) पपेन पावडरची निर्मिति, निरनिराळ्या प्रकारची खाद्यपेये, शीतपेये, सरबते, ज्यूसेस तसेच हवाबंद डब्यातील खाद्यपदार्थ, आयुर्वेदिक वनस्पती, सुगंधी द्रव्ये व सौंदर्य प्रसाधनांसाठी लागणारा कच्चा माल उत्पादित करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यांच्या या सर्व प्रयत्नांचे यशापयश हे प्रकिया उद्योग आणि उत्पादक यांचे परस्परसंबंध व कराराची अंमलबजावणी कशी होते यावर अवलंबून राहणार. शेतकऱ्यांची वृत्ती अनेकदा बाजारातले भाव चढले आणि कराराचा भाव कमी असेल तर करार मोडून खुल्या बाजारात माल विकण्याची असते. याउलट कंपनी कराराचा दर जास्त असेल आणि त्यापेक्षा कमी दराने खुल्या बाजारात माल मिळत असेल तर कराराची अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ करतात. या दोषारोप युद्धातून दोघांची कायमची सुटका करावयाची असेल तर दोघांनी एकमेकांना दिलेला शब्द, केलेला लेखी–तोंडी करार हा कटाक्षाने पाळणे अनिवार्य आहे. दोघांच्या सामंजस्य व व्यवहार्य वागणुकीतूनच आपपरभाव, प्रेम, विश्वास, वृद्धिंगत होणार आहे. तो एकदा का निर्माण झाला की मग कराराच्या शेतीला बाह्य बदलाचा कोणताही धोका पोहोचू शकणार नाही. यासबंधीचे एक उदाहरण जाणीवपूर्वक आपल्यासमोर येथे ठेवतो.

## विश्वासार्हता व सामंजस्य महत्वाचे

२००२ या वर्षामध्ये सुरुवातीला महाराष्ट्रातील कांद्याचे भाव पूर्णपणे कोसळले होते. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघेनासा झाला होता. त्यामुळे जागोजागी कांद्यावरील निर्यात बंदी उठवावी, सरकाने कांदा खरेदी करावा यासाठी अनेक छोटी–मोठी आंदोलने उभी राहिली होती. कांद्याचा भाव किलोला एक–दीड रुपयांच्या पलीकडे नाही अशी स्थिती होती. त्याच वेळी जळगावचा जैन उद्योग समूह त्यांच्या निर्जलीकरण प्रकल्पासाठी लागणारा पांढरा कांदा करार केल्याप्रमाणे शेतकऱ्यांना किलोला तीन रुपये भाव देऊन त्यांच्याकडून खरेदी करत होता. दिलेल्या शब्दाला जागणे ही जी वृत्ती या जैन उद्योगसमूहाची आहे ती अन्य उद्योगसमूहांमध्ये सुद्धा वाढीला लागली पाहिजे. हा जैन उद्योगसमूह १९७८ पासून भाव ठरवून देऊन बाराशे एकरातील शेतकऱ्यांकडून पपेनसाठी लागणारा पपईचा चिक याच करार पद्धतीने खरेदी करत होता. करार लेखी आहे, तोंडी आहे किंवा नाही, यापेक्षा तो पाळण्याला अधिक महत्व आहे. अशी विश्वासार्हता किती प्रमाणात लाभते यावर कराराच्या शेतीचे

## भाऊंच्या दूरदृष्टीचा विहार पपईच्या दूधासाठी करार

कराराच्या शेतीसंबंधीचे जे तत्वज्ञान व व्यापक वैचारिक बैठक जैन इरिगेशनने उभी केली त्याला आता ४० वर्षे झाली आहेत. पपेन निर्मितीच्या धंद्यातून श्री. भवरलाल जैन यांनी जो कराराच्या शेती विचारांचा पाया घातला त्यामुळे देशातल्या प्रक्रिया कारखानदारीला एक नवी दिशा व नवा आधार मिळाला. १९७८ साली मोठ्या भाऊंनी पपईच्या प्रति किलो दुधाला किमान २७ रू. आणि बाजारात त्यापेक्षा अधिक भाव झाला तर जास्तीच्या दराची रक्कम १५ दिवसात देण्याची व्यवस्था उभी केली. त्यामुळे १९७८ ते १९८२ या काळात खान्देशात व आसपासच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर पपईची लागवड झाली. बॅकांनीही प्राधान्याने पपई पिकाला कर्ज दिले. पपईच्या दुधापासून जी पेपेन नावची पावडर बनत असे ती निर्यात होत असे. औषध निर्मीती च्या व्यवसायात आणि बीफ शिजविण्यासाठी या पावडरचा मोठ्या प्रमाणात वापर होत असे. पपईला ब्लेडने बारीक चीर पाडल्यानंतर जे दूध बाहेर पडे ते १२ तासाच्या आत जळगाव च्या फॅक्टरीमध्ये आणण्यासाठी त्याकाळी स्वतंत्र यंत्रणा उभी केली होती. दूध काढून घेतलेल्या पपईचा टुटी फ्रुटी बनविण्यासाठी वापर करीत. त्यामुळे कंपनी ही कच्ची पपई देखील शेतकऱ्यांकडून निश्चित हमीभाव देऊन विकत घेत असे. म्हणजे शेतकऱ्याला पपईचे दूध आणि कच्ची पपई या दोन्हीचेही पैसे मिळत. शिवाय पपई पिकात कांदा व मिरची ही आंतरपिके घेण्यासंबंधी जैन कंपनीचे तज्ज्ञ शेतकऱ्यांना मार्गदर्शन करीत. पपईचे अधिकाधिक उत्पादन शेतकऱ्यांना मिळावे यासाठी कंपनीने त्यावेळी तामिळनाडूमधील कोईंबतुर विद्यापीठाकडून पपईचे सीओ-टू या नवीन जातीचे शास्त्रशुध्द बियाणे तयार करून घेतले होते व ना नफा-ना तोटा या तत्वावर ते शेतकऱ्यांना दिले जात असे. जळगाव, धुळे, नंदुरबार, बुलढाणा गुजरात मध्यप्रदेश येथे एकूण १३५ पपई दूध खरेदी केंद्रे होती. केंद्रांवरच केमिस्ट दुधाची तपासणी करीत. या पेपेन निर्मिती उद्योगाने शेतकऱ्यांना जो भरभक्कम आधार त्याकाळी दिला त्याची आठवण आजही शेतकरी आवर्जून काढतात आणि करार शेतीच्या व्यापक तत्वज्ञानाची चौकट उभी करणारा शेती कारखानदारीच्या क्षेत्रातला अध्वर्यू म्हणून मोठ्या भाऊंचा आदराने उल्लेख करतात. तेव्हा भाऊ काळाच्या किती पुढे होते याचे नकळत दर्शन होते.

यशापयश अवलंबून राहणार आहे.

विश्वासार्हतेबरोबरच सामंजस्य आणि भागीदारी हे मुद्दे देखील खूप महत्वाचे आहेत. कराराच्या शेतीत बियाण्यांचा पुरवठा हा अत्यंत कळीचा मुद्दा आहे. किंबहुना बियाणे चांगले-वाईट लागण्याच्या हिशोबावरुनच बरेच तंटेबखेडे उद्‌भवतात. वास्तविक निसर्ग हा कुणाच्या हातात नसतो. निसर्गाची अवकृपा होऊन कंपनीचे नुकसान झाले तर मालक स्वत: नुकसान सोसतो. त्याची जबाबदारी दुसऱ्यांवर ढकलत नाही. पण शेतकरी निसर्गामुळे किंवा स्वत:च्या चुकीमुळे किंवा बियाणे चांगले लागले नाही म्हणून जर नुकसान झाले तर लगेच ग्राहक मंचाकडे किंवा न्यायालयात जाऊन कंपनीकडून नुकसानभरपाई मागतो. अनेकदा सरकारही हंपायरची भूमिका न घेता शेतकरीधार्जिणे होऊन कंपन्यांच्या विरुद्ध भूमिका घेते. यामुळे कराराची शेती वेगाने वाढत नाही. वास्तविक सरकारने तटस्थ राहून समझोता घडवून आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तशी त्यांच्याकडून अपेक्षा आहे. किंबहुना राज्य सरकारने स्वत: कराराची शेती करण्यास पुढाकार घेतला असता आणि विदर्भातील संत्राप्रक्रिया उद्योगाला लागणाऱ्या संत्र्याच्या जाती विकसीत करण्याकडे लक्ष दिले असते तर कोटयावधी रुपये घालून मोर्शी व काटोल येथे उभे केलेले संत्राप्रकल्प बंद पडले नसते. पण ती दृष्टी सरकारला प्राप्त झाली नाही. कोणलाही ते प्रकल्प चालवावेत असे वाटले नाही, हे संत्रा उत्पादकांचे दुर्भाग्य आहे. सुदैवाने या करार पद्धतीच्या शेतीचे महत्व दिवसेंदिवस शेतकऱ्यांना आता पटू लागले आहे हे शुभचिन्ह आहे.

## जैन इरिगेशनची कांदा खरेदी



जळगावातील जैन इरिगेशन कंपनी खरीप व रब्बी अशा दोन हंगामात मिळून म्हणजे साधारणपणे आठ महिन्यात दीड लाख टन पांढऱ्या कांद्यावर प्रक्रिया करते. हा सर्व कांदा जळगाव व धुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांशी करार करून त्यांच्याकडून विकत घेतला जातो. जवळपास अकरा हजार एकरवरचा कांदा दरवर्षी कंपनी या करार पद्धतीने विकत घेते. १५ जुलै ते १५ नोव्हेंबर हे चार महिने कांदा प्रक्रिया प्रकल्प बंद असतो. खरीपात लागवडीसाठी कंपनी शेतकऱ्यांना जेव्ही-५ आणि रब्बी हंगामात लागवडीसाठी जेव्ही-१२ हे बियाणे देते. खरीपाचे एकरी सरासरी सात टन तर रब्बीचे दहा टन उत्पादन येते. कांदे भरण्यासाठी कंपनी शेतकऱ्यांना चाळीस किलोची गोणी देते. ही गोणी तीस ते पस्तीस रूपयांची असते. मात्र ती शेतकऱ्यांना विकत न देता कांदा भरून देण्याच्या परत बोलीवर दिली जाते. एकरी दहा टन उत्पादन झाल्यास तो कांदा भरण्यासाठी अडीचशे गोण्या लागतात. म्हणजे सात हजार पाचशे रूपयांच्या गोण्या कंपनी शेतकऱ्यांना मोफत देते. त्यांचा तो खर्च वाचतो. शिवाय कंपनीने कांदा बियाणे पेरणी यंत्र विकसीत केले आहे. त्याचा वापर करून बियाणे पेरले तर रोपे पुर्नलागवडीचा एकरी पाच ते सहा हजार रू. खर्च वाचतो. एका यंत्राने एका बैलजोडीच्या सहाय्याने दोन एकर क्षेत्रात बियाणे पेरायला सुमारे तीन तास लागतात म्हणजे दिवसभरात एका यंत्राने पाच एकर क्षेत्रावर कांदा पेरणी होऊ शकते.

## उत्पादनांचे वैविध्यीकरण

खुली अर्थव्यवस्था, मुक्त बाजारपेठ आणि गॅट करारातला आपला सहभाग यामुळे मालाची मागणी, आवक-जावक, वाहतूक वाढणार आहे. पण त्याच वेळी हा पुरवठा कायम खात्रीचा कसा राहील याकडेही लक्ष दिले जाणार आहे. हायटेक पद्धतीच्या शेतीतून तयार झालेल्या या मालाचा उत्पादनखर्च हा यापुढच्या काळात अव्वाच्या सव्वा होणार आहे. सबसिडीचे धोरण, ती कमी होत जाणे, निविष्टा-पाणी-वीज यांचे दर चढते राहणे, बी-बियाण्यांच्या जाती व त्यांच्या संशोधनाच्या पेटंटबद्दल द्यावी लागणारी रॉयल्टी, जाहिरात आणि चढते कर व तत्सम खर्च लक्षात घेतले तर कच्च्या किंवा पक्क्या प्रक्रियाकृत मालाच्या किंमती व उत्पादनखर्च भविष्यात कमी राहण्याची सुतराम शक्यता दिसत नाही. हायटेक शेतीसाठी अत्यावश्यक असलेले तंत्रज्ञान, पाणी व्यवस्थापनाची ठिबक सिंचनासारखी आधुनिक व इतर अत्यावश्यक सोयी-सुविधा शेतकऱ्यांना पुरविण्याचे काम कंपन्यांनाच करावे लागते. त्यामुळे सतत खर्चवृद्धीत भर पडत जाणार आहे. अशा वेळी नवीन पिकातून किंवा जुन्या पिकांच्या नवीन सुधारित वा संकरित जाती स्वीकारुन आपल्याला निश्चित प्राप्ती होईल असा विश्वास शेतकऱ्याला वाटला पाहिजे. येथे कराराच्या शेतीची भूमिका महत्वाची आहे. शेतकऱ्याने उत्पादित केलेल्या मालाची उत्तम पद्धतीने विक्री करण्याची जबाबदारी स्वीकारण्यास जिथे लोक किंवा संस्था पुढे येतील तिथे शेतीमाल उत्पादनाचे वैविध्यीकरण (डायव्हर्सिफिकेशन) अधिक जोमाने होऊन पाहिजे त्या जातीचा व पाहिजे तेवढ्या प्रमाणात पुरवठा होऊ शकेल. लहान शेतकरी सुद्धा जागतिकीकरणाच्या निर्यात युद्धात मजबुतीने उभा राहू शकेल. यामुळे एकाच मोठ्या जमीनदार किंवा बागायतदाराला सर्व पैसे मिळण्यापेक्षा श्रीमंती लहान लहान शेतकऱ्यात वाटली जाईल. त्यांचे आर्थिक जीवनमान उंचावून न्याय व समता प्रस्थापित होण्यास काही प्रमाणात मदत

होईल. आज शेतकऱ्यांची सर्वात मोठी समस्या माल विक्रीची आहे. माल कोठे, कसा विकावा याचे तंत्र त्याला सापडत नसल्यामुळे तो हताश होऊन नावीन्याचा स्वीकार करायला लगेच तयार होत नाही. कराराच्या शेतीमुळे माल विक्रीची शेतकऱ्याची अडचण पूर्णपणे दूर होणार असल्यामुळे फळबागांच्या वाढत्या क्षेत्राचे योग्य पद्धतीने व्यवस्थापन करुन मालाची विल्हेवाट लावणे सहज शक्य होणार आहे. मालाचे उत्पादन करण्यात किंवा नवीन तंत्र स्वीकारण्यात आम्ही इतरांपेक्षा मागे नाही हे अनेक प्रयोगांतून शेतकऱ्यांनी सिद्ध करुन दाखविले आहे. फक्त या मालाची देशभर वा जगभर विक्री करण्यात, कुशलतेने त्याची विल्हेवाट लावण्यात मदत व्हावी अशी येथल्या शेतकऱ्यांची अपेक्षा आहे. कराराच्या शेतीमध्ये कंपनी ही माल खरेदी करुन त्याची निर्यात किंवा प्रक्रिया करणार असल्यामुळे विक्रीच्या प्रश्नातून शेतकऱ्यांची सोडवणूक होऊ शकते. त्या जबाबदारीचा भार शेतकऱ्यावर पडत नसल्यामुळे आपले संपूर्ण लक्ष तो उत्पादित मालाचा दर्जा व उत्पादकता वाढविण्यासाठी केंद्रित करु शकतो.

## कायदा व न्यायालयाची भूमिका

कराराच्या शेतीला कायद्याच्या तत्वज्ञानाचा आधार व पाठिंबा मिळू शकला तर ही पद्धती चांगले बाळसे धरुन वाढीस लागेल. पण न्यायालयाचा दृष्टीकोन अनेकदा पूर्वग्रहदूषित व कंपन्यांकडे संशयी वृत्तीने पाहण्याचा असल्यामुळे कराराची पारदर्शकता लोप पावत चाललेली आहे. पुरवठादार शेतकरी खरा आणि उद्योजक खोटा या ठाम समीकरणामुळे अनेकदा या शेतीचा सिद्धांत फलद्रूप होत नाही. इतकेच नाही तर कायद्याची चाकोरी अत्यंत गुंतागुंतीची, अकार्यक्षम, खर्चिक आणि वेळखाऊ असल्यामुळे शक्यतो न्यायालयाची पायरी चढण्याची वेळ आपल्यावर येऊ नये म्हणून कराराचा लेखी मसुदा तयार करण्याकडे उद्योजकांचा कल किंवा ओढा नसतो. परिणामी व्यवहारात अधिक पारदर्शकता, खुलेपणा येत नाही. त्यामुळे संशय, अविश्वास बळावत जाऊन दुजाभाव वाढीला लागतो. हातचे काही राखून ठेवण्याची प्रवृत्ती मग दोघांकडूनही जोपासली जाते. दोघांचाही विकास थांबतो. तेव्हां न्यायालयाची भूमिका सुद्धा रक्ताशिवाय शस्त्रक्रिया अशीच असली पाहिजे. परंतु अनेकदा न्यायालये टोकाची भूमिका घेऊन 'एवढ्या मोठ्या कारखान्याने एका शेतकऱ्यास नुकसान भरपाई दिली तर काय फरक पडतो' असे विधान व जबरदस्ती करतात तेव्हा मोठी गोंधळाची व अडचणीची परिस्थिती निर्माण होते.

कारण एकाला लागू झालेला न्याय हा इतरांनाही लागू होत असल्याने कंपनी किंवा कारखान्याचे कुठल्याही क्षणी दिवाळे वाजू शकते, इतका व्यापक परिणाम त्या निर्णयाचा होतो हे न्यायालयांच्या लक्षात येत नाही असे थोडेच आहे! पण व्यवहार्य भूमिका घेण्याची मानसिकता हा अचूक न्यायदानाच्या प्रक्रियेतला एक अंगभूत घटक आहे असे वळण न्यायाला लावण्यात अजूनपर्यंत तरी आपल्याला यश आलेले नाही. ते ज्या दिवशी येईल तो देशाच्या दृष्टीने सुदिन म्हणावा लागेल. आमचे आजचे कायद्याचे तत्वज्ञान हे कराराची शेती वृद्धिंगत करायला फारसे प्रोत्साहक, प्रेरक आणि पाठिंबा देणारे असे दिसत नाही, तसे वाटत नाही. यासाठी कायद्याची रचना मुळातूनच बदलून अनुभवाची पार्श्वभूमी व विकासाच्या दृष्टीची जोड त्याला द्यावी लागेल. सबंध देशाचे यासाठी धोरण ठरवावे लागेल. पण शेती हा विषय राज्य सरकारांच्या अखत्यारीत असल्यामुळे देशव्यापी एकच धोरण निश्चित करणे कठीण होते. प्रत्येक राज्यातले सत्तेवर असणारे त्या त्या वेळचे सरकार त्यांच्या

## विश्वास हीच मोठी कमाई

कांदा खरेदीचे जैन इरिगेशनचे करार शेतीचे मॉडेल आता सज्ञान झाले आहे. त्याने वयाची १८ वर्ष पूर्ण केली आहेत. कंपनीचे संस्थापक अध्यक्ष भवरलालजी जैन यांच्या संकल्पनेतून २००१ मध्ये हे कांदा खरेदीचे मॉडेल प्रत्यक्ष कृतीत उतरले आहे. त्यात वेळोवेळी सुधारणा व बदल होत आजचे अद्ययावत, अचूक व समन्याय्यी अशा प्रकारचे मॉडेल तयार झाले आहे. हे मॉडेल आता निरनिराळ्या राज्यातील अनेक कंपन्यांनी बटाटा, भेंडी, टोमॅटो, द्राक्षे या पिकांच्या खरेदीसाठीही वापरात आणले आहे. या कांदा करार शेतीमुळे धुळे आणि जळगांव या दोन जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फायदा झाला आहे. अनेकदा कांद्याचे भाव चढायला लागले की सरकार लगेच निर्यातबंदी जाहीर करते. त्यामुळे त्वरीत भाव कोसळतात. कांद्याच्या दरामध्ये हा सतत चढ-उतार चालू असल्यामुळे शेतकरी कायम चिंतेत व संभ्रमावस्थेत आणि आता आंदोलनाच्या तयारीत असतो. परंतु पांढरा कांदा उत्पादन करणाऱ्या व जैन कंपनीशी करार केलेल्या शेतकऱ्यांना दराची फारशी चिंता नसते. कारण कंपनीचे भावाचे पक्के पाठबळ त्यांच्या पाठीशी उभे असते. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये कंपनी बद्दल प्रचंड आत्मियता व प्रेम आहे. म्हणूनच गेल्या १८ वर्षात एकच वाद झाला होता. त्यानंतर दरावरून कधीही असा प्रसंग उद्भवला नाही. कंपनीने शेतकऱ्यांचा हा जो विश्वास मिळविला तीच भाऊंच्या आयुष्यातली मोठी कमाई आहे.

सोयी व लहरीनुसार धोरण ठरवित असल्याने व त्यात सातत्याने बदल होत असल्याने आणि दीर्घकालीन ठाम एकात्मिक धोरणाचे फायदे अर्थव्यवस्थेला मिळत नसल्याने सारे जण आलटून पालटून गटांगळ्या खात राहतात.

## लुटीची मानसिकता

बऱ्याचदा लोकांचीही मानसिकता उद्योगधंदे वाढावेत, ते मजबुतीने उभे राहावेत अशा प्रकारची नसते. समोरचा उद्योग मोठा आहे, त्याला लुटा, त्याची कोंडी करा, विकासाची वाट रोखा असे क्षुद्र हेतु समोर ठेवून वाटेत काट्याकुट्यांची आणि आडकाठ्यांची पेरणी केली जाते. पंजाबात पेप्सीने टोमॅटोवर प्रक्रिया करणारा जो भव्यदिव्य प्रकल्प उभा केला होता तो फार काळ तग न धरता लगेचच बंद पडला हे त्याचेच उदाहरण आहे. पेप्सीसारखी बहुराष्ट्रीय कंपनी जिथे तग धरु शकली नाही तिथे बारीक लुंग्यासुंग्यांचे काय होईल याचा विचार सुद्धा करणे अवघड आहे. असे असले तरीही थोड्या प्रयत्नानंतर जर एकमेकांचा विश्वास संपादन करण्यात दोघेही यशस्वी झाले तर कारखाने उत्तम पद्धतीने चालतात याची बंगलोरमधील ग्लोबलग्रीन, जळगांवमधील जैन इरिगेशन (फार्म फ्रेश), टाटांची रॅलीज, बिर्लांची झुआरी यासारखी कितीतरी उदाहरणे आहेत. ग्लोबलग्रीनला गेल्या १५ वर्षांपासून बारा हजार छोटे शेतकरी काकडी, बेबीकॉर्न, मिरची, पांढरा कांदा यांसारखा भाजीपाला पुरविताहेत. कर्नाटक सरकारने कराराची शेती आपल्या राज्यात वाढीला लागावी म्हणून अनेक कंपन्यांना बोलावून घेतले. वाद निर्माण झाला तर स्वत: मध्यस्थाची भूमिका करण्याचे मान्य केले. इतकेच नव्हे तर कंपन्यांना यासाठी खास सवलती देऊन कृषिविस्तार यंत्रणेमार्फत शेतकऱ्यांमध्ये अशा प्रकारच्या शेतीसंबंधी जागृती वाढीला लावण्याचे काम चालविले आहे. महाराष्ट्राने यापासून बरेच काही शिकण्यासारखे आहे.

## शेतकऱ्यांशी बांधिलकीचे मॉडेल

शेती व शेतकऱ्यांशी बांधिलकी असेल, त्यांच्या उन्नतीची आस व तळमळ असेल तर कारखान्याला कितीही अडचणी आल्या, तोटा आला, तरी तो आपल्या मूळ ध्येयापासून ढळत नाही, याचे जळगावचा कांदा प्रकल्प हे चांगले गाजलेले आदर्श उदाहरण असल्यामुळे ते जाणीवपूर्वक तेथे चार-पाच दिवस राहून अभ्यासले. तेव्हां लक्षात असे आले की १९९६-९७ पासून जळगाव येथे पांढरा कांदा निर्जलीकरणाचा प्रकल्प जैन उद्योगसमूहातर्फे चालविला जात आहे. या प्रकल्पात मार्च २००२ पर्यंत घसारा मिळून एकूण संचित तोटा ५० कोटींच्या घरात गेला. तरी देखील करार करुन व प्रसंगी खुल्या बाजारातून मिळेल त्या दराने पांढरा कांदा निर्जलीकरणाचे दोन कारखाने या जैन उद्योगसमूहाने चालवायला घेऊन यशस्वीपणे पुन्हा सुरु केले आहेत. हे घडू शकले ते केवळ रोगाचे वेळीच निदान झाले म्हणून. कंपनीने स्वत: पांढऱ्या कांद्याच्या योग्य अशा जाती विकसीत करण्याचा कार्यक्रम हाती घेऊन तो युद्ध पातळीवर यशस्वीपणे राबविला. प्रसंगी परदेशात पांढऱ्या कांद्याचे बियाणे स्वत: तयार केले. प्रक्रियेसाठी पांढरा कांदा लागत असल्याने कंपन्या



## दराचा मुद्दा सर्वाधिक महत्वाचा

कराराच्या शेतीमध्ये कंपनी कोणत्या दराने माल खरेदी करणार? आणि या दरात चढउतार झाले तर त्याबाबत कंपनीचे धोरण काय राहणार? हा सर्वात महत्वाचा मुद्दा असतो. शेतकऱ्याला जास्त भाव मिळावा तर कंपनीला कमी भावात म्हणजे त्यांनी हिशेब केलेल्या रास्त दरात माल मिळावा अशी अपेक्षा असते. या दोघांच्याही अपेक्षा पूर्णपणे एकमेकांच्या विरूद्ध आहेत. त्यामुळे त्यांच्यात समन्वय घातल्याशिवाय ही कराराची शेती वाढू शकत नाही आणि उभी ही राहू शकत नाही. त्यातही अधिक बारकाईने पाहिले तर आपल्या असे लक्षात येईल की, बाजारात जेव्हा एखाद्या मालाचे भाव एकदम पडतात किंवा करार भावापेक्षा कमी होतात तेव्हा शेतकऱ्यांची अपेक्षा करार भावाची किंमत मिळावी अशी असते. आणि कराराच्या किंमतीपेक्षा बाजारातला दर अधिक झाला तर शेतकऱ्याला चालू बाजार भावाप्रमाणे मालाला किंमत मिळावी अशी अपेक्षा असते. या दोन्हीतला सुवर्णमध्य साधण्यासाठी कंपन्यांनी त्या दिवशीच्या सरासरी भावाची संकल्पना विकसीत केली आहे. म्हणजे उदा. जैन इरिगेशन कंपनी करार केलेल्या शेतकऱ्यांकडून पांढरा कांदा साडेपाच रू. किलो या दराने खरेदी करते. बाजारात त्यापेक्षा भाव जास्त झाला तर दिवसभरातला सरासरी दर कंपनी शेतकऱ्याला देते. दोघेही एकमेकांचे नुकसान होऊ नये याकडे बारकाईने लक्ष देतात. एकमेकां सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ। या तत्वाप्रमाणे व न्यायाने जर काम होत राहीले तर कराराची शेती खुप मोठ्या प्रमाणावर विकसीत होऊ शकते. मात्र त्यासाठी शेतकरी आणि कंपनी या दोघांचाही एकमेकांवर विश्वास पाहिजे आणि दोघांनी परस्परांचे हितसंबंध सांभाळण्याची काळजी घेतली पाहिजे. यातच दोघांचे ही कल्याण आहे.

# प्रवृत्ती बदलाचे आव्हान

पंजाबमध्ये एका बहुराष्ट्रीय कंपनीने वीस वर्षांपूर्वी टोमॅटोवर प्रक्रिया करणारा मोठा कारखाना काढला होता. त्यासाठी शेतकऱ्यांबरोबर कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगचा करारही करण्यात आला होता. मालाचा लगेच उठाव होतो आहे आणि भावाची ही हमी आहे म्हणून खूप शेतकऱ्यांनी टोमॅटोचे पिक लावले. परिणामी उत्पादन चांगले वाढले. लगेच दुसरा एक प्रक्रिया कारखाना तिथेच सुरू झाला. शेतकऱ्यांनी त्या कंपनीला माल दिला. त्यामुळे बहुराष्ट्रीय कंपनीला माल मिळेनासा झाला. बरीचशी जीवघेणी स्पर्धा झाली. पुरेसा माल मिळेना व तोटा वाढायला लागला. मग त्या बहुराष्ट्रीय कंपनीने कारखाना बंद करून टाकला. कराराची शेती अजूनही आमच्याकडे फारसे बाळसे धरताना दिसत नाही याचे मुळ शेतकरी आणि कारखानदार यांच्या एकमेकांवरील अविश्वास व लोभी स्वभावात आहे. या दोन्ही प्रवृत्ती बदलणे हे कठीण काम आहे. पण ते प्रयत्नपूर्वक करावे लागेल. त्याचवेळी प्रक्रियेसाठी अनुकूल होतील अशा पिकाच्या जातींचे संशोधन व वापर वाढायला हवा. पंजाबात सुरूवातीला चौरा नावाची टोमॅटोची जात त्यांनी लावली. फळ लांबट होते. दिसायला आकर्षक नव्हते. पण प्रक्रियेला परवडेल असे वाटले म्हणून प्रक्रियेचा प्रकल्प टाकला. पण ते परवडेनासे झाले.त्यामुळे या बहुराष्ट्रीय कंपन्यानी त्यांचे प्रकल्प भारतातील एका मोठ्या कंपनीला विकून टाकले. पण त्यांना ही ते प्रकल्प चालविणे जमले नाही. एका कंपनीने मात्र दुरदृष्टी वापरून दुधाच्या प्रकल्पात सुधारणा केल्या आणि ९० ते १२० दिवस टोमॅटो पेस्ट ते त्या प्रकल्पात बनवून पुढे दुध व पेस्ट हे दोन्ही पदार्थ निर्यातीसाठी पुरवठा करू लागले. यासाठी त्यांनी कराराची शेती विकसीत केली. थायलंड आणि मलेशियाने प्रक्रियेसाठी हेच केले. आपल्याकडे मात्र आयात-निर्यात धोरणात सातत्य नसल्यामुळे त्याचा परिणाम करार शेती व प्रक्रिया कारखानदारी या दोघांवरही होतांना दिसत आहे.

त्याच्या शोधात आहेत आणि शेतकरी लाल कांदा लावण्याच्या पाठीमागे आहे. हे चित्र बदलायचे असेल तर शेतकऱ्यांमध्ये खूप जागृती आणावी लागेल. सामंजस्य, विश्वास वाढवावा लागेल. यात दोघांचेही कल्याण आहे. जैन कंपनीने या खरीप व रब्बी हंगामात पांढरा कांदा पुरविणाऱ्या शेतकऱ्यांना किलोला साडेपाच रुपये हमीभाव जाहीर केलेला आहे. लोकांचा त्यामुळे पांढरा कांदा लागणीकडे ओढा वाढतो आहे. कच्च्या मालाची उपलब्धता व दर माफक राहिले आणि निर्यात बाजारपेठेत बहुराष्ट्रीय कंपन्यांनी मुद्दाम होऊन भाव तोडले नाही तर येत्या पाच वर्षात जैन कंपनीला प्रक्रिया उद्योगात आलेला संपूर्ण तोटा भरून निघू शकेल असा विश्वास २००३ मध्ये त्यावेळी चेअरमन भवरलाल जैन यांनी व्यक्त केला होता. हे सगळे महाभारत झाले कसे व का याची कहाणी चित्तथरारक असली तरीही केवळ शेतकऱ्यांसाठी बांधिलकी, प्रेम यामुळेच हा उद्योगसमूह अनंत अडचणींवर मात करुन, पारदर्शक पद्धतीने काम करुन,सर्वांना विश्वासात घेऊन पुन्हा मजबुतीने उभा राहू शकला हे सत्य आहे.

## जमिनीवरचे सीलिंग

कराराच्या शेतीमुळे मध्यस्थ वा दलाल यांचे उच्चाटन होऊन उत्पादक शेतकरी व प्रक्रिया कारखानदार यांचा थेट संबंध प्रस्थापित होऊ शकतो. त्यामुळे कारखान्याला कोणत्या प्रतीचा, दर्जाचा, कशा प्रकारचा, किती प्रमाणात माल केव्हा हवा याची माहिती सरळपणे उत्पादकांना मिळते. त्यामुळे बियाण्याच्या पेरणीपासून किंवा रोपेलागणीपासून कापणीची तारीख निश्चित करण्यापर्यंतचा सर्व अंदाज बांधून शेतकऱ्याला त्याप्रमाणे नियोजन करता येते. उद्योगांनाही केव्हांपासून माल मिळणार आहे याचा अंदाज असल्याने बाजारपेठेवर फार अवलंबून राहावे लागत नाही. मध्यस्थांचे उच्चाटन झाल्यामुळे शेतकऱ्यांना जास्तीत जास्त किंमतीतला वाटा मिळून कारखानदारांनाही रास्त दरात कच्चा माल मिळतो. ग्राहकांनाही वाजवी दरात पक्का माल मिळू शकतो. विशेषत: लघु व मध्यम उद्योगात तरी हे घडतेच. मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये सर्वच खर्च अवाढव्य असतात. विक्री व जाहिरातीसाठी केले जाणारे खर्च प्रचंड असतात. त्यामुळे त्यांच्या मालाच्या किंमती अव्वाच्या सव्वा असतात. रुपयाचा माल पाच रुपयाला विकला जातो पण ब्रॅण्डचा हव्यास असल्यामुळे तशी आवड असणारा वर्ग हा महागडा माल खरेदी करणे पसंत करतो. असा वर्ग जगभर वाढत असल्यामुळे निर्यातीसाठी कराव्या लागणाऱ्या उत्पादनाकरिता कराराची शेती करणे अपरिहार्य आहे. कारण शेत जमिनीवरचे सिलींग अद्याप उठलेले नसल्यामुळे भारतात आजतरी लाखो एकर शेत जमिनीची मालकी असलेली कंपनी अस्तित्वात नाही. शेत जमिनीवरचे सिलींग आज ना उद्या कधी तरी उठवावेच लागेल. कंपन्याची शेती सुरू करावी लागेल. तोपर्यंत निर्यात बाजारपेठ हातातली जाऊ नये आणि आमच्या देशांतर्गत बाजारपेठेत परकीय पुरवठादारांचा शिरकाव होऊ नये याकरिता तरी कराराच्या शेतीची कास आम्हांला धरावीच लागेल. ही शेती राष्ट्राला वर्धिष्णूतेकडे निश्चितच नेईल याविषयी शंका नको.




नाशिक जिल्ह्यातील चांदवडचे प्रगतशिल शेतकरी श्री. अविनाश मनोहर पाटोळे आणि त्यांच्या पत्नी सौ.रश्मी पाटोळे यांना २०१६ सालचा पद्मश्री डॉ. आप्पासाहेब पवार सुक्ष्मसिंचन ना.धों. महानोर, बबनराव लोणीकर, एकनाथ खडसे, भाऊसाहेब फुंडकर, अशोक जैन, गिरीश महाजन, चंद्रशेखर बावनकुळे, सुरेश जैन, गुलाबराव पाटील, डॉ. सतीश पाटील, उल्हास पाटील, डॉ. शंकरराव मगर

### भवरलालजी वरून फणसासारखे पण अंत:करणात प्रेमाचा ओलावा

# शेतीचा सुसंवाद नविन हायटेक तंत्राशी हवा!

## खासदार श्री. शरद पवार यांचे विचार




कृषितंत्र पुरस्कार श्री. शरद पवार, श्री. चंद्रकांत पाटील प्रदान करताना. शेजारी (डावीकडून) उज्वला पाटील, अनिल जैन, हरिभाऊ जावळे, रक्षा खडसे, संजय सावकारे, गुणवंतराव सरोदे, दलिचंद जैन, पाठीमागे – दत्तात्रय कराळे, किशोर राजेनिंबाळकर, गुरूमुख जगवानी, शिरीष चौधरी, राजूमामा भोळे, चंदू पटेल,चंद्रकांत सोनवणे, ललित कोल्हे,

जळगाव येथील जैन इरिगेशन सिस्टिम्स लि.च्या वतीने सूक्ष्म सिंचनाच्या क्षेत्रात प्रसार व प्रचाराचे काम करणाऱ्या व्यक्तीला पद्मश्री डॉ.बआप्पासाहेब पवार सूक्ष्मसिंचन पुरस्कार देऊन गेल्या १८ वर्षांपासून गौरविण्यात येत आहे. यावर्षीचा हा पुरस्कार चांदवड तालुक्यातील वडनेर भैरवचे प्रगतशिल शेतकरी श्री. अविनाश मनोहर पाटोळे यांना श्री. शरद पवार व श्री. चंद्रकांत पाटील व ना. श्री. पांडुरंग फुंडकर यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. त्या समारंभात श्री. शरद पवार यांनी केलेले भाषण.



जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन हे खादीचा सुती हार घालून शरद पवार यांचे स्वागत करताना

या कार्यक्रमाच्या निमित्तानं या ठिकाणी अगत्यानं उपस्थित आहेत ते महाराष्ट्राचे कृषिमंत्री पांडुरंगराव फुंडकर, ज्यांचे आताच आपण विचार या ठिकाणी ऐकले ते पाणी पुरवठा मंत्री बबनरावजी लोणीकर, आपल्या जिल्ह्याचे मंत्री मंडळाचे सदस्य ना. गुलाबराव पाटील, आज या ठिकाणी उपस्थित असलेले मराठी भाषेतलेच सर्वश्रेष्ठ कवी ना.धों. महानोर, महाराष्ट्राच्या विधानसभेचे माजी अध्यक्ष श्री. अरूणभाई गुजराथी, सुरेशदादा जैन, या ठिकाणी उपस्थित असलेले विधानसभेचे सन्माननीय सभासद डॉ. सतिष पाटील, चोपड्याचे आमदार श्री. सोनवणे, नगरीचे प्रथम नागरीक मा. महापौर श्री. ललीत कोल्हे, ज्यांचा आपण आज या ठिकाणी सन्मान करणार आहात ते श्री आणि सौ अविनाश पाटोळे, भवरलालजींच्या नंतर सामाजिक भान ठेवून जैन उद्योगासंबंधीची वाटचाल प्रभावी रितीनं करणारे श्री. अशोक, अनिल, अजित, अतुल आणि सगळा जैन परिवार, आणि आपण या ठिकाणी अगत्यानं उपस्थित राहिलेले सर्व शेतकरी बंधु-भगिनी, तरुण मित्रांनो.

जवळपास दरवर्षी आपण या ठिकाणी हा सोहळा करीत असतो. भवरलालजी असताना या कामाची सुरुवात झाली आणि बहुतेक वेळा या कार्यक्रमाला माझी उपस्थिती ही कायम असते. या पुर्वीचे सगळे कार्यक्रम या ठिकाणी व्हायचे त्याच्यामध्ये भर टाकणारी कामगिरी नव्या पिढीने केली याचा मला आनंद आहे. पण एका गोष्टीसंबधीची अस्वस्थता आहे की जळगावला आल्यानंतर जैन हिल्सला गेल्यानंतर भवरलालजींच्या बरोबर सुसंवाद करण्याची संधी मिळत नाही. त्यामुळे माझ्या मनामध्ये एकप्रकारची अस्वस्थता आहे. गेली अनेक वर्ष आमचा स्नेह होता. समान विषयासंबंधीची आस्था आम्हा उभयतांमध्ये होती आणि त्यामुळे साहजिकच या विषयांच्या संबंधी सुसंवाद करावा, चर्चा करावी याची संधी आम्ही दोघं कधी घेतल्याशिवाय राहत नसू. दिल्लीमध्ये ते आले तर ते हक्कानं माझ्याकडे असायचे. आणि गेल्या काही वर्षामध्ये मी जळगावला आल्यानंतर प्रामुख्यानं जैन हिल्सवर भवरलालजींच्या सोबत राहिलेलो आहे. शेतीची चर्चा व्हायची, अर्थव्यवस्थेची चर्चा व्हायची, शिक्षणाची चर्चा व्हायची, शेतकऱ्याच जीवनमान सुधारण्यासाठी काय करायच याची चर्चा व्हायची. कधी कधी वादही व्हायचे, पण त्या वादाच्या पाठीमागं शेतकरी आणि बळीराजाच्या हिताची जपणूक करण्याच्या संबंधीचे जे मार्ग आहेत कदाचित त्या संबंधीची भिन्नता असायची, आणि त्यामुळे वाद असले, वाद झाले तरी मनातला ओलावा हा कधी ढासळलेला नाही हे त्यांचे वैशिष्ट्य होते. मला कोणीतरी विचारले की भवरलालजींच्या बद्दल तुम्हाला काय वाटत? वाकोद सारख्या एका खेड्यातून आलेला गृहस्थ, अतिशय लहान व्यवसाय, पण दृष्टी खुप होती, आणि त्यामधुन कर्तृत्व दाखविण्यासंबंधीची स्वकष्टाने संधी स्वतः घेतली आणि त्या कर्तृत्वाला तो कर्तृत्वाचा महाडोंगर उभा करण्यासाठी ते यशस्वी झाले, हे भवरलालजींच वैशिष्ट्य होत. ते जेव्हा आमच्याशी वाद घालायचे, विषेशतः बैठकीमध्ये



माझ्याबरोबर एकदोन पत्रकार होते आणि त्याच्यात त्यांनी माझ्याशी फार वाद केला काही प्रश्नांवरती. बैठक संपली, भवरलालजी कुठेतरी जाणार होते ते गेले, आणि त्या पत्रकारांनी विचारल की हे गृहस्थ तुम्हाला कसे वाटतात? तुमच्याशी तर भांडत होते. मी त्यांना सांगितल की भवरलाल मला फणसासारखे वाटतात. फणस हा बाहेरून ओबडधोबड असतो, पण तो उघडल्यानंतर त्यातील गरे हे अत्यंत स्वादिष्ट असतात. भवरलाल एखाद्या वेळी एखाद्या प्रश्नासाठी धोरण आपल योग्य नाही अस त्यांना वाटल तर स्पष्टपणानं बोलतील, पण त्यांच्या अंतकरणात असलेला प्रेमाचा ओलावा यद्किंचीत सुद्धा कमी नसतो, तो झरा कधी आटत नाही. आणि हा माझ्या आयुष्याभरातला त्यांच्याबद्दलचा संबंध आहे. आणि म्हणुन आज या ठिकाणी येताना भवरलालजींच स्मरण हे होण साहजिकच आपल्याला त्याच्याबद्दल काही आश्चर्य नाही.

आजचा हा पुरस्कार आप्पासाहेबांच्या नावाने दिला. आप्पासाहेब पवार माझे वडीलबंधु होते, पण त्यांची आस्था आणि बांधिलकी ही शिक्षणाच्या मध्ये होती, शेतीच्या बद्दलची होती, शेती विषयक पदवीधर होते, सहकारामध्ये काम केल, यशस्वीरितीनं कारखानदारी उभी करून चालवली, आणि या सगळ्या कारखानदारी चालवण्याच्या संबंधीचा विचार एकदा त्यांनी डोक्यातून काढल्यानंतर फक्त दोनच विषय लक्षामध्ये घेतले एक



मित्राच्या पुतळ्याचे बारकाईने निरीक्षण करताना जो अंतरिक संवाद झाला त्याने आठवणींचा महाल तर उभा केलाच पण पुढच्या वाटचालीची सूचक पहाटही दाखविली



समारंभात श्री. शरदपवार बोलताना समोर जमलेला प्रचंड जनसमुदाय



श्री. अविनाश पाटोळे यांचा शरद पवार शाल घालून सत्कार करताना, शेजारी श्री. बबनराव लोणीकर, श्री. एकनाथ खडसे, श्री. पांडुरंग फुंडकर, श्री.चंद्रकांत पाटील, सौ. रश्मी पाटोळे, श्री. अशोक जैन व श्री. गिरीश महाजन

– शेतकऱ्याच जीवनमान सुधारण्यासाठी आधुनिकतेचा प्रसार हा कसा करता येईल, नव्या पिढीला प्रोत्साहित कस करता येईल. दुसरं मुलींच्या शिक्षणासाठी काही करता आलं तर ते केल पाहिजे आणि म्हणुन त्यांचा श्वास चालू असेपर्यंत या दोन गोष्टींसाठी त्यांनी अतिशय कष्ट करण्यासंबंधीची भूमिका घेतली. भवरलालजींचे आणि त्यांचे सुद्धा संबंध अतिशय मैत्रीचे होते. आणि मला आनंद आहे की जैन परिवारानं पुरस्कार देताना आप्पासाहेबांना जी दृष्टी होती ती, त्यांनी कष्ट केले, नव्या पिढीला शेतकऱ्यांमध्ये प्रोत्साहित करण्याची त्यांची निती होती, नेमका तोच विचार घेऊन त्या दृष्टीने काम करणारा कुणी तरुण शेतकरी असेल तर त्याचा सन्मान करण्याची भूमिका या कार्यक्रमाच्या माध्यमातून घेतली. मला आनंद आहे. आज चांदवड सारखा तालुका की जो दुष्काळी तालुका म्हणून ओळखला जातो. सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न चांदवडचा काय आहे? तर पाणी. अखंडपणाने पाण्याचा विचार करणारा, पाणी नसल्यामुळं यातना सहन करणारा असा हा शेतकऱ्यांचा चांदवड सारखा परिसर आहे. मला आनंद आहे की त्या परिसरातून आज शेतीच्या क्षेत्रामध्ये उत्तम काम केल्याच्या संबंधी या ठिकाणी अविनाश पाटोळे आणि त्यांच्या पत्नी यांचा सन्मान होतो आहे. नेमक जे अभिप्रेत आप्पासाहेबांना होत, जे अभिप्रेत या ठिकाणी भवरलालजींना होत, आज त्याची अंमलबजावणी पुढची पिढी करते याचा मला स्वतःला आनंद आहे.

आज शेती आणि शेती अर्थव्यवस्था अडचणीत आहे अस माझ्यासारख्याला वाटते. काही रोगराईचं इथं संकट आलं. खान्देशात एकेकाळी कापसाच महत्त्वाच पिक, विदर्भात मराठवाड्यात कापसाच महत्त्वाच पिक, पण आपण बघतो आहे की गेले दोन–तीन वर्ष यंदाच्या वर्षी अति झालं. बोंड अळीचा प्रादुर्भाव झाला आणि त्या बोंड अळीनी सबंध कापसाचं बोंड, प्रत्यक्षपणानं बोंड तयार झाल्यानंतर कापूस तयार होण्याच्या प्रक्रियेच्या काळात ती अळी ते बोंड उध्वस्त करून टाकते. त्यामुळं उत्पादकता घटली आहे, शेतकरी फार मोठ्या संकटामध्ये आलेला आहे. आज बोंड अळीच संकट आल, अशी अनेक वेगवेगळ्या प्रकारची संकट आहेत. मध्यंतरी मी हरियाना, पंजाबमध्ये अशाच काही शेतीच्या कामासाठी फिरत होतो. माझ नेहमी पिकाकडे लक्ष असत. आणि एका ठिकाणी मी बघितल की गव्हाच्या पिकावर मला त्या ठिकाणी तांबेरा ज्याला इंग्रजीमध्ये रस्ट म्हणतात तो रोग आलेला पाहिला. तांबेरा तुम्ही काय म्हणता माहिती नाही. तर तांबेरा रोग दिसला मी गाडी थांबवली आणि त्याच्या शेतामध्ये गेलो. बघितल तर तांबेरा त्या ठिकाणी आलेला होता. परत आल्यानंतर शेती खात्याच्या सगळ्या तज्ञांना बोलावल, त्यांना सांगितल मला त्या ठिकाणी तांबेरा दिसतो आहे. त्याला वेळीच आवर घातला नाही तर त्या तांबेरानी सबंध गव्हाच पिक उध्वस्त झाल्याशिवाय राहणार नाही. जगात काही देशांमध्ये ते झालेल आहे आणि तो रोग कुठूनतरी बाहेरून आलेला आहे. माझ्या कानावर अलिकडं आलेल आहे की केळीमध्ये सुद्धा असाच कुठलातरी बाहेरून करपा रोग आलेला आहे. येथे जे कोणी तज्ञ आहेत त्यांनी त्याचा सखोल अभ्यास करावा कारण शेतीला आणि शेतकऱ्याला दोन पैसे देणारं महत्त्वाच पिक हे केळीच आहे. आणि म्हणून आज त्याला काही अडचण नाही पण कदाचित उद्या अडचण निर्माण होऊ शकते. ही जी

संकट येतात त्या संकटातून बाहेर काढण्यासाठी सातत्यानं लक्ष देण्यासंबंधीची गरज आहे. जैन इरिगेशनच वैशिष्ट्य या ठिकाणी हे आहे की पाण्याच्या प्रश्नावर त्यांनी जस लक्ष केंद्रित केल, आपला व्यवसायाचा विस्तार करायला जस त्यांनी लक्ष दिल तसच शेतीच्या संबंधी संशोधन करण्याच्या कामावर सुद्धा तितकच महत्त्व देऊन लक्ष केंद्रित करण्यासंबंधीची भुमिका घेतली. त्याचा परिणाम आज नवीन नवीन काही ना काही जाती आणि पद्धती आज या ठिकाणी आपल्याला सगळ्यांना बघायला मिळालेल्या आहेत. माझा स्वत:चा या देशातल्या शेतकरी वर्गावर भयंकर भरवसा आहे. तो काहीतरी करू शकतो तो लोकांना जगवू शकतो.

हल्ली राज्यकर्त्यांच्यामध्ये विचारधारा थोडी वेगळी आहे. मध्यंतरी पार्लमेंटच्यामध्ये एक अशीच पार्लमेंटच्या सदस्यांची आणि देशाच्या राज्य चालविण्याच्या संबंधीची महत्त्वाची जबाबदारी असणाऱ्यांची एक संयुक्त चर्चा झाली. आणि सगळ्यांची मतं ऐकल्यानंतर त्यांनी मला माझी मतं विचारली, मी त्यांना सांगितल की या या क्षेत्रामध्ये मला कमतरता दिसते. शेती आणि शेती अर्थव्यवस्था सुधारायची असेल तर पहिल्यांदा घाम गाळणाऱ्या शेतकऱ्याच्या मालाला उत्तम प्रकारची किंमत मिळाली पाहिजे. बाकी जोपर्यंत किंमत मिळत नाही तोपर्यंत तुम्ही काहीही तत्वज्ञान सांगितल तर त्या तत्वज्ञानाला काही अर्थ राहत नाही. मला एका सत्तधारी पक्षातला अतिशय उच्च श्रेणीच्या व्यक्तीने सांगितल की पवार साहब आपके सोच मे और मेरे सोच मे फरक है। मी म्हटल क्या फरक है? ते म्हणाले, आप हमेशा पैदा करनेवाले की बात सोचते है। हिंदुस्थान मे खानेवाले लोग ज्यादा है उनके बारे मे सोचते नही है। मी म्हटल खर आहे तुमच! हिंदुस्थानमध्ये खाणारे लोक जास्त आहेत. पण या खाणाऱ्या लोकांची भुकेची समस्या सोडविण्याची ताकद पैदा करणाऱ्या शेतकऱ्यामध्ये आहे. आज तो शेतकरी उध्वस्त झाला तर आम्हाला खाणाऱ्याला या ठिकाणी काही देता येणार नाही. मला आठवते. ५० वर्षांच्या पुर्वी महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये मी पहिल्यांदा निवडून गेलो त्या वेळेला या राज्यामध्ये आणि देशामध्ये अन्नधान्याचा तुटवडा होता. म्हणून अमेरिकेमधून लाल मिलो या ठिकाणी आणला जात होता. लाल भाकरी खायची परिस्थिती या देशांच्या नागरीकांवर आली होती. ते जर दिवस परत यायचे नसतील तर शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. शेतकऱ्याच्या हिताचा विचार करावाच लागेल, तरच भुकेल्यांची भुक भागविण्यासंबंधीची ताकद शेतकऱ्यांमध्ये निर्माण होईल. पण त्यातल्या एका तज्ञानी सांगितल की शेतीमालाच्या किंमती वाढल्या तर देशामध्ये महागाई येते. इंग्रजीमध्ये त्यांनी सांगितल की फुड इन्फ्लेशन, फुड इन्फ्लेशन याचा अर्थ किंमत वाढ होते. मोठी गंमतीची गोष्ट आहे. शेतकऱ्याने काही पिकवल, त्याला रास्त किंमत मिळाली की महागाई होते, खताच्या किंमती वाढल्या तर स्वस्ताई होते. शेतकऱ्याला लागणाऱ्या गोष्टींची खरेदी करण्याची स्थिती आली, ती त्याला परवडत नसली तर कोणाला महागाई दिसत नाही! आणि म्हणून हा विचार करण्याची पद्धत जी आहे माझ्या मते त्याच्यामध्ये कुठेतरी बदल करण्याची गरज आहे.

मला आठवते की एकदा मी शेती खात्याचे काम बघत असताना पार्लमेंटमध्ये चर्चा झाली. दिल्लीमध्ये कांद्याचे भाव फार वाढलेले आहेत. दिल्ली मोठं गंमतीच गाव आहे, स्वतः काही पिकवत नसत, सगळ्या देशातलं खात असत ते. आणि ते खात असताना ते सर्व स्वस्तात मिळाल पाहिजे याचा विचार करणाऱ्यांच



श्री. अविनाश पाटोळे यांच्या पत्नी सौ. रश्मी यांचा साडीचोळी व चांदीचा नारळ देऊन सत्कार करताना सौ. ज्योतीभाभी अशोक जैन.



कृषिजल अंकाचे
श्री.शरद पवार बारकाईने
वाचन व पाहणी करताना
शेजारी श्री. अशोक जैन

ते गाव आहे. मी सभागृहामध्ये आलो तर आमचे काही खासदार असे गळ्यामध्ये कांद्याच्या माळा घालून आले. मी म्हटल क्या हो गया? आज आप प्याज पहन के क्यू आये? ते म्हणाले आपके राज मे प्याज की किमत बहुत उपर गयी है। आणि जोपर्यंत किंमती खाली येत नाही तोपर्यंत तुम्ही काही बोलायच नाही तुम्हाला बोलायचा अधिकार नाही, त्या किंमती खाली आणा. मी माझ्या भाषणात सांगितले दोन गोष्टीच उत्तर द्या. तुमच्या दैनंदिन खाद्यामध्ये स्वयंपाकामध्ये अन्नामध्ये कांद्याचा खर्च किती? तुम्ही एक वेळेला जेवायला ताटावर बसला तर त्याच्यात एकंदर जे काही भात असेल, भाकरी असेल, चपाती असेल, एखादी भाजी असेल, नॉनव्हेज खाणारा असला तर अंड असेल, किंवा आणखी काही असेल या सगळ्याला लागणारा खर्च आणि त्याच्यात कांदा ह्याचा खर्च किती असेल? मी बोललो नाही, मी स्वच्छ सांगितल की कांदा हे पिक जिराईत शेतकऱ्याच पिक आहे. आज नाशिक जिल्ह्यातला जिराईत शेतकरी कांदा पिकवतो. आणि कधी नाही ते त्याला दोन पैसे मिळाल्यानंतर तुम्ही कांद्याच्या माळा गळ्यात घालून सभागृहामध्ये येता. तुम्ही सकाळ–संध्याकाळ कुठ जाताना कांदा घालून मिरवला तरी त्याचे भाव खाली आले पाहिजेत हे मी म्हणणार नाही. त्या शेतकऱ्याला भाव मिळू द्या, त्याला जगायच्या संबंधी संधी त्या ठिकाणी द्या. दंगा झाला. असल्या दंग्याची चिंता आम्ही कोणी करत नसतो. आणि त्याच महत्त्वाच कारण की शेतकऱ्याला रास्त किंमत मिळाली पाहिजे.

अनेक गोष्टी आज आपल्या सगळ्यांच्या समोर येतात. नवीन तंत्र, विज्ञान याच्याशी शेतीशी सुसंवाद असला पाहिजे. हल्ली लोक विचार करायला लागले आहेत की तुम्ही ही आधुनिकता जी शेतीमध्ये आणता हायब्रीड आणा म्हणता, नवीन गायी तयार करायच्या म्हणता, नवीन बीज तयार करायच म्हणता, हे काही खरं नाही म्हणे. म्हटल काय खरं आहे? हे आपल जुन ते खरं आहे म्हणे. म्हटल दुध कमी दिल तरी चालेल पण जुनी गाय पाहिजे. उत्पादन कस असेल ते चालेल पण जुन बीयाणं पाहिजे. या पद्धतीनं जुनं ते सोनं या नावानं आधुनिकतेपासून शेतकरी वर्गाला बाजूला न्यायचा विचार जे कोणी सांगत असतील ते या देशाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला एकप्रकारे धक्का देणारे आहेत. म्हणून ती परिस्थिती आपल्याला सहन होणारी नाही. यासाठी

आधुनिकता पाहिजे, नवीन जाती पाहिजे, नवीन तंत्र पाहिजे. मी आजच सांगितल जैन बंधुंना की या ठिकाणचा हा कार्यक्रम तुम्ही करता उत्तम. कार्यक्रमासाठी इथं महाराष्ट्रातच नाही तर देशातला कुठलाही शेतकरी आल्याच्या नंतर त्या शेतकऱ्यांना नवीन तंत्र शेतीच्या क्षेत्रामध्ये आणण्याच्या संबंधीच आणि नवीन संशोधन करण्याच्या संबंधीच जे काम तुम्ही या ठिकाणी केलेल आहे त्याच दर्शन त्या समोरच्या शेतकऱ्यांना घडवा, त्यांच्या नव्या पिढीला दाखवा, हे बदल होता आहेत आणि तो बदल त्याच्या शिवारामध्ये दिसला तर त्याचा संसार बदलल्याशिवाय राहणार नाही आणि त्या कामाला आपल्याला प्रोत्साहित करायच आहे. आज खऱ्या अर्थाने त्याची आवश्यकता आहे. शेतकरी हा काही साधा असत नाही, लोक समजतात की हा आडाणी आहे पण त्याच्या सारखा भारी माणूस कोणी नाही. तो काही आडाणी वेडा नाही.

मला आठवत आहे महाराष्ट्रामध्ये एक मुख्यमंत्री होते वसंतराव नाईक, आणि वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना मी त्यांच्या मंत्रीमंडळात राज्यमंत्री होतो. अगदी सुरुवातीला १९७२ सालची गोष्ट आहे. त्या वेळेला महाराष्ट्र आणि कर्नाटक, महाराष्ट्र आणि आंध्र यांच पाण्यावरून भांडण चालू होत. आणि नाईक साहेबांनी दिल्लीला जाऊन भाषण केल की महाराष्ट्रातल्या शेतीची सगळ्यात महत्वाची गरज कुठली असेल तर पाणी. आणि म्हणुन पाणी याला आमच भयंकर महत्व आहे. आमचा शेतकरी पाण्यासाठी वाटेल ते करेल, कुठूनही पाणी आणेल पण पाण्याला तो महत्त्व देत असतो. त्यावेळेला केंद्रामध्ये एक डॉ. के.एल. राव म्हणून मंत्री होते त्यांच्याकडं आज गिरीश महाजन बघतात ते जलसंपदा खात होते त्यांची भेट ठरली. नाईक साहेबांनी मला बोलावल की पाणी खात्यासंबंधीची वितरणाची जबाबदारी असलेले मंत्री महाराष्ट्रात येत आहेत. त्यांना तू कोल्हापुरला घेऊन जा. मी म्हटल कशासाठी? ते म्हणाले कोल्हापूरच्या शेतकऱ्यांनी पंचगंगा नदीमधून २०-२० किलोमीटर पाणी आणल आणि आपल शिवार बागायत केल ते त्यांना दाखवा. ठिक आहे म्हटल. मी चौकशी केली. कोल्हापुरच्या जवळ एक चंबुखडी नावाचा भाग आहे, असा डोंगर आहे आणि तिथ लोकांनी ऊस लावला होता. मी एकदा बघितले होते. तर ते राव आले, त्यांना घेऊन मी चंबुखडीला गेलो. असाच उन्हाळ्याचा महिना होता, दुपारचे १२ वाजले होते, ते राव म्हणजे जुने इंजिनीअर होते, आपण टोपी घालतो पण त्यांची ती हॅट असायची. साहेबाची हॅट असते ना जुन्याकाळातली तशी ती हॅट होती. आणि त्यांनी बघितल तिथे शेतकरी जमले. रावसाहेबांनी बघितल की जमीन अशी होती काळी माती नाही काही नाही मुरमाड. लोकांनी मुरूम खणला, दगड काढले, माती बाहेरून आणली, पाणी २५ कि.मी. वरून आणल, आणि तिथं ऊसाच पिक लावल. ते राव भयंकर



जैन हिल्सवरील भाऊंची सृष्टी या ठिकाणी भाऊंच्या वाटिकेत श्री. शरद पवार नव्याने लावलेल्या शमीच्या वृक्षाला पाणी देताना शेजारी श्री. अशोक जैन, श्री. अनिल जैन, श्री. अतुल जैन, श्री. अरूणभाई गुजराथी, श्री. रविंद्र पाटील व श्री. गुलाबराव देवकर

आश्चर्यचकित झाले ते म्हणाले तुमचा शेतकरी भयंकर आहे म्हणे, दगडधोंड्यात सुद्धा पाणी असेल तर ऊस लावतो हे कस काय? आणि म्हणुन त्यांनी डोक्यातली टोपी काढली, त्यांच्या डोक्यावर टक्कल होत, केस नव्हते आणि ऊनामुळे घाम यायला लागला. त्यांनी प्रश्न विचारला की त्या शेतकऱ्याला की या मालावर या दगडधोंड्यात तुम्ही ऊस कसा लावता? त्या शेतकऱ्यानी सांगितल तो मघाशीच बोलत होता आणि भाषण करून रावसाहेबांना सांगत होतो की त्या शेतकऱ्यानी सांगितल साहेबांना सांगा की डोसक्यावर म्हणे टोपी घाला कारण म्हणे आम्हाला मोकळ वावर दिसत आहे, घामाच पाणी दिसत आहे. मोकळ वावर दिसल आणि पाणी दिसल की आम्ही काडं लावतो. त्यामुळे तुमच्या डोस्क्यावर सुद्धा आम्ही काडं लावल्याशिवाय राहणार नाही. पाणी असल पाहिजे. आणि हा शेतकरी सहजपणानं बोलून गेला पण पाण्याच महत्त्व काय या संबंधीची भावना त्यांनी एका वाक्यात त्या ठिकाणी सांगितली. आणि केंद्रसरकारच्या त्या मंत्र्याच्या लक्षात आल की महाराष्ट्रातला शेतकरी थेंब ना थेंब पाण्यासाठी काय वाटेल ते कष्ट करायला तयार आहे, पैसे गुंतवायला तयार आहे आणि त्यामुळे त्या सर्व गोष्टीला महत्त्व दिल पाहिजे. आणि मला आनंद आहे की भवरलालजींनी याच कामासाठी स्वतःच जीवन वाहून घेतल आहे. त्या पाण्याच महत्त्व सांगितल आहे. त्या पाण्याच तंत्र त्यांनी सगळ्या जगातून प्राप्त केल आहे आणि ते तुमच्या शिवारापर्यंत पोहोचवून तुमच्या शेताची उत्पादकता ही वाढविण्यासंबंधीची खबरदारी त्यांनी घेतली. त्याचा परिणाम आज विविध क्षेत्रातली शेती उत्पादकता वाढण्याच्यासाठी आपण यशस्वी होतो आहे. मला आनंद आहे की आज तेच काम करणाऱ्या आप्पासाहेबांबद्दलचा संबंधीत पुरस्कार आणि त्या विचाराने काम करणाऱ्या नव्या पिढीतल्या शेतकऱ्याचा सन्मान हा अतिशय उत्तम प्रकारचा उपक्रम आहे. त्या उपक्रमाच्या संदर्भात मी जैन परिवाराला, त्या कुटुंबातल्या सगळ्या सहकाऱ्यांना, त्यांच्या कुटुंबियांना, त्यांच्या अधिकाऱ्यांना, त्यांच्या तंत्रज्ञांना, त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या शास्त्रज्ञांना, सगळ्यांना धन्यवाद देतो, आणि याच पद्धतीनं तुम्ही अखंडपणानं काम करीत रहा.

या देशातला बळीराजा आज आत्मा त्याच्या रस्त्यात विसावलेला आहे, त्याच्यातून त्याला बाहेर काढून स्वाभिमानानं उभं राहण्याची परिस्थिती सगळे मिळून निर्माण करण्याची खबरदारी या ठिकाणी आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून घ्यावी, ते तुमचे प्रयत्न महाराष्ट्राच्या आणि देशाच्या दृष्टीने उपयुक्त राहतील या बद्दलचा विश्वास या ठिकाणी बाळगतो आणि माझे दोन शब्द संपवतो.



जैन इरिगेशनने जळगाव मध्ये काळ्यामिरीच्या संशोधनाचे जे पायाभूत काम हाती घेतले आहे त्याची श्री. शरद पवार हे श्री. अजित जैन यांचेकडून माहिती घेताना शेजारी श्री. अशोक जैन, श्री. अनिल जैन व श्री. अतुल जैन आणि डॉ.बालकृष्ण यादव.




# जैन इरिगेशनमुळे जगाच्या बरोबरीने चालण्याची ताकद महाराष्ट्रात निर्माण झाली

## कृषिमंत्री श्री. भाऊसाहेब फुंडकर यांचे विचार

आजच्या पद्मश्री डॉ. आप्पासाहेब पवार आधुनिक कृषितंत्र पुरस्काराच्या कार्यक्रमाला उपस्थित असलेले हिंदुस्थानचे माजी कृषिमंत्री लोकनेते आदरणीय पवार साहेब, या कार्यक्रमाला उपस्थित असलेले आपल्या राज्याचे पाणी पुरवठा मंत्री माननीय बबनरावजी लोणेकर, आपल्या राज्याचे दुसरे सहकार मंत्री माननीय गुलाबरावजी पाटील, माननीय आमचे सहकारी मित्र आदरणीय सुरेशदादा जैन, अरूणभाई गुजराथी, आमदार सतिश पाटील, चंद्रकांतजी सोनवणे, उल्हास पाटील, आणि आमचे दुसरे मित्र माननीय महानोरजी, सर्व जैन परिवार, या मंचावर उपस्थित सर्व मान्यवर, आणि राज्याच्या विविध जिल्ह्यातून या कार्यक्रमाला उपस्थित झालेले आमचे शेतकरी बांधव, भगिनी आणि मित्रांनो,

पद्मश्री डॉ. आप्पासाहेब पवार आधुनिक कृषि उच्चतंत्र पुरस्कार हा जैन हिल्सवर गेली अनेक वर्ष सुरू आहे. राज्यातल्या एका शेतकऱ्याची निवड करून आणि विविध विभागाला प्राधान्य देऊन या ठिकाणी त्या शेतकऱ्याचा सन्मान केला जातो, सत्कार केला जातो. आणि त्या शेतकऱ्यानी जे योगदान आपल्या शेतीमध्ये दिल, नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग केला, नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून आपल्या उत्पादनामध्ये प्रचंड वाढ केली आणि इतर लाखो शेतकऱ्यांना ज्यांनी प्रेरणा दिली, अशा शेतकऱ्याचा सत्कार या कार्यक्रमामध्ये केला जातो. पद्मश्री डॉ. आप्पासाहेबजी पवार यांच्या नावानं हा पुरस्कार दिला जातो. ज्या आप्पासाहेबांनी शेतीमध्ये भरीव अस काम केलेल आहे. या राज्यातल्या शेतकऱ्याला एक

दिशा दिलेली आहे. अशा आप्पासाहेबांच्या नावानं हा पुरस्कार जैन इरिगेशनच्या माध्यमातून या ठिकाणी दिला जातो. जैन इरिगेशननं आपल स्वतःच नाव न देता माननीय आप्पासाहेबांच नाव या पुरस्काराला दिल आणि तो पुरस्कार आता निरंतर चालू आहे. आज या पुरस्काराला माननीय पवार साहेब उपस्थित आहेत. पवार साहेबांच आपल्याला ऐकायच आहे, मलाही ऐकायच आहे. आणि म्हणुन आपल्यामध्ये आणि त्यांच्यामध्ये फार वेळ मी घेणार नाही.

जैन इरिगेशन ही एक शेतकरी कंपनी आहे. या देशामध्ये ५०-६० वर्षांपुर्वी या कंपनीची निर्मिती झाली. शेतीमध्ये वेगवेगळे प्रयोग करून आणि शेतकऱ्याला योग्य ते मार्गदर्शन, शेतकऱ्याची शेती कॉन्ट्रॅक्ट बेसवर करून शेतकऱ्याच उत्पादन घेण्याची त्याला गॅरंटी, त्याला भाव देण्याची गॅरंटी, त्याला बीयाणं पुरवण्याची गॅरंटी, आणि जो माल शेतकऱ्याकडून येईल त्या मालावर प्रक्रिया करून, त्या कच्च्यामालाचा पक्का माल बनवून तो मार्केटमध्ये आणण, अशा पद्धतीनं हे सायकल जैन इरिगेशनच्या माध्यमातून या भागामध्ये चालू आहे, राज्यात चालू आहे. आणि आता त्याच नेटवर्क नुसत महाराष्ट्र राज्यापुरत राहिलेल नाही तर आता जैन इरिगेशनच नेटवर्क हे देशभर झालेल आहे. त्याच्यापुढे जाऊन मी सांगेल की परदेशात सुद्धा आता जैन इरिगेशन जाऊन पोहोचलेल आहे. हिंदुस्थानची ओळख, महाराष्ट्राची ओळख, जैन इरिगेशनच्या माध्यमातून ही आता जगाला व्हायला लागलेली आहे. पळणाऱ्या पाण्याच नियोजन कस कराव, पाणी वाया जाणार नाही, शेतीला योग्य ते पाणी मिळेल, आवश्यक तेवढ पाणी मिळेल, त्यासाठी जैन इरिगेशनच्या माध्यमातून ठिबकची योजना या राज्यामध्ये सुरू केलेली आहे. ठिबक असेल, तुषार असेल यामधून पाण्याचा थेंबन् थेंब त्या पिकाला देण्याचा प्रयत्न, त्याचबरोबर पाण्याच नीट नियोजन त्यातून उत्पन्नाची वाढ या पद्धतीनं जैन इरिगेशन हे भरघोस काम या ठिकाणी करते आहे.

मी जैन इरिगेशनला मनापासून धन्यवाद देणार आहे. या राज्याचा कृषिमंत्री म्हणून धन्यवाद देणार आहे की आता जग हे एकविसाव्या शतकात गेलेल आहे. जगामध्ये नवीन तंत्रज्ञान शेतीमध्ये येत आहे त्या मानाने आपण जरा मागे आहोत. पण आता आपल्यालाही जगाच्या बरोबर चालल पाहिजे, म्हणुन आता नवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांना देण्याचा प्रयत्न, शासन तर करणारच आहे पण शासनाबरोबर जैन इरिगेशन सारख्या शेतकरी कंपन्या जर पुढे आल्या आणि त्यांनी कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगच्या माध्यमातून जर शेतकऱ्याला याचा लाभ पोहोचवला, शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली तर मला अस वाटत की जगाच्या बरोबरीनं चालण्याची ताकद आपल्याही राज्यामध्ये आहे हे जैन इरिगेशन दाखवून देऊ शकते. यामध्ये सरकार जैन इरिगेशनच्या पाठीशी उभं आहे. आता दोन वर्ष झाले मला कृषिमंत्री होऊन पण या आधीही माझा जैन परिवाराशी संबंध आहे. माननीय भाऊ भवरलालजींशी सुद्धा माझे जिव्हाळ्याचे संबंध होते आणि त्यांच मार्गदर्शन मी नेहमी घ्यायचो. माननीय भवरलालजींनी जे छोटस रोपट या ठिकाणी लावल होत त्या रोपट्याचा प्रचंड वटवृक्ष आज झालेला आहे. पुर्ण जैन परिवार भवरलालजींच हे स्वप्न पुर्ण करण्यासाठी रात्रंदिवस कष्ट करते आहे मेहनत करते आहे आणि शेतकऱ्याला योग्य दिशा देण्याच काम करते आहे, त्या परिवाराला मी शुभेच्छा देतो.

आज अविनाश पाटोळेजी खर म्हणजे यांची निवड झालेली आहे. मला या ठिकाणी अस सांगितल एकाच विभागात, एकाच जिल्ह्यात दरवर्षी पुरस्कार आम्ही देत नाही. तर या वेळेला जर पश्चिम महाराष्ट्राला मिळाल असेल तर पुढच्या वेळेला विदर्भाला. विदर्भाला जर मिळाल असेल तर मराठवाड्याला. अशा पद्धतीनं हा पुरस्कार हा या ठिकाणी दिला जातो. सर्वच विभागातल्या शेतकऱ्याची निवड या ठिकाणी केली जाते. माननीय दापोली विद्यापीठाचे माजी कुलगुरू माननीय डॉ. शंकरराव मगर साहेब यांच्या माध्यमातून या शेतकऱ्याची निवड केली जाते. पुरस्काराला एवढ महत्त्व नाही पण त्या शेतकऱ्याला प्रोत्साहन आणि शेतकऱ्याने जे कष्ट केले, एक नवीन दिशा या राज्यातल्या शेतकऱ्यांना दिली त्या शेतकऱ्याचा सन्मान आणि गौरव या मोठ्या कार्यक्रमामध्ये केला जातो. हा एक फार मोठा गौरव आहे. या शेतकऱ्याच खऱ्या अर्थानं त्याच्या पाऊलावर पाऊल ठेवून त्याच्यापासुन प्रेरणा घेऊन या राज्यातला शेतकरी निश्चितपणानं आपल्या शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन आधुनिकतेकडे जाईल अशा प्रकारची अपेक्षा या ठिकाणी आपण करू या. मी पुन्हा एकदा सर्व शेतकरी बांधवांना मनापासुन शुभेच्छा देतो. अविनाश पाटोळेजी त्यांच्या सौभाग्यवती यांचेही मी मनापासुन अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द संपवतो.



जैन इरिगेशनचे व्यवस्थापकीय संचालक अनिल जैन हे
कृषीमंत्री पांडुरंग फुंडकर यांचा सत्कार करताना



# देशाला महासत्ता करण्यासाठी हुशार मुलांनी शेती करावी

## पाणीपुरवठा मंत्री श्री. बबनराव लोणीकर यांचे विचार

आजच्या या भुतपूर्व कार्यक्रमाला उपस्थित केंद्रीय माजी मंत्री आपल्या सर्वांचे नेते माननीय शरद पवार साहेब, कृषिमंत्री माननीय भाऊसाहेबजी फुंडकर, मंत्रीमंडळातील माझे सहकारी श्री. गुलाबराव पाटील, माननीय सुरेशदादा जैन साहेब, माननीय अरूणभाई गुजराथी, माननीय ना.धों. महानोर, सत्कारमुर्ती सन्माननीय अविनाशजी, व्यासपीठावरील सर्व मान्यवर, ज्यांनी या कार्यक्रमाच नियोजन केलेल आहे पद्मश्री आप्पासाहेबजी पवार यांच्या नावानं या ठिकाणी आधुनिक तंत्रज्ञानाची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना पुरस्कार देण्याचा कार्यक्रम ज्यांनी ठेवला ते सन्माननीय अशोकजी जैन, अभयजी जैन, अनिलजी जैन, व्यासपीठावरील सर्व मान्यवर, राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेले सर्व शेतकरी बंधु आणि भगिनींनो, आजच्या या कार्यक्रमाचा पुरस्कार वितरण समारंभ महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्र फडणवीस साहेबांच्या हस्ते या ठिकाणी होणार होता परंतु अचानक त्यांची तब्येत थोडी खराब झाल्यामुळे आज माननीय मंत्री महोदय येऊ शकले नाही. माननीय शरदचंद्रजी पवार साहेबांच्या हस्ते त्यांच्या अध्यक्षतेखाली हा पुरस्कार आज या ठिकाणी दिला जाणार आहे. शेतीमध्ये वेगवेगळ्या प्रकारच आधुनिक तंत्रज्ञान विकसीत करण्यासाठी या कंपनीच्या वतीनं, जैन बंधुंच्या वतीनं, राज्यामध्ये आधुनिक शेतीच्या संदर्भात, ठिबकच्या संदर्भात, तुषारच्या संदर्भात, कमी पाण्यामध्ये जास्त उत्पन्न कस घेता येईल, शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती कशी सुधारेल, आणि म्हणुन या डोंगराळ माळरानावर फळबागेची शेती करण्याच त्यांनी स्वतः ठरवले. पडीक असणारी ही सगळी जमीन, हा डोंगर यावरती फळबाग लावून एक आदर्श त्यांनी निर्माण केला. राज्यातल्या शेतकऱ्यांची शेती सुधारली पाहिजे, देशातल्या शेतकऱ्यांची शेती सुधारली पाहिजे, आणि म्हणून जैन



श्री. शरद पवार दीपप्रज्वलन करताना शेजारी श्री. भाऊसाहेब फुंडकर, श्री. बबनराव लोणीकर, कवी ना.धों. महानोर, श्री. अशोक जैन, श्री. सुरेश जैन, श्री. गुलाबराव पाटील, श्री. सतीश पाटील, श्री. दलिचंद जैन, श्री. उल्हास पाटील आणि डॉ. शंकरराव मगर

बंधुंच्या वतीनं वेगवेगळ्या प्रकारच आधुनिक तंत्रज्ञान विकसीत करून शेतीला कसं मार्गदर्शन होईल अशा प्रकारच काम या जैन बंधुंच्या वतीनं झालेल आहे. माननीय पवार साहेब या कार्यक्रमाचे अध्यक्ष आहेत. राजकारणाचा भाग बाजूला करा, आयुष्यातली ४०-४५ वर्ष पवार साहेबांनी शेतीसाठी दिली, शेतीसाठी काम केलेल आहे. आणि म्हणुन आधुनिक तंत्रज्ञानाची शेती कशी करावी, शेतकऱ्यांच उत्पन्न कस वाढवाव, आणि म्हणुन राजकीय जोडे बाजुला ठेवून, राजकीय व्यासपीठ बाजुला ठेवून महाराष्ट्राच्या आणि देशाच्या शेतकऱ्यांच भल कस होईल त्यांच उत्पन्न कस वाढेल, शेतकऱ्यांच्या आत्महत्या कशा थांबतील आणि म्हणुन पवार साहेबांच योगदान आहे. प्रत्येक क्षेत्रामध्ये काम करणारी वेगवेगळी लोकं असतात. स्वच्छता अभियानामध्ये माननीय मोदीजींनी अमिताभ बच्चन यांना ब्रॅन्ड ॲम्बेसेडर नेमलेल आहे. आपले माजी केंद्रीय कृषिमंत्री हे शेतकऱ्यांचे ब्रॅड ॲम्बेसेडर आहेत. आणि म्हणुनच माननीय मुख्यमंत्री आणि पवार साहेब शेतकऱ्यांच्या मुद्यावर या ठिकाणी एकत्र व्यासपीठावर येणार होते. पवार साहेबांची मी स्तुती करणार नाही परंतु वस्तुस्थिती मी आपल्यासमोर मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. शेतीचे, या देशाचे उत्पन्न वाढविण्यासाठी त्यांचे मोठे योगदान आहे. पवार साहेब मोठ्या कॅन्सरच्या आजारातून वाचले. त्यांनी देवाला आणि यमालासुद्धा हुलकावणी दिली आणि कॅन्सरवर मात करून आजही ते आमच्या तरुणाला लाजवेल अशा प्रकारच काम शेती व्यवसायामध्ये करतात. आणि म्हणुनच माननीय मुख्यमंत्री साहेब असतील, मोदीजी असतील, पवार साहेबांसोबत शेतीच्या संदर्भात चर्चा करतात, आणि म्हणुन शेतीमध्ये चांगल काम त्यांनी केलेल आहे. त्यांचे मार्गदर्शन आम्ही घेत असतो. आधुनिक पद्धतीची शेती करून आपण शेतीमध्ये क्रांती घडवली, शेतकऱ्यांच उत्पन्न वाढवलं तरी पण शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबत नाहीत. शेतीला पाणी मिळाल पाहिजे, शेतीला वीज मिळाली पाहिजे, शेतकऱ्यांने उत्पन्न केलेल्या मालावर प्रक्रिया करण्यासाठी आपल्या राज्यात आणि आपल्या देशात आपण कमी पडतो आहे. शेतकऱ्यांना उत्पन्न वाढविण्याच ज्ञान आहे. शेती पिकविण्याची आम्हाला अक्कल आहे.

मी सुद्धा एक शेतकरी आहे. माझ्या शेतामध्ये मी मंत्री नसताना मंत्री व्हायच्या अगोदर २२ एकर पपई लावली. पपईच पीक मोठ्या प्रमाणावर आल. पण पपईच पिक आल्यानंतर बाजारामध्ये त्याचे भाव पडले. कलकत्त्याला आम्ही दोन रुपये किलोने पपई विकली मी स्वतः. मुंबईला दीड रुपये दोन रुपये किलोने पपई विकली. संभाजीनगर औरंगाबादला एका मोठ्या व्यापाऱ्याला पपई विकली दिड रुपये किलोने. आणि मी आकाशवाणी केंद्राच्या गेस्ट हाऊस समोरून जात असताना गाडी उभी केली आणि त्या व्यापाऱ्यांना विचारल की पपई काय भाव आहे? त्यानी सांगितल सर भाव कशाला करता पपई फार गोड आहे. ये परतुर के बबनराव लोणीकर की पपई है बहोत मिठी पपई है, १२ रुपये किलो है ले जावो ना। म्हणजे माझ्याकडून जी पपई मी दिड रुपये किलोने विकली, तोच व्यापारी तिच पपई मला १२ रुपये किलोने घेऊन जा आणि ही पपई खुप गोड आहे और परतुर के बबनराव लोणीकर की पपई है मिठी पपई है ले जाओ ना। म्हणजे शेतीमध्ये उत्पन्न मग केळीच असो, मग डाळींबाच असो, मोसंबीच

असो, ऊसाच असो, उत्पन्न वाढविण्यामध्ये आपण खुप वेगानं पुढे गेलो, परंतु शेतकऱ्यांच्या मालावर प्रक्रिया करण्यामध्ये आपण मागे आहोत. माननीय मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्त्वामध्ये या राज्यामध्ये शेतीवर प्रक्रिया करणारे प्रकल्प उभारण्याच्या संदर्भात सरकारने चांगली सुरुवात केलेली आहे. आमचे भाऊसाहेब फुंडकर कृषिमंत्री आहेत, चंद्रकांतदादा पाटील महसुल मंत्री आहेत, महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांचा पहिला प्रकल्प, शेतकऱ्यांची पहिली एमआयडीसी त्याच्यात फक्त आणि फक्त शेतकरी. अशा प्रकारचा ५० कोटीचा प्रोजेक्ट आम्ही माझ्या मतदार संघात उभा करतो आहे. २० एकर जमीन घेतलेली आहे, पपईवर प्रक्रिया करणे, मोसंबीवर प्रक्रिया करणे, आलुवर प्रक्रिया करणे, चिप्स बनविणे, सोयाबिनवर प्रक्रिया करणे, सोयाबीन वडा बनविणे, केळीवर प्रक्रिया करणे, चिप्स बनविणे, अशा प्रकारचा प्रकल्प. शंभर प्रकल्प छोटे छोटे. छोट्या छोट्या शेतकऱ्यांची बचतगटाची एमआयडीसी करून शंभर गावच्या शेतकऱ्यांच्या मालावर प्रक्रिया करून शेतकऱ्यांची राज्यातली ही पहिली एमआयडीसी करण्याच मी ठरवल आणि त्याच काम अंतिम टप्प्यामध्ये आहे. मला आणि आपल्या सगळ्यांना पवार साहेबांच भाषण ऐकायच आहे. मी जास्तीचा वेळ घेतो आहे माझ्या लक्षात आहे.

राज्यामध्ये अशा प्रकारचे प्रकल्प उभे करून शेतीच्या मालावर शेतकऱ्यांच्या बचतगटाने प्रक्रिया करण आणि त्याच मार्केटींग करण, त्या शिवाय शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारणार नाही. आणि म्हणुन या दिशेनं आपल्याला सगळ्यांना मिळून काम कराव लागेल. पुर्वीचे दिवस गेले. शेतकरी आपल डेऱ्यातल बीयाणं पेरायचा, कंणगीतलं बियाणं पेरायचा, बळदातल बियाणं पेरायचा. आता पुर्वीच्या काळामध्ये एका कुटुंबात तीन भावंड आहेत. जो सगळ्यात हुशार आहे त्यानी व्यापार करायचा. नंबर दोनला जो हुशार आहे त्याने नोकरी करायची. आणि ज्याला काहीच समजत नाही ज्याला काहीच येत नाही त्यानी शेती करायची. पण आता काळ आणि परिस्थिती बदलली. जो हुशार मुलगा आहे घरातला, ज्याला आधुनिक तंत्रज्ञानाची शेती कळते, देश एकविसाव्या शतकाकडे जातो आहे आणि अशा परिस्थितीमध्ये घरामध्ये सर्वात जो हुशार मुलगा असेल आपल्याला याला शेतीमध्ये टाकाव लागेल. आणि शेतीमध्ये टाकल्यानंतर आधुनिक तंत्रज्ञानाची शेती करून, शेतीमधल उत्पन्न वाढून, शेतीच्या मालावर प्रक्रिया करून, गावाला आणि तालुक्याला राज्याला बाजारपेठ कशी निर्माण होईल अशा प्रकारची हुशार पिढी तरुण पिढी शेतीमध्ये उतरावी लागेल. ज्याला कमी ज्ञान आहे तो माणुस तो मुलगा व्यापारात टाकावा लागेल. शेजारच्याचा व्यापार बघुन तो चांगला व्यापार करू शकेल. आणि ज्याला काही कळत नाही, ज्याला काही समजत नाही, ज्याला नीट काही काम करता येत नाही तो सरकारी नोकरीत गेला तरी चालेल, कारण तिथं काम करण्याची सवय कमी असते. आणि म्हणुन ज्याला काही घरात येत नाही अशा मुलाला नोकरीत पाठवल तर तो दिन जावो, पगार आवो अस काम करू शकेल.

मात्र या देशाला सुखी–समृद्ध करायच असेल, या देशाला महासत्ता करायच असेल, तर या देशाची अर्थव्यवस्था ही शेतीवर अवलंबुन आहे. आणि म्हणुन हुशार मुलं शेतीकडं गेली पाहिजेत. आधुनिक तंत्रज्ञानाची ही शेती केली पाहिजे. आणि म्हणुन जैन समुहाच्या वतीनं शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी, शेतकऱ्यांना पुरस्कार देण्यासाठी प्रत्येक दोन वर्षाला एकदा एकेका विभागाच्या शेतकऱ्यांना पुरस्कार दिला जातो टप्प्याटप्प्यानं कधी विदर्भात, कधी पश्चिम महाराष्ट्राला, कधी मराठवाड्याला, कधी कान्हदेशला, कधी कोकणाला. मी जैन बंधुंचे मनापासुन आभार मानतो.

पवार साहेबांचे मी मनापासुन आभार मानतो की आपण गेली अनेक वर्ष शेतीमध्ये काम करता आहात. आपल्या पाऊलावर पाऊल ठेवून माननीय आमचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब काम करता आहेत. आणि म्हणुन इथे आलेल्या सर्व शेतकऱ्यांचे आभार मानतो आणि माझ बोलण संपवतो. धन्यवाद!



व्यासपीठावर श्री. बबनराव लोणीकर यांच्याशी श्री. अशोक जैन संवाद करताना शेजारी कवि ना.धों. महानोर



# जैन इरिगेशनच्या स्वयंचलित ठिबक तंत्राचा द्राक्ष बागेला मोठा फायदा

## डॉ. आप्पासाहेब पवार सुक्ष्मसिंचन पुरस्काराचे मानकरी श्री. अविनाश मनोहर पाटोळे यांचे गौरवोद्गार

आदरणीय पवार साहेब, माननीय अशोकभाऊ जैन, सर्व सन्माननीय व्यासपीठ, व सर्व उपस्थित. सर्वप्रथम आपल्या सर्वांचे श्रद्धास्थान स्व. भवरलालजी जैन यांना विनम्र अभिवादन. उपस्थित सर्वांना नमस्कार. मी अविनाश मनोहर पाटोळे राहणार वडनेर भैरव, चांदवड या दुष्काळी तालुक्यातील हे गाव. कृषि क्षेत्रात करीत असलेल्या विविध आधुनिक तंत्र शेतीच्या साधनेमुळे आज आपल्या सर्वांच्या उपस्थितीत पद्मश्री आप्पासाहेब पवार आधुनिक कृषि उच्चतंत्र या पुरस्काराने मला सन्मानित करण्यात आले. मला याचा विशेष आनंद होत आहे. सर्वप्रथम निवड समिती आयोजक यांचा मी ऋणी आहे. या सर्वांचे मनापासुन आभार. कॉलेजचे शिक्षण पुर्ण केल्यावर मी वडीलांबरोबर शेती करण्याचा निर्णय घेतला. दोन वर्ष वडीलांबरोबर शेती समजून घेतली, त्यातील अडचणी जाणून घेतल्या. प्राप्त परिस्थितीत आपल्याकडे काय नाही त्यापेक्षा काय आहे यावर विचार करून नवीन पद्धतीने शेतीला सुरुवात केली. आधुनिक शेतीकडे प्रवास सुरू झाला. सन २०११ या वर्षी पाऊसाचे प्रमाण खुप कमी होते, द्राक्षबाग पाण्यावाचून तोडावी लागते की काय असे वाटू लागले. पण जिथे पाणी मिळेल तेथून टँकरच्या सहाय्याने स्वतः पाणी आणून द्राक्षबाग जगविल्या. पाण्याची अडचण भविष्यात पुढे कधीही भासू नये म्हणुन स्टोअर टँक बनविण्याचा निर्णय घेतला. साधारण एक एकर क्षेत्रात दोन कोटी लिटर क्षमतेचा स्टोअर टँक बनविला. दुष्काळातून वाचलेल्या द्राक्षबागेला चांगल्या प्रतिचा माल आला.

बघता बघता द्राक्ष काढणीचा हंगाम जवळ आलेला असतानाच गारपीट झाली. बागेचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले. या सर्व परिस्थितीतून सावरत पुन्हा कामाला लागलो. जुनी झालेली दिड एकर द्राक्षबाग काढून तिथे शेडनेटमध्ये सिमला मिरचीची लागवड नवीन पद्धतीने करण्याचे ठरवले. कमीत कमी मनुष्यबळाचा वापर व जास्तीत जास्त यंत्राचा वापर हे नियोजन करून ट्रॅक्टरच्या सहाय्याने मशागत व स्प्रे होतील अशी सिमलाची लागवड केली, त्यात यशस्वी झालो. मग त्याच पद्धतीने टोमॅटो, काकडी, टरबुज, दोडके आदी पिके घेतली. परत एकदा द्राक्षाच्या ऐन हंगामामध्ये प्रचंड प्रमाणामध्ये गारपीट झाली.

द्राक्षाचे पिक पुर्णपणे उध्वस्त झाले होते. पण शेडनेटमध्ये केलेली सिमला मिरची शेडनेटमुळे वाचली. त्यामुळे काहीशा प्रमाणात आर्थिक नुकसान भरून निघाले. या सर्व परिस्थितीत द्राक्षबागेला झालेली इजा कशी भरून काढता येईल यावर विचार करून त्यावर वेळीच उपाययोजना करीत पुन्हा कामाला लागलो. मजुर व लोडशेडींगचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर असतानाच दहा मजुरांना एक एकरची डिपींग करण्यासाठी साधारण एक दिवस लागत असे. परदेशातुन आलेल्या डिपींग मशीनमुळे तेच काम एक तासात होत असे म्हणुन डिपींग मशीन घेतले. त्यामुळे द्राक्षाची गुणवत्ता वाढली. पण त्या मशीनचा वापर करणे अनेकांना अडचणीचे होते त्यात संशोधन करून अनेकांना मार्गदर्शन केले. त्याचा परिणाम महाराष्ट्रभर माझे मित्र तयार झाले. त्यामुळे कोणतीही अडचण कोणालाही आली की त्यावर विचार करून द्राक्ष शेती आधुनिक पद्धतीने करण्यास सुरुवात केली. स्टोअर टँकमुळे पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटला होता. पण लोडशेडींगमुळे उपलब्ध पाणी वापरता येत नव्हते. त्यावर उपाय म्हणुन जैन इरिगेशनचे ड्रीप ऑटोमेशन शेतात बसविले. त्यामुळे बागांना पाणी व खते वेळेच्या वेळी देता आले. त्याचा खुप प्रमाणात फायदा झाला.

द्राक्षबागेची गुणवत्ता वाढविण्यासाठी चिली या देशातील द्राक्ष कन्सल्टंट नेमून पाणी व जमीन यांचे योग्य व्यवस्थापन त्याचे तंत्र जाणून घेतले. हे सगळं करीत असताना माझे वडील श्री. मनोहर शंकरराव पाटोळे, आई सौ. लताताई पाटोळे, व पाटोळे कुटुंबाची भक्कम साथ मिळाली. वडीलांनी नवीन प्रयोग करीत असताना मला नेहमीच प्रोत्साहन दिले, आर्थिक बळ दिले त्यामुळे प्रगतीचा आलेख उंचावत राहिला. मी यशस्वीपणे आधुनिक पद्धतीने उच्च तंत्रज्ञानाने शाश्वत शेती करू शकलो व इथपर्यंत पोहोचलो.



पुरस्कार विजेते श्री. अविनाश पाटोळे हे श्री. शरद पवार यांचेसोबत हितगुज करतांना शेजारी श्री. अशोक जैन व सौ.रश्मी पाटोळे



# जैन इरिगेशनच्या उपक्रमांचा शेतकऱ्यांना मोठा फायदा

## श्री. अनिल जैन यांचे उद्गार

आदरणीय पवार साहेब, फुंडकरजी, लोणीकरजी, गुलाबरावजी, सन्माननीय व्यासपीठ, शेतकरी बंधु, आणि बंधु-भगिनींनो. आज आपण इथे अविनाश पाटोळेजी हे जे नाशिकचे शेतकरी आहेत त्यांच्या सत्कारासाठी एकत्र आलेलो आहोत. आपल्याला कल्पना आहे की जैन इरिगेशन आपली कंपनी ही शेतकऱ्याने शेतकऱ्यांसाठी बनविलेली ही कंपनी आहे आणि १९६३ पासुन अव्याहतपणे शेतकरी शेती आणि शेतकऱ्याचा कसा मान वाढेल प्रतिष्ठा वाढेल शेतकऱ्याच उत्पन्न कसं वाढेल या विषयावरती काम करणारी आपली कंपनी जैन इरिगेशन आहे. आणि भाऊंनी जेव्हा ठिबक सिंचनाची सुरुवात केली १९८८ ला आणि जेव्हा एक पायाभूत असे काम केले त्यावेळी माझ्या वडीलांना भवरलालजींना भाऊंना प्रेरणा कै. आप्पासाहेबांनी दिली होती. आणि म्हणुनच भाऊंनी जेव्हा शेतकऱ्यांना पुरस्कार देण्याच ठरवल तेव्हा हे ठरवल की आपल्याला ज्या व्यक्तीकडून प्रेरणा मिळाली कै. आप्पासाहेब पवारांकडून त्यांच्याच नावाने आपण हा पुरस्कार ठेवावा आणि गेले १८ वर्षे हा पुरस्कार आपण देतो आहे. आणि ह्या पुरस्कारामध्ये आपण नेहमीच अशा शेतकऱ्याची निवड करतो की जे शेतकरी नवे तंत्रज्ञान आत्मसात करून पुढे जातो आहे आणि नुसत स्वतः साठीच पुढे जात नाही पण जो शेतकरी दुसऱ्या शेतकऱ्यांनाही प्रेरणा देऊ शकतो ही ह्या पुरस्कारामागची एक भुमिका आहे. याच्यामध्ये आपण हे कस मेरीट जस म्हणतात असा निकषाचा कस लावतो. आपले दापोली कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.शंकरराव मगर साहेब यांच्या अध्यक्षतेखाली एक निवड समिती आहे ती प्रत्येक विभागामध्ये जे चांगल शेतकऱ्यांनी काम केलेल आहे त्यांची एक शॉर्टलिस्ट करतात, त्यांची नावं मागवितात आणि ते शॉर्टलिस्ट केलेले शेतकरी जे होते, जसे ह्या २०१६च्या वेळी ११ शेतकरी होते. त्या प्रत्येक शेतकऱ्याला भेटून त्यांच्या बद्दलची माहिती घेऊन, त्यांनी केलेल्या कार्याबद्दलची माहिती घेऊन आपण त्यांना गुण देतो वेगवेगळे मार्क देतो आणि त्याच्यानंतर ३ शेतकऱ्यांच नाव परत शॉर्टलिस्ट केल जात. आणि त्या तीन शेतकऱ्यांमध्येच जो शेतकरी सर्वोत्कृष्ट आहे. वेगवेगळ्या कारणांसाठी त्याची आपण निवड करतो. आणि २०१६ सालासाठी अविनाश मनोहर पाटोळे यांची ही निवड झाली. हे चांदवडला असतात आणि म्हणजे नाशिक जिल्ह्यामध्ये, २००६ पासुन त्यांनी शेतीमध्ये काम केल आहे. मित्रहो हे आधी सॉफ्टवेअर इंजिनीअर होते, अमेरिकेत राहिलेले आहेत आणि अमेरिकेहून परत येऊन म्हणजे घरवापसी करून त्यांनी शेतीमध्ये एवढ नाव कमावल, पैसा कमावला आणि चांगल तंत्रज्ञान आत्मसात करून शेती पुढे कशी नेता येईल, शेतीच काम पुढे कस करता येईल याचा एक चांगला आदर्श पाटोळे यांनी इथे मांडलेला आहे.

मित्रहो, आपल्याला कल्पना आहे की गेले २ ते ३ वर्ष शेतकऱ्यांना आणि शेती विषयक गोष्टींना एक आपला हवामान बदल, पर्यावरण बदल म्हणा किंवा आपल्या अर्थव्यवस्थेमध्ये जे काही बदल घडता आहेत त्याच्यामुळे शेतकऱ्यांना बराचसा त्रास झालेला आहे. एक आपली ग्रामीण अर्थव्यवस्था जी होती त्याच्यात बरचसे चढउतार झालेले आहे. त्यावेळी शेतकऱ्यांसाठी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून जर आपण शेती एक धंदा म्हणुन बघितला, शेती एक व्यवसाय म्हणून बघितल आणि शेतीमध्ये उत्पादकता आणि मूल्यवृद्धी होण्याकडे जर आपण लक्ष दिले तर काय चमत्कार घडू शकतो हे एक चांगल उदाहरण पाटोळे साहेबांनी



श्री. अनिल जैन भाषण करताना व समोर जमलेला जनसमुदाय

समोर ठेवल आहे. आपली कंपनी जैन इरिगेशन याच्यासाठी बरेचशे नवीन तंत्रज्ञान, नवीन नवीन उपक्रम राबवत असते. आज हा कार्यक्रम झाल्यानंतर आपला एक मसाला प्रक्रिया जो नवीन आपण एक कारखाना लावलेला आहे त्याचही उद्‌घाटन आदरणीय पवार साहेबांच्या हस्ते होईल. आणि आता ह्या परिसरामधले म्हणजे जवळजवळ जळगावपासुन ५०० ते ६०० किलोमीटर एरिया मधल्या शेतकऱ्यांना एक नवीन संधी येते आहे की आपल आलं म्हणा, हळद म्हणा, मिरची म्हणा, असे वेगवेगळे नवीन पीक ज्याच्यामध्ये मूल्यवृद्धि जास्त आहे किंवा आपल उत्पन्न किंवा मिळकत जास्त आहे असे पीक आता आपण कॉन्ट्रॅक्ट फार्मींग करून आपल्या कंपनीला देऊ शकाल. आणि या हिशोबाने एक नवीन काम आज आपण अजून सुरू करतो आहे. ज्याच्यामुळे आपला आणि ह्या ५०० किलोमीटर परिसरातल्या शेतकऱ्यांचा फायदा होईल आणि एक नवीन मिळकत मिळण्याचा कार्यक्रम अजून इथे सुरू होईल.

आपण आज एवढ्या मोठ्या संख्येने इथे हजर झाला, बाहेर ४० डिग्रीच ऊन आहे अस असतानाही आपण जैन हिल्स इथे आमच आमंत्रण स्विकारून आपण इथे आला, आवर्जून आपण उपस्थित राहिला ह्याच्याबद्दल आपले जेवढे आभार मानावे तितके कमी आहे. आपण शेतकरी म्हणुन जेवढ काम करता आहे, आपण आपल्या शेतामध्ये जी मेहनत घेता आहे त्याच्यासाठी आपले आभार तर मानायलाच हवे कारण आपल्याशिवाय भारत देश जगू शकत नाही, आपल्याशिवाय दुनिया जगू शकत नाही, आणि त्याच्यासाठी आपण सर्व शेतकऱ्यांचे नक्कीच आभार मानले पाहिजेत आणि मी आज आपल्या व्यासपीठावर आलेल्या सर्व पाहुण्यांचेही आभार मानतो की जे काही त्यांचे कार्यक्रम होते त्याच्यातुन वेळात वेळ काढून आपण सर्व इथे आलात त्याच्याबद्दल आपलेही आभार मानतो. पण शेवटी सर्वात महत्त्वाचा विषय शेतकऱ्यांचाच आहे. आणि आज आपण आता ऐकू या की जी एक मान्यवर मंडळी आहे त्यांच्याकडून ऐकू या की शेती आणि शेतकऱ्यासाठी आता पुढच्या काळात त्यांनी पुढे काय करावं याच्याबद्‌ल आपण त्यांच्याकडून आपण मार्गदर्शन ऐकू या. आणि आपण आज आलात ह्याच्याबद्दल परत आपले आभार मानुन मी माझे प्रस्ताविक संपवितो.



प्रक्रियेसाठी व रोजच्या खाण्याकरीता टिश्यूकल्चर पद्धतीने आठ वर्षे संशोधन करून जैन इरिगेशनने मोसंबीचे जे नविन तीन वाण तयार केले त्याची रोपे अजित जैन हे शरद पवार यांना दाखवित असून आता ही रोपे शेतकऱ्यांना लागवडीसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यावेळी शेजारी अशोक जैन, अनिल जैन, अरूण गुजराथी, ना.धो. महानोर व रणजित पवार



# माझी नेदरलँडला भेट


**डॉ. दि. मा. मोरे**
अध्यक्ष
महाराष्ट्र सिंचन सहयोग
मोबा. ९४२२७७६६७०



महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यातील शिरसोली या खेड्याच्या परिसरात जैन हिल्स येथे स्व. भवरलालजी जैन (मोठे भाऊ) यांनी शून्यापासून सुरुवात करुन जैन इरिगेशन सिस्टीम्स लिमिटेड (जेआयएसएल) हा कृषी आधारित उद्योग निर्माण केला आणि यातून हजारो / लाखो ग्रामीण युवकांना प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध करुन देऊन शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडविण्याचा अविरत प्रयत्न केला. या व्यवसायाचा पसारा जगातील १२० पेक्षा जास्त देशात पसरलेला आहे. भाऊंना जाऊन दोन वर्षाचा काळ लोटत आहे. त्यांचा पिंड शेतकऱ्याचा होता आणि जीवनभर त्यांनी शेती, पाणी, वनस्पती, ऊर्जा, पर्यावरण या ग्रामीण जीवनाशी निगडीत विषयाचा पाठपुरावा केला. शेतकऱ्यांचे जीवनमान शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नावर अवलंबून असते. पाणी हा कृषीचा आत्मा असतो. पाणी हे नैसर्गिक संसाधन मानवाच्या विकासासाठी हाताळण्यामध्ये जे देश यशस्वीपणे वाटचाल करतात त्याच देशाचे पाऊल जगामध्ये पुढे पडलेले असते. जल व्यवस्थापनातील अपयश व्यक्तीला, समाजाला आणि देशाला दारिद्र्याकडे घेऊन जात असते. भाऊंनी या विचाराची गांभीर्यता जाणलेली होती. निसर्गाने उपलब्ध करुन दिलेले पाणी हे मर्यादित आहे. त्याला अमर्यादित मानवी कौशल्याची जोड देऊन त्यातून जास्तीत जास्त संपत्ती आणि रोजगार निर्मितीचे लक्ष गाठता येते. ही वास्तविकता सिध्द करणारे अनेक प्रयोग भाऊंनी त्यांच्या हयातीत करुन दाखविले. जवळपास दरवर्षी महाराष्ट्रातीलच नाही तर देशातील हजारो शेतकरी कांद्याचे पीक घेत असताना आर्थिक चढ उताराचे अनेक आघात सहन करतात. कशासाठी पिकविला इतका कांदा, यामुळे ते त्रस्त होतात. अशी स्थिती टोमॅटो, डाळींब यासारख्या भाजीपाला आणि फळझाडांच्या पिकांची पण होते. अशा हेलकाव्याला जळगाव परिसरातील शेतकरी मात्र दाद देत नाहीत. ज्या पिकावर जैन इरिगेशन या उद्योग समुहाकडे प्रक्रिया करण्याची आणि देशांतर्गत आणि देशाबाहेर विक्री करण्याची क्षमता आहे त्या पिकाच्या बाबतीत जळगाव परिसरातील शेतकरी निश्चिंत असतो. अनेक शेतकरी जेआयएसएल बरोबर कराराची शेती करुन उत्पादन वाढवत असतानाच भरवशाची बाजारपेठ मिळविण्यात यशस्वी झालेले आहेत. शेती उत्पादनाला किफायतशीर भाव मिळवून देण्याचे उत्तर कृषी आधारित प्रक्रिया उद्योगामध्ये असते. अतिरिक्त कृषी उत्पादने साठविण्यासाठी चांगल्या गुणवत्तेची गोडाउन्स, शीतगृहाची उपलब्धी हे महत्वाचे घटक आहेत. बाजारात भाव पडू लागले तर माल साठवता येतो आणि योग्य वेळी विक्री करता येते. शेतकऱ्यांसाठी अशा सुविधा अल्पशा भाडे तत्वावर व तारण सुविधेवर उपलब्ध असाव्या लागतात. शासनाच्या आयात निर्यातीच्या धोरणाचपण शेतकऱ्याच्या उत्पादनाला बाजारात मिळणाऱ्या दरावर परिणाम होत असतो. शेतकऱ्याकडून मालाची



कांताई बंधाऱ्यावरती मोठ्या भाऊंसमवेत श्री. अशोक जैन, श्री. अनिल, श्री. अजित जैन व श्री. अतुल जैन

आवक जास्त होत असताना त्याच पिकाची बाहेरच्या देशातून आयात करणे शेतकऱ्याला बाधक ठरते.

२०१६-१७ मध्ये देशांतर्गत तुरीचे उत्पादन भरपूर झाले व बाजारात तुरीची आवक वाढली. नेमके याच काळात इतर देशाशी केलेल्या जुन्या करारामुळे तुरीच्या डाळीची आयात चालू राहिली आणि तुरीचे भाव कोसळले. शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागला. शासनाच्या आयात निर्यात धोरणातील कच्चेपणा यातून दिसून आला. व्यापाऱ्यांवर वचक बसविण्यासाठी शासनाने ठरवून दिलेल्या वाजवी आधारभूत किंमतीचा शेतकऱ्यांना फायदा होतो. नुकतेच फेब्रुवारी २०१८ मध्ये केंद्र सरकारने पीक उत्पादन खर्चाच्या दीडपट आधारभूत किंमत ठरविण्याचा निर्णय घेतलेला आहे. यासाठी प्रसंगी शासनाकरवी शेतमाल खरेदी करण्याची सक्षम व प्रामाणिकपणे काम करणारी व्यवस्था असणे गरजेचे आहे. शासनाचा खरेदी व्यवस्थेमध्ये गुंतलेला अधिकारी व कर्मचारी वर्ग शेतकऱ्यांबरोबर संवेदनशीलपणे व्यवहार करणारा असावयास हवा. अन्यथा आधारभूत किंमतीपेक्षा कमी किंमतीला व्यापाऱ्याला शेतकऱ्यांना माल विकावा लागतो. २०१७-१८ या वर्षात तूर व सोयाबीन पिकासाठी हाच अनुभव आला आहे. केवळ आधारभूत किंमत वाढवून शेतकऱ्यांचे प्रश्न सुटतातच असे नाही. उत्पादन खर्च कसा ठरवावा याबाबतपण संभ्रम आहे. अशा अनेक बाबींचा पिकाला मिळणाऱ्या दरावर परिणाम होत असतो. मध्यप्रदेश सारख्या काही राज्यात भावांतराची योजना राबविण्यात येत असल्याचे समजते. या सर्व घटकांचा एकत्रितपणे विचार करण्याची आवश्यकता असते. दुर्दैवाने आपल्या देशामध्ये अशा एकात्मिक विचाराचा अभाव असल्यामुळे भाव पडतात आणि शेतकऱ्यांचे नुकसान होते.

'जैन इरिगेशन' ने काही पिकांच्या बाबतीत परिसरातील शेतकऱ्यांना आधार देऊन फार मोठे काम केलेले आहे. शेतीमालावर प्रक्रिया करणारे जैन इरिगेशन सारखे उद्योग प्रत्येक जिल्ह्यात आणि पुढे चालून तालुका स्तरापर्यंत निर्माण करण्याची गरज आहे. यामुळे शेतकऱ्याची लुबाडणूक थांबेल आणि ग्रामीण पातळीवर मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल. या देशामध्ये काम करु शकणाऱ्या मनुष्यशक्तीला बाराही महिने रोजगार उपलब्ध करुन देणे ही फार मोठी गरज आहे. देशामध्ये बेरोजगार लोकांचा आकडा २ कोटी पासून १० कोटीपर्यंत (लोकसंख्येच्या साधारणत: ५ टक्के) सांगितला जातो. राज्यामध्ये हा आकडा काही लाखामध्ये असावा. शहराकडे होणारे स्थलांतरण थांबवण्यासाठी ग्रामीण पातळीवर

रोजगार उपलब्ध होणे फार महत्वाचे आहे. स्व. भवरलालजी जैन यांना ही दूरदृष्टी होती आणि म्हणून त्यांनी उद्योगाचा पसारा जळगाव जिल्ह्यातील ग्रामीण भागात निर्माण केला. जैन इरिगेशनचे मुख्यालय शिरसोली सारख्या खेड्यात असेल आणि या उद्योगाच्या शाखा मात्र मुंबई, मद्रास, न्यूयॉर्क यासारख्या मोठ्या शहरामध्ये असतील असे ते सहजपणे म्हणत असत. देशाला भेडसावणाऱ्या बेरोजगारीच्या प्रश्नांच्या सोडवणुकीची दिशा त्यांनी त्यांच्या कृतीतून घालून दिलेली आहे. एक द्रष्टा उद्योगपती म्हणून त्यांच्या विचाराचे वेगळेपण यातून दिसून येते.

भाऊंना पाण्याबद्दल फार आपुलकी आणि जिव्हाळा होता. जळगाव परिसर राज्याच्या अवर्षण प्रवण क्षेत्रात मोडतो. कमी पावसाचे आणि दुष्काळाचे झटके वारंवार बसत असल्यामुळे पाण्यामध्ये स्वयंपूर्णता मिळविण्यासाठी त्यांचा खटाटोप सतत चालत असे. पडणारा पाऊस साठवून ठेऊन त्याचा वापर वर्षभर करण्यासाठी जैन हिल्स परिसरात त्यांनी अनेक प्रयोग केले. जवळूनच वाहणाऱ्या गिरणा नदीवर शासनाबरोबर करार करुन स्वखर्चाने काँक्रीटचा बंधारा बांधून पाणी अडविण्यात आले. त्याचे त्यांना खूप समाधान वाटत असे. निसर्गाच्या मर्जीप्रमाणे दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या पावसाचे गणित समजून घेऊन त्याची साठवणूक आणि त्यातून त्याचा काटकसरीने वापर करुन शेती आणि उद्योग व्यवसायातून जास्तीत जास्त उत्पन्न मिळविण्याठी देशात कुशल आणि प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करण्याचा विचार त्यांच्या सतत चिंतनात असे. त्यांच्या अकाली जाण्यामुळे हे काम राहून गेले. त्यांच्या पुढच्या कर्तबगार पिढीने पाणी या विषयाला वाहिलेले एक स्वतंत्र विद्यापीठ जैन हिल्स परिसरात उभे करण्याचे मनावर घेतलेले आहे. पाणी, कृषी, ऊर्जा आणि ग्रामीण विकास हे विद्यापीठाचे चार स्तंभ राहाणार आहेत. अशा प्रकारचा देशातील हा पहिला प्रयोग असावा.

जगामध्ये युरोप खंडातील नेदरलँड या देशातील डेल्फ या लहानशा ८० हजार लोकवस्तीच्या (यामध्ये २० हजार विद्यार्थी आहेत) गावात 'आयएचई' डेल्फ (International Institute for Hydraulic and Environmental Engineering) नावाची आणि युनेस्को या संस्थेच्या सहभागाने पाण्याच्या शिक्षण, प्रशिक्षण आणि संशोधन या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करणारी (इन्स्टिट्यूट फॉर वॉटर एज्युकेशन) संस्था आहे. या जगप्रसिध्द संस्थेने १९५७ पासून जवळपास १६२ विकसनशील देशातून १५ हजारापेक्षा जास्त एमएससी पदवीधारक आणि १०० पेक्षा जास्त पीएचडी धारक निर्माण केलेले आहेत. आयएचई डेल्फ ही संस्था ढोबळमानाने जल अभियांत्रिकी, जल व्यवस्थापन, पर्यावरण, सॅनिटेशन आणि वॉटर गर्व्हनन्स या क्षेत्रात शिक्षण,



नेदरलँड डेल्फ शहराचे हे आकाशातून घेतलेले छायाचित्र

संशोधन याबरोबरच क्षमता विकास करण्यासाठी गेल्या अनेक वर्षापासून काम करीत आहे. पाण्याच्या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर पदव्युत्तर शिक्षण देणारी जगाच्या पाठीवरील ही सर्वात मोठी संस्था आहे. ही संस्था पदव्युत्तर, पीएचडी या अभ्यासक्रमाबरोबरच अनेक अंशकालीन अभ्यासक्रमपण राबविते. जगातील अनेक देशांच्या शैक्षणिक संस्थेबरोबर या संस्थेने संबंध प्रस्थापित केलेले आहेत. नुकतेच महाराष्ट्रातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाबरोबर नागरी सांडपाणी याविषयावर अभ्यासक्रम चालू करण्याच्या दृष्टीने या संस्थेचा करार झाला असल्याचे समजले. डेल्फ येथील संस्थेत पदवी संपादन करण्यासाठीचा खर्च जवळपास ५० हजार युरो (रु. ४० लक्ष) असल्याचे समजले. बऱ्याचशा विद्यार्थ्यांना त्यांच्या देशाकडून शिष्यवृत्ती मिळते. डच शासनाकडून जवळपास ४० टक्के विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या खर्चाइतकी शिष्यवृत्ती दरवर्षी बहाल केली जात असल्याचे समजते. या संस्थेचे नेदरलँडच्या डच वॉटर सेक्टर बरोबरपण घट्ट संबंध आहेत. युनायटेड नेशनने पाण्याच्या क्षेत्रात पुढच्या पिढीला शिक्षण आणि प्रशिक्षण देण्यासाठी आयएचई डेल्फ या संस्थेला जागतिक स्तरावर मान्यता दिलेली आहे. ही संस्था नेदरलँड स्थित 'पाणी प्रतिष्ठान' (एनजीओ) संचलित आहे आणि नेदरलँडच्या डच शासनाशी त्यांचे फारच मर्यादित प्रशासकीय संबंध आहेत. जागतिक वलय असलेली ही संस्था देशाच्या शासन आणि प्रशासन या व्यवस्थेपासून पूर्णपणे स्वायत्त राहून काम करते, यातच यांचे वेगळेपण सामावलेले आहे. आपल्या देशामध्ये असे वातावरण केंव्हा निर्माण होणार आहे याची वाट पाहावी लागेल. जळगाव स्थित निर्माण होणाऱ्या पाण्याच्या विद्यापीठाला आयएचई डेल्फ या संस्थेशी जवळीक साधावी, असे वाटणे, हे देखील फार मोलाचे आहे असे वाटून जाते.

आयएचई डेल्फ या संस्थेशी संवाद साधण्यासाठी, संस्थेतील विद्याशाखांची रचना, अभ्यासक्रम, परिक्षा पध्दती इ समजून घेण्यासाठी जेआयएसएल जळगाव या उद्योगसमूहाच्या वतीने सहा जणांचा अभ्यास गट जानेवारी २०१८ च्या दुसऱ्या आठवड्यात नेदरलँडला पाठविण्यात आलेला होता. त्यात सहभागी होण्याची मला संधी मिळाली याचा मला आनंद होतो आणि याबद्दल जैन इरिगेशन ऋणपण व्यक्त करावेसे वाटते.

एका आठवड्याच्या अवधीत नेदरलँडच्या दिल्ली येथील वकीलातीमध्ये व्हिसा मिळाला आणि पॅरिसमार्गे संध्याकाळी ४ च्या दरम्यान ॲमस्टरडॅम या राजधानीच्या ठिकाणी आम्ही उतरलो. आमचा मुक्काम डेल्फ या साठ सत्तर किमी अंतरावरील गावीच होता. रेल्वे ऐवजी टॅक्सीने डेल्फला येणे झाले. ड्रायव्हर पाकिस्तानातील लाहोर या ठिकाणाहून दोन एक पिढ्यापूर्वी नेदरलँडला स्थलांतरीत




नेदरलँड देशाच्या डेल्फ या गावात पाणी या विषयाचे शिक्षण देणारी जगातील प्रसिद्ध 'आयएचई' ही संस्था.



ॲमस्टरडॅम शहर



रोटरडॅम बंदर

झालेला होता. भारत (पाकिस्तानसह) आणि नेदरलँडमध्ये सहजपणे जाता जाता त्याने तीन बाबींचा उल्लेख केला. ’तुमच्या देशात १०० रुपयाचा भ्रष्टाचार करणाऱ्याला शिक्षा होते आणि करोडो रुपये बुडविणाऱ्याला मात्र मोकळे सोडले जाते. नेदरलँडच्या लोकांनी समुद्र हटवून शहरे निर्माण केलेली आहेत. भारतीयांना मात्र अनेक शतकापासून निर्माण झालेला खंडप्राय देश विनासायास मिळालेला आहे आणि म्हणून लोकांना देशाबद्दल आस्था आणि कदर नाही. भारतामध्ये वस्ती वाढते, शहरांचे, गावांचे आकार वाढतात आणि नंतर अरुंद रस्ते रुंद करण्याचा अयशस्वी प्रयत्न होतो. पाण्याचे नळ, ड्रेनेज, विद्युत, टेलिफोन इ साठी रस्ते कोरुन जागा मिळविण्याचा प्रयत्न होतो. नेदरलँडमध्ये तसे होत नाही. प्रथम गावाचा नकाशा तयार केला जातो आणि त्याप्रमाणे सर्व प्रथम पायाभूत सोयी निर्माण केल्या जातात, तदनंतर बांधकामास सुरुवात होते.’ त्याच्या अनुभवावरुन वास्तविकतेकडे तो आमचे लक्ष वेधत होता. निमूटपणे ऐकण्याखेरीज पर्याय नव्हता. एक, सव्वा तासाच्या प्रवासात तो खूप काही सांगून गेला. नेदरलँड हा कालव्यांचा देश आहे. पूर्वी कालव्यातून वाहतूक केली जात असे. अलिकडे पण थोडीबहुत होते व पर्यटनासाठी त्याचा जास्त उपयोग केला जातो. वाहतुकीसाठी दगडी पेव्हर ब्लॉक अंथरलेले चार, सहा लेनचे रुंद रस्ते दिसले. मुख्य रस्त्याला लागून निवासी लोकांच्या वापरासाठी सर्व्हिस रोड होते. पायी चालणाऱ्यांसाठी अडथळ्याविना पदपथ व सायकल ट्रॅक होते. याच्या जोडीला कालव्यातून चालणारी फेरी बोट, रेल्वे, मेट्रो आणि



नेदरलँडमधील या जुन्या पवनचक्क्यांना आता शंभरवर्षे झाली आहेत.

ट्रामचीपण व्यवस्था होती. ७०-७५ हजार वस्तीच्या डेल्फ या शहरवजा गावासाठी वाहतुकीच्या इतक्या सोयी पाहून सुखद धक्का बसू लागतो. भारतातील गावांच्या आणि शहरांच्या रस्त्याची रुंदी, काही अपवाद वगळता, २० ते ३० फुटाच्या पलिकडे जात नाही. अर्बन प्लॅनरलापण यात काही चूक वाटत नाही. दोन विचारातील हे अंतर आहे. रस्त्यावर दारिद्र्य, झोपडपट्टी, भिकारी इ दिसत नाहीत. अपवादालापण रस्त्यावर राजकीय वा इतर कोणाच्याही नावाचे फोटो असलेले फलक दिसले नाहीत. जानेवारी महिना असल्यामुळे तापमान शून्याच्या आसपासच होते. दिवस लहान आणि रात्र मोठी होती. लोकांच्या व्यवहारात मात्र काहीही फरक जाणवत नव्हता. ॲमस्टरडॅमहून तासाभराच्या अंतरावर हेग हे शहर आहे आणि या शहरात युनोच्या आंतरराष्ट्रीय कचेऱ्या आहेत. विमानतळावरुन डेल्फकडे येताना रस्त्याच्या आजूबाजूला जुन्या काळात निर्माण केलेल्या पवनचक्क्या दिसल्या. या पवनचक्क्या विटाच्या पक्क्या बांधकामात उभारलेल्या आहेत. पवनचक्क्याची पाती मोठाली आहेत. इतिहासकालीन वारसा म्हणून या जुन्या पवनचक्क्या सुस्थितीत जपून ठेवलेल्या दिसल्या. पुरामध्ये जमीन दलदलीची होते. डच लोकांनी जल नि:सारणासाठी कालवे बांधले आणि कालव्याच्या किनाऱ्यावर पवनचक्क्या उभारुन कालव्यातील पाणी उपसा करुन नदीत सोडण्यासाठी पवन ऊर्जेचा वापर केला असल्याचे दिसून आले.

आयएचई डेल्फ या, शहरातच वसलेल्या संस्थेमध्ये दुसऱ्या दिवशी सकाळी ठरलेल्या वेळी आम्ही गेलो. प्रवेशद्वाराच्या स्वागतकक्षात थांबलो असतानाच दोन चार मिनिटाच्या आवधीतच एक महिला प्राध्यापक (विभाग प्रमुख) आमचे स्वागत करण्यासाठी आल्या आणि त्या पाठोपाठच संस्थेचे प्रमुख डॉ. इडी मूरस् स्वत: आले. आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या या संस्थेचा दर्जा विद्यापीठापेक्षा कमी नसावा. संस्थेच्या प्रमुखाला रेक्टर या नावाने ओळखले जाते. रेक्टर स्वत: आम्हा सर्वांना बैठकीच्या कक्षामध्ये घेऊन येतात. बरोबर तीन चार संबंधित प्राध्यापक बैठकीमध्ये सहभागी होतात. रेक्टर स्वत: पॉवर पॉईंटच्या माध्यमातून संस्थेबद्दल थोडक्यात माहिती देऊन आमच्याशी चर्चेला सुरुवात करतात. आयएचई ही साठ वर्षाची जुनी संस्था आहे. एमएससी आणि पीएचडी अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ४०० ते ५०० असल्याचे समजले. दिवसाकाठी साधारणत: ४५ मिनिटाचे आठ तास होतात. प्रत्येक तासानंतर १५ मिनिटाचा ब्रेक दिला जातो. बरेचसे भारतीय विद्यार्थी त्या संस्थेत शिक्षण घेत असलेले दिसले. संस्थेमध्ये १३९ जणांचा प्राध्यापक वर्ग असल्याचे समजले. जवळपास ३० टक्के प्राध्यापक हे बाहेरुन आमंत्रित

केले जातात. एमएससी पदवीचा अभ्यासक्रम दीड वर्षाचा असतो आणि पीएचडी साठी चार वर्षाचा कालावधी निश्चित केलेला आहे. संस्थेमध्ये प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना संस्थेकडून लॅप टॉप दिला जातो. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर तो संस्थेकडे परत केला जातो. लॅप टॉपच्या देखभाल दुरुस्तीची व्यवस्था संस्थेकडूनच संस्थेच्या आवारात करण्यात येत असल्याचे समजले. संस्थेच्या परिसरात धूम्रपान आणि अपेयपानाला पूर्णपणे निर्बंध घालण्यात आलेले अहेत. विद्यार्थी, प्राध्यापक, रेक्टर हे एकमेकांशी फारच मनमोकळेपणे आणि अनौपचारिक पध्दतीने वागत असल्याचे दिसले. शहरामध्येच नाहीतर पूर्ण देशात सायकलीचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात असल्याचे समजले. रस्त्यावरुन अनेक लोक सायकलवरुन येणे जाणे करत असल्याचे दिसले. संस्थेतील विद्यार्थी आणि प्राध्यापकपण सायकलचाच वापर करतात असे सांगण्यात आले. एक महिला प्राध्यापिका (तीन दिवस आमच्या बरोबर होत्या) दररोज ३० किमी अंतरावरुन सायकलवरुन येणे जाणे करत असल्याचे त्यांच्याकडूनच समजले. संस्थेतील पदाधिकाऱ्यांशी आमचा जो संवाद झाला त्यावरून स़ंस्थेचा प्रतिसाद फारच उत्साही आणि सकारात्मक दिसून आला. दोन दिवसाच्या चर्चेनंतर तिसऱ्या दिवशी डेल्फ पासून साठ किमी अंतरावर असलेल्या 'वॅगनइंगेन' कृषी विद्यापीठाला भेट देण्यासाठी संस्थेतून आम्ही बाहेर पडलो. न विसरता मुख्य प्रवेशद्वारापर्यंत रेक्टरसह प्राध्यापक गण आम्हाला निरोप देण्यासाठी आला. हा अनुभव माझ्यासाठी नवीन आणि विनयशीलतेची व्याख्या करणारा वाटला. 'विद्या विनयेन शोभते' याची तात्काळ आठवण झाली.

वॅगनइंगेन युनिव्हर्सिटी अँड रिसर्च (वॅगनइंगेन युआर/डब्ल्यू यू आर) हे नेदरलँड मधील शासकीय कृषी विद्यापीठ आहे. वॅगनइंगेन हे खेड्याचे नाव आहे. विद्यापीठाची नावे बदलून वेळ वाया घालवून वाद निर्माण करण्यात ते गुंतले नाहीत. आपण असे का शिकत नाही हा प्रश्न पडतो. या विद्यापीठामध्ये बीएससी, एमएससी आणि पीएचडी या पदव्यांचे 'लाईफ अँड सोशल सायन्सेंस' मध्ये शिक्षण दिले जाते. बीएससी पर्यंत डच या मातृभाषेत व पुढील शिक्षण इंग्रजी भाषेत दिले जाते. जागतिक दर्जाचे शिक्षण देणारे हे विद्यापीठ कृषी आणि वन या क्षेत्रात जगामध्ये पहिल्या क्रमांकाचे समजले जाते. १०० देशातून जवळपास ११ हजार विद्यार्थी (३ वर्षाचे २० बीएससी अभ्यासक्रम, २ वर्षाचे ३१ एमएससी अभ्यासक्रम आणि ४ वर्षाचे पीएचडी अभ्यासक्रम) या विद्यापीठात शिक्षण घेतात. विद्यापीठाचा विलोभनीय परिसर जवळपास २५० हेक्टरवर ऱ्हाईन नदीच्या सुपिक खोऱ्यात पसरलेला आहे. महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठाकडे हजारो हेक्टर जमीन संपादन करुन दिलेली आहे. विद्यापीठांना ही बाब न पेलवणारी ठरत आहे. पाण्याची



हॉलंडचे १४ ऑक्टोबर २०१० पासून पंतप्रधान असलेले श्री. मार्क रूटे (जन्म १४ फेब्रुवारी १९६७) हे स्वत: कार्यालयात रोज सायकलवरून येतात आणि कार्यालयाच्या बाहेर स्वत: सायकल पार्क करून ऑफिसात जातात. केवढे हे दुर्मिळ चित्र आहे.



नेदरलँड मधील वॅगेनइंगेन कृषि विद्यापीठ

उत्पादकता, जल नि:सारण, प्रिसिजन फार्मिंग, सुरक्षित शेती इ वर वेगवेगळ्या तज्ज्ञांकरवी विद्यापीठाच्या वतीने माहिती देण्यात आली. पाण्याची उत्पादकता तीन अंगाने (प्रती युनिट उत्पादन, उत्पन्न व सामाजिक– लाभ) तपासणे गरजेचे असल्याबद्दल प्रतिपादन करण्यात आले. विद्यापीठाची ग्लास पॉलिहाऊसमधील वेगवेगळ्या विषयावर संशोधनात्मक अभ्यास करणारी कृषी प्रयोगशाळा पाहण्यात आली. एका अभ्यासाने मन आकर्षून घेतले. वनस्पतीचे नायट्रोजन हे मुख्य अन्नद्रव्य आहे. सभोवतालच्या हवेत जवळपास ८० टक्के नायट्रोजन असतो पण वनस्पतीला तो थेट घेता येत नाही. काही विशिष्ट वनस्पती (डाळ व तेलबिया वर्गीय) जमिनीतील बॅक्टेरियाच्या मदतीने हवेतील नायट्रोजन शोषण करुन मुळावर गाठीच्या स्वरुपात साठवून ठेवतात व पिकाच्या वाढीला मदत करतात. पिकाच्या फेरपालटीचा बिमोड म्हणून दुसऱ्या पिकाला फायदा होतो. गहू, भात यासारख्या एकदलिय पिकामध्ये हा गुणधर्म नाही. या पिकाचे इतर पिकांशी संकर करुन त्याच्या मुळावर नायट्रोजन स्थिरीकरणाचा गुणधर्म आणण्यासाठी प्रयोग करत असल्याचे समजले. यात यश मिळवून याचा फायदा काही कोटी हेक्टर जमिनीची सुपिकता टिकविण्यासाठी/वाढविण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील असल्याचे सांगण्यात आले. यालाच मूलभूत संशोधन म्हणावे असे विचार मनामध्ये आले.

ड्रोन तंत्रज्ञानाच्या मदतीने साधारणत: ८० मीटर उंचीवरुन पिकाच्या वाढीचा (गुणवत्तेच्या दृष्टीकोनातून) अभ्यास करण्याच्या सुविधा शेतकऱ्यांसाठी उपलब्ध होत असल्याचे कळाले. पिकाची वाढ, नायट्रोजनची कमतरता, चढ उतार, ओलाव्याचे प्रमाण इ बाबतची अचूक माहिती कॅमेऱ्यामध्ये चित्ररुपाने मिळवून वेगवेगळ्या भागातील पिकाच्या वाढीतील दोषाचा अभ्यास करता येतो आणि त्यानुसार त्यावर वेळीच उपचार करुन उत्पादकतेत होणारी घट टाळता येते. विस्तीर्ण अशा शेतातील प्रत्येक फळझाडाची माहिती या तंत्रज्ञानाच्या मदतीने मिळवता येते. एका फेरीत साधारणत: ४० मीटर रुंदी व्यापली जाते आणि दिवसाकाठी जवळपास २५० हेक्टर जमिनीचे चित्रीकरण केले जाऊ शकते असेही समजले. ड्रोनच्या मदतीने पिकावर औषधाची फवारणी करण्याच्या तंत्राचा वापर वाढत असल्याचे कळते. फवारणीसाठी, ड्रोन कमी उंचीवर वापरावे लागते. भारतामध्ये सर्वसाधारणत: जमिनीचा आकार २ हेक्टर पर्यंत आहे. नेदरलँडमध्ये जमिनीचा आकार ३० ते ७० हेक्टर पर्यंत असल्याचे कळते. सद्यस्थितीत बटाटे या पिकासाठी प्रिसिजन फार्मिंगचा एक भाग म्हणून ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर बाहेरील देशात वाढत असल्याचे समजले. देशातील लहान आकाराच्या जमिनीसाठी ड्रोनच्या वापरावर मर्यादा येणारच. जळगाव परिसरातील केळीच्या बागासाठी प्रायोगिक तत्वावर ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर जैन इरिगेशपतर्फे हाती घेण्यात येणार असल्याचे समजते.

नेदरलँड (हॉलंड) हा युरोप खंडातील वेगळा देश आहे.





नेदरलँड शब्दाचा अर्थच खोलगट प्रदेश (सागरपातळीच्या खाली) असा होतो. या देशाचा बराचसा भूभाग (२६ टक्के) समुद्र हटवून तयार केलेला, समुद्र सपाटीपासून खालचा आणि मातीचे बांध (डॅम) घालून सुरक्षित केलेला आहे. केवळ ५० टक्के क्षेत्र एक मीटरच्या आसपास समुद्रसपाटीपासून वर आहे. या देशाचे एकूण क्षेत्रफळ ४१५४३ चौकिमी (४१.५ लक्ष हेक्टर) असून त्यापैकी जमिनीचा भाग ३३८९३ चौकिमी (जवळपास कोकण प्रदेशाइतका) आहे. उर्वरित भाग पाण्याखाली आहे. हा देश -हाईन, म्यूज आणि शेल्ड या तीन नद्या आणि त्यांच्या उपनद्या मध्ये वसलेला आहे. देशाचे हवामान समशीतोष्ण आहे. लागवडी खालील जमीन जवळपास २५ टक्के असून सिंचनाखालील जमीन केवळ ४.५ लक्ष हेक्टरच्या जवळपास आहे. पाण्याची उपलब्धी ९१ अब्ज घमी आहे (१ लक्ष घमी प्रति हे). महाराष्ट्रातील सरासरी पाण्याची उपलब्धी ७ हजार घमी प्रति हे आहे. तर कोकण वगळता उर्वरित महाराष्ट्रातील पाण्याची उपलब्धी केवळ ४५०० घमी इतकी आहे. चांगली आरोग्य सेवा, शिक्षण, पायाभूत सोयी आणि अनेक सामाजिक लाभ उपलब्ध करुन देणारा उदार मनाचा एक लोककल्याणकारी देश (मानवी विकास निर्देशांक वरच्या स्तरावरचा) म्हणून नेदरलँडची ख्याती आहे. देशाचे सरासरी तापमान जुलै ते सप्टेंबरमध्ये २०० से. च्या पुढे जाते तर डिसेंबर ते फेब्रुवारीमध्ये ते शून्याभोवती घुटमळते. वर्षाचे बाराही महिने सरासरीने दिवसाआड (सारखा) पाऊस पडतो. पावसाचे (बर्फासह) एकूण दिवस २०० पेक्षा जास्त आहेत. नोव्हेंबर ते एप्रिलमध्ये तुरळकपणे बर्फ पडतो. पावसाची वार्षिक सरासरी ८३५ मिमि (कोकण वगळता महाराष्ट्रातील पावसाच्या सरासरी इतका) आहे. वर्षभरात सुर्यप्रकाश केवळ १६०० तास (भारतात ३००० तास) असतो. कोकणातील पावसाचे दिवस १०० च्या आसपास आहेत तर देशावरील पावसाचे दिवस ५० च्या आसपास आहेत. दिवसाआड पडणारा पिकाच्या गरजेइतका पाऊस व कमी बाष्पीभवन हे नेदरलँडच्या हवामानाचे वैशिट्य आहे. तरीपण भाजीपाला व फुलाचे उत्पादन वाढविण्यासाठी ग्लास हाऊसेसचा वापर करण्यामध्ये जगात अग्रक्रमावर असलेला हा देश आहे.

प्रशासकीय दृष्टीने नेदरलँडचे बारा विभाग केलेले आहेत आणि पुढे हा देश जल व्यवस्थापनासाठी २४ वॉटर डिस्ट्रिक्ट मध्ये विभागण्यात येऊन त्याचे नियंत्रण 'जल मंडळाकडून' केले जाते. 'डच वॉटर बोर्ड' ही जगातील सर्वात जुनी (११९६) व सध्यापण कार्यरत असलेली लोकशाही प्रणीत व्यवस्था आहे. दर चार वर्षांनी जल बोर्डाच्या निवडणूका होत असल्याचे समजले. पाण्याची विपुलता असणाऱ्या देशात गेल्या हजार वर्षापासून जल व्यवस्थापनाची लोकशाही प्रणीत व्यवस्था जीवंत ठेवली जाते, हे ऐकूनच नवल वाटते. १२ व्या शतकापासून भारतावर परकियांच्या आक्रमणाची सुरुवात झालेली होती आणि देशाच्या वेगवेगळ्या भागातील लोकप्रणीत समन्यायी पाणी वाटपाच्या व्यवस्था स्वताकदीवर तग धरुन राहाण्याचा प्रयत्न करीत होत्या. १९ व्या

ग्रीनहाऊसमध्ये एकरी १०० टन टोमॅटोचे उत्पादन घेण्यापर्यंत नेदरलँडने मजल मारली असून हा उत्पादनातला जागतिक विक्रम आहे.





शतकातील पारतंत्र्याच्या काळात लोकप्रणीत जल व्यवस्थापनाला हादरे बसण्यास सुरुवात झाली व काळाच्या ओघात त्याचे आस्तित्व संपुष्टात आले. त्यावर मात करणे आज जवळ जवळ दुरापास्त ठरत आहे. नेदरलँड हा भारतासारखाच संसदीय लोकशाही असलेला देश आहे. राजा हा राष्ट्रपती सारखी भूमिका बजावतो व प्रजेमध्ये त्याला आदराचे स्थान आहे.

नेदरलँडची शेती पूर्णत: निर्यातीवर लक्ष ठेऊन केलेली यांत्रिकी शेती आहे. जवळपास ४ टक्के जनतेला यातून रोजगार मिळतो. कृषी उत्पादनाच्या निर्यातीमध्ये हा देश युरोपात पहिला तर जगामध्ये दुसऱ्या क्रमांकावर (पहिला क्रमांक अमेरिका) आहे. टोमॅटोच्या जगातील एकूण निर्यातीमध्ये या देशाचा वाटा २५ टक्क्याच्या आसपास आहे. मिरची, टोमॅटो आणि काकडी या भाजीपाल्याच्या एकूण निर्यातीच्या १/३ व्यापार या देशातून होतो असे समजते. जगातील सफरचंदाच्या निर्यातीतील जवळपास ७ टक्के वाटा एकट्या नेदरलँडचा आहे. फुलाच्या उत्पादनासाठी नेदरलँड जगामध्ये प्रसिध्द आहे आणि जगातील एकूण निर्यातीत २/३ वाटा या देशाचा आहे. ट्यूलिप हे हॉलंडचे राष्ट्रीय फूल आहे. विपूल पाणी आणि सुपिक जमीनीमुळे उत्पादकता जास्त आहे. पिकाच्या पाण्याची बरीचशी गरज ही पाऊस आणि भूजलातूनच भागते. सपाट जमीनीवर जल नि:सारणासाठी कालव्याचे जाळे निर्माण केलेले आहेत. जमिनीतून पाण्याचा निचरा करण्यासाठी कालव्याचा वापर केला जातो. डेल्फच्या आसपास प्रवास करत असताना गवताळ जमीन आणि ग्लास पॉलिहाऊसचे जाळे विपूल प्रमाणात दिसून आले. जगामध्ये सर्वात जास्त हरितगृहे (ग्लास हाऊसेस) या देशात आहेत. हरितगृहाने व्यापलेले एकूण क्षेत्र १०५०० हेक्टरपेक्षा (एकूण भू क्षेत्राच्या ०.२५ टक्के) जास्त आहे. जगामध्ये जवळपास ३६ लाख हेक्टर जमीनीवर हरितगृहे निर्माण करण्यात आलेली आहेत. देशातील जलव्याप्त क्षेत्रावरपण तरंगती

हरितगृहे निर्माण करण्यात आलेली आहेत. हरितगृह निर्मितीचा व्यवसाय करणाऱ्या जवळपास ४ हजार संस्था या देशात आहेत आणि यातून दिड लाख लोकांना रोजगार निर्माण करुन दिलेला आहे असे कळते. हरितगृहामधून होणारा भाजीपाला, फळे, फुले इ च्या उत्पादनाची अंदाजे किंमत ७.२ अब्ज युरो (जवळपास ६०० अब्ज रुपये ) आहे आणि यातील ८० टक्के माल निर्यात केला जातो. सिंचनासाठी ठिबक आणि तुषार सिंचनाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात असल्याचे समजते आणि यासाठी नद्यांचे पाणी कालव्यामध्ये वळविले जाते. गरजेनुसार भूजलाचापण वापर केला जातो. पशुपालन आणि दुग्ध व्यवसायासाठी हा देश प्रसिध्द आहे. शहरामध्ये चीज विकणारी दुकाने जागोजागी दिसतात. या दुकानात वेगवेगळ्या चवीचे आणि उत्कृष्ट दर्जाचे चीज उपलब्ध होते. डच नागरिकांना चीज खाणे आवडते. शेतीमध्ये मका, गहू व बटाटे या पिकांचे उत्पादन घेतले जाते. इलेक्ट्रॉनिक्स, चीज, फुले, नैसर्गिक गॅस आणि ऑईल रिफायनरीज इ उद्योग देशामध्ये राबविले जातात. रोटरडॅम हे युरोप खंडातील सर्वात मोठे बंदर आहे. देशामध्ये गॅस व कोळशाच्या खाणी आहेत. विद्युत निर्मिती गॅसवर आधारित आहे. कुरणाची शेती व पशुपालन (गायी व मेंढ्या) मोठ्या प्रमाणात केले जाते.



नेदरलँडमधील चीज ही आता जगातल्या ग्राहकांची आवडीची वस्तु बनली आहे.

देशाच्या १.७ कोटी लोकसंख्येमध्ये ५० टक्के निधर्मी, ४४ टक्के ख्रिश्चन, ५ टक्के मुस्लीम व १ टक्का हिंदू व इतर धर्मीय आहेत. ५० टक्क्यापेक्षा जास्त लोक एकदापण चर्चमध्ये गेलेले नाहीत. बहुजनांची भाषा डच आहे आणि इंग्रजीचा वापर व्यवहारामध्ये मोठ्या प्रमाणात आहे. या देशाचे दरडोई उत्पन्न ४४५०० डॉलर (३० लाख रुपये) आहे. भारताचे दरडोई उत्पन्न १ लाख रुपयाचा आकडा ओलांडत आहे. या देशाचा मानवी विकास निर्दे शांक ०.९२ आहे. जगाच्या पाठीवरील दाट लोकसंख्या असलेला हा देश आहे. देशातील १०० टक्के लोकांना स्वच्छ पाण्याचा पुरवठा केला जातो. सांडपाण्याच्या प्रत्येक थेंबावर प्रक्रिया करुन ते स्वच्छ केले जाते. या देशात २ कोटी सायकली (लोकसंख्येपेक्षा जास्त) आहेत. ॲमस्टरडॅम या राजधानीच्या शहराची लोकसंख्या जवळपास ८.५ लक्ष आहे आणि शहरात १७ लक्ष (माणशी दोन) सायकली आहेत असे समजते. दुर्दैवाने आपल्या देशामध्ये सायकलची जागा स्कूटर व मोटारसायकलीने घेतलेली आहे. सायकल हे पर्यावरण पूरक व आरोग्याला लाभदायी असलेले वाहन आहे. नेदरलँडचे पंतप्रधानसुध्दा सायकलवरुन कार्यालयात जातात असेही वाचण्यात आले. भारतामध्ये सायकलवरुन फिरणे (बऱ्याच ठिकाणी शक्य नाही) गरीबीचे लक्षण समजले जाते आणि वाहनाच्या प्रकारावरुन माणसांची प्रतिष्ठा अजमावली जाते. दोन देशाच्या विचारातील हे अंतर बरेचकाही सांगून जाते. देशाचे आर्युमान ८३ वर्षाचे आहे. डच लोक जगात सर्वात जास्त उंच (१.८१ मी) आहेत. लोकसंख्या वाढीचा दर फारच कमी आहे. जगाला नेदरलँडची ओळख, कालव्याचा देश, फुलांचा देश, सायकलींचा देश, पवनचक्क्यांचा देश आणि चीजचा देश या पाच घटकावरुन होत आहे. एका सुखी, समाधानी आणि आनंदी देशाला भेट दिल्याचा अनुभव घेत भारताकडे परतावे लागले.

■ ■ ■

नदीच्या काठी गायींना चरण्यासाठी निर्माण करण्यात आलेली हिरवीगार कुरणे हे ही नेदलँडचे वैशिष्ट्य आहे.









# आता शेतकऱ्यांना नवी संधी मसाल्याचे पदार्थ उत्पादन करण्याची









# जैन इरिगेशन मसाला पिकातही करार शेतीचे धोरण राबविणार

जगातील सर्व लोकांच्या भोजनात कमी-अधिक प्रमाणात का होईना मसाल्याच्या पदार्थांचा वापर होत असतो. त्यामुळे मसाल्याच्या पदार्थांचा जागतिक व्यापार ही खूप मोठ्या प्रमाणावर विकसीत झालेला आहे. ब्रिटीश मूळात भारतात आले ते मसाल्यांच्या व्यापारासाठीच. ईस्ट इंडिया कंपनीच्या मार्फत ते मसाल्याचे पदार्थ, चहा, कापूस, ताग, नीळ, तलम, बहमली वस्त्र यांसारख्या वस्तु व कच्चा माल घेऊन जात होते आणि त्यातल्या काही मालावर प्रक्रिया करुन किंवा तो पक्का करुन हिंदुस्थान आणि जगभर विकत होते. मसाल्यांमुळे अन्नपदार्थांना चव येत असल्याने आणि चवी चवी घेऊ घास ही प्रवृत्ती जगभर वाढत असल्यामुळे मसाले व मसाल्याच्या पदार्थांना जगातून मोठ्या प्रमाणात मागणी येत आहे. आज अमेरिका, मेक्सिको, जपान, मलेशिया, जर्मनी, पाकिस्तान, सिंगापुर, नेदरलँन्डस, युनायडेट किंगडम आणि श्रीलंका या देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर मसाल्याच्या पदार्थांची आयात करतात. दिवसेंदिवस हा व्यापार वाढत चाललेला आहे आणि जगभरच्या ग्राहकांना दर्जेदार व अत्यंत उत्कृष्ट प्रतिचे मसाल्याचे पदार्थ हवे आहेत. त्यांची ही मागणी काही प्रमाणात तरी पूर्ण करावी आणि या मसाल्याच्या व्यापारात आपणही खारीचा वाटा उचलावा या उद्देशाने जैन इरिगेशन उद्योग समुहाने मसाल्याच्या पदार्थांवर प्रक्रिया करणारा एक नवीन कारखाना नुकताच जळगावमध्ये सुरु केला आहे. या प्रकल्पाचे उद्घाटन ३० मार्च रोजी माजी केंद्रीय कृषिमंत्री खासदार श्री. शरद पवार यांच्या शुभहस्ते आणि राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री व जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री श्री.चंद्रकांतदादा पाटील, कृषिमंत्री श्री. भाऊसाहेब फुंडकर, जलसंपदा मंत्री श्री. गिरीश महाजन, उर्जामंत्री श्री.चंद्रशेखर बाबनकुळे, पाणीपुरवठा मंत्री श्री.बबनराव लोणीकर, राज्यमंत्री श्री. गुलाबराव पाटील, माजी मंत्री श्री. एकनाथराव खडसे, महापौर श्री. ललित कोल्हे, जैन इरिगेशनचे अध्यक्ष श्री. अशोक जैन, व्यवस्थापकीय संचालक श्री. अनिल जैन यांच्या उपस्थितीत झाले. कंपनीचे सह-व्यवस्थापकीय संचालक श्री. अजित जैन, श्री. अतुल जैन आणि मसाला प्रकल्पाचे प्रमुख श्री. एस.टी. घोडके यांनी सर्व मान्यवरांचे व पाहुण्यांचे स्वागत करुन त्यांना प्रकल्पाची माहिती दिली.

जैन उद्योगसमुहाच्या या मसाला फॅक्टरीमध्ये आले, हळद, मिरची, धने, जिरा व काळी मिरी या सहा पदार्थांवर प्रक्रिया करुन मसाले बनविण्यात येणार आहेत. हे मसाले पावडर, पेस्ट आणि छोटे छोटे तुकडे या तीन प्रकारात असणार आहेत. वर्षभरात साधारणपणे २४ हजार टन मसाले कंपनी बनविणार आहे. प्रक्रिया करण्यासाठी सर्व कच्चा माल हा थेट शेतकऱ्यांकडून खरेदी करण्याचे



प्रयोगशाळेत बरणीतील मसाले पाहताना श्री. शरद पवार, श्री. अशोक जैन, श्री. अरूण गुजराती व श्री. सुरेश जैन.

कंपनीने ठरविले असून त्यासाठी कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगचे मॉडेल (करार शेती) वापरण्यात येणार आहे. गेल्या १८ वर्षांपासून कंपनी हे मॉडेल पांढरा कांदा खरेदी करण्यासाठी धुळे व जळगाव जिल्ह्यात वापरीत असून ते अत्यंत यशस्वी व शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय झालेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनाही ही मसाल्याची पिके उत्पादित करण्याची संधी नव्याने प्राप्त झाली आहे. कंपनी या सर्व पदार्थांचे खरेदीचे दर अगोदरच ठरवून देणार आहे. त्यामुळे बाजारभावाची हमखास खात्री मिळाल्यामुळे व मालाचा उठाव होण्याची निश्चिती झाल्याने शेतकऱ्यांना माल कुठे विकावा असा प्रश्न निर्माण होणार नाही. त्याने उत्पादित केलेल्या मालाला जैन कंपनी हे खात्रीचे गिऱ्हाईक आहे आणि ते थेट शेतकऱ्यांकडूनच माल खरेदी करणार असल्यामुळे मधल्या दलाल, एजंट यांचे कमिशन वाचून दोन पैसे



जैन इरिगेशनने नव्याने उभारलेल्या मसाला प्रकल्पाचे श्री. शरद पवार उद् घाटन करताना शेजारी श्री. बबनराव लोणीकर, श्री. भाऊसाहेब फुंडकर, श्री. दलीचंद जैन, श्री. सुरेश जैन, श्री. अनिल जैन, समोरील बाजूस श्री. चंद्रकांत पाटील, श्री. चंद्रशेखर बावनकुळे, श्री. एकनाथ खडसे, श्री. अशोक जैन, श्री. गुलाबराव पाटील, श्री. शिरीष चौधरी, श्री. गिरीश महाजन, श्री. अजित जैन व श्री. ललित कोल्हे

शेतकऱ्याला जास्तीचे मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

शेतकऱ्यांच्या दृष्टीने एक अत्यंत महत्वाची गोष्ट म्हणजे त्याने उत्पादित केलेले माल वाळविण्याची, सुकविण्याची काहीही गरज नाही. उत्पादित झाल्याबरोबर ओला असलेला माल त्यांनी कंपनीला आणून दिला तरी तो कंपनी खरेदी करणार आहे. या ओल्या मालावर निर्जलीकरण करण्याची म्हणजे त्यातले पाणी काढून टाकून तो सुकविण्याची व्यवस्था करणारी यंत्रसामुग्री प्रकल्पात बसविलेली आहे. त्यामुळे हिरव्या मिरचीचा सुद्धा मसाला होणार आहे. आपण बहुतेक सर्वजण मिरच्या लाल रंगाच्या होईपर्यंत झाडावर ठेवतो. पूर्ण लाल झाल्यावर त्या तोडून वाळवितो आणि मग त्यापासून मसाला बनवितो. शेतकरी किंवा मधले पुरवठादार व एजंट हे सगळे ओले पदार्थ उघडयावर सूर्यप्रकाशात वाळवितात. त्यामुळे त्यात बरीच घाण जाते. जीवजंतू जातात. रंग टिकून राहात नाही. यामध्ये मोठ्या प्रमाणार अफला टॉक्सीन तयार होते. ते कुठल्याही औषधाने मारता येत नाही. त्यामुळे शंभर टक्के टॉक्सीन फ्री माल ग्राहकाला देता येत नाही ही ग्राहकांची अडचण लक्षात घेऊन जैन कंपनीने सन ड्राईंग प्रोसेसपेक्षा डीहायड्रेशनची प्रक्रिया वापरण्याला प्राधान्य दिले आहे. त्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा एक ड्रायर बसविला असून त्याची ७० टन माल रोज निर्जलीकरण करण्याची क्षमता आहे. शेतात एकात्मिक कीड नियंत्रणाची (आय.

मसाला फॅक्टरीत हळकुंडावर प्रक्रिया होतांना



पी.एम.) पद्धती वापरली तरीही रोग व कीडींचा पूर्णपणे बंदोबस्त करणे शक्य होत नाही. त्यासाठी कंपनीने जैन गॅप नावाचे तंत्रज्ञान विकसीत केले असून ते या मसाल्याच्या पदार्थांचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्याच्या थेट शेतावरच राबविण्यात येणार आहे. शेतकऱ्याला यासंबंधीचे सगळे मार्गदर्शन कंपनीचे तज्ञ लोक करणार आहेत. त्यामुळे उत्पादित होणारा माल हा उत्कृष्ट दर्जाचाच असणार आहे.

जगातील ग्राहकांचा गुणवत्ता व दर्जाबाबतचा आग्रह आणि मागणी लक्षांत घेऊन कंपनीने या गोष्टींकडे खूप बारकाईने लक्ष दिले आहे. त्यासाठी तशा प्रकारची मशिनरी युरोपातुन आणली आहे. मसाल्याच्या प्रत्येक पदार्थांसाठी वेगवेगळ्या मिल्स घेतल्या असून स्टीम स्टरलायझेशन व चिल्ड एअर ग्रॅन्डींग तंत्राचा वापर करुन आरोग्याला कोणताही अपाय नसलेले दर्जेदार मसाले बनविले जाणार आहेत. शिवाय पॅकींगसाठी अत्यंत आधुनिक अशा पद्धतीचे साहित्य वापरण्यात येणार आहे जेणेकरुन ते मसाले खराब तर होणारच नाहीत उलट त्यांचे शेल्फलाईफ वाढेल. बहुतेक मसाल्याच्या कंपन्या मसाले टिकावेत म्हणून त्यात मिठ किंवा काही केमिकल्स वापरतात. परंतु जैन कंपनीने बनविलेले हे मसाले १०० टक्के नैसर्गिक असणार आहेत. त्यात काहीही समाविष्ट केलेले नाही याची ग्वाही कंपनीने दिली आहे. मसाल्याच्या पेस्टलाही परदेशात चांगली मागणी आहे. त्यामुळे रोज २० मे. टन मसाला पेस्ट तयार करण्यात येणार आहे. मसाल्यांचे रंग टिकून राहावेत त्यासाठी कंपनीने विशेष काळजी घेऊन ब्लेंडींग सिस्टीमकडेही काटेकोरपणे लक्ष दिले आहे. ओल्या हिरव्या मिरच्या जशाच्या तशा निर्जलीकरण केल्यामुळे हिरव्या रंगाचा मसाला तयारबहोणार आहे. ग्राहकांना असा मसाला सहसा पाहायला मिळत नाही. सध्या जगभर मसाले निर्यातीच्या दृष्टीने कंपनी २५ किलोचे पॅकिंग करीत असली तरीही लवकरच भारतात हे मसाले विकण्याच्या दृष्टीने पावले टाकली जाणार आहेत आणि त्यासाठी ग्राहकांच्या मागणीचा विचार करुन छोटे-छोटे १००-२०० ग्रॅमचे पाऊचेस तयार करण्यात येणार आहेत. गेल्या महिन्याभरात कंपनीने मसाल्याचे सहा कंटेनर युरोपात निर्यात केले असून अमेरिका, युरोप, जपान व आखाती देशांमधून मसाल्याच्या पदार्थांसाठी मोठया प्रमाणावर मागणी येऊ लागली आहे. मॅकडोनल्ड कंपनी पिझ्जा, बर्गर यासाठी मोठ्या प्रमाणात जैन इरिगेशनकडून निर्जलीकरण केलेला पांढरा कांदा घेत आहे. तो पाण्यात टाकल्यावर पाच मिनीटात पूर्ववत पदावर येऊन ताजा होतो. आता मॅकडोनल्ड कंपनी मसाल्याचे पदार्थही जैन कंपनीकडून घेऊन जगभर वापरणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी कच्च्या मालाचे कितीही उत्पादन केले तरी ते अपुरेच पडणार आहे.

काळ्यामिरीचे उत्पादन प्रामुख्याने कर्नाटक (क्षेत्र ३४९९० हेक्टर व उत्पादन ३१ हजार मे.टन), केरळ (क्षेत्र ८५ हजार हेक्टर व उत्पादन २० हजार टन) आणि तामिळनाडू (क्षेत्र ४०८८ हेक्टर व उत्पादन दोन हजार टन) या तीन राज्यातच होत असून महाराष्ट्रातील कोकण व पूर्व विदर्भात हे काळ्या मिरीचे पीक घेण्यास मोठी संधी आहे. नारळ व दुसऱ्या झाडांवर वेल चढवून ते उत्पादन शेतकऱ्यांना घेता येईल. राजस्थानातील कोथिंबीरीला जे धने लागतात ते हिरव्या रंगाचे व आकाराने मोठे असतात. त्यामुळे त्यांचा दर्जा उत्तम समजला जातो. महाराष्ट्रातले शेतकरी धने शेतातच पूर्ण वाळू देतात. त्यामुळे त्यांचा रंग पिवळा होऊन खूप घाण, पाला व काड्या धन्यात येतात. मिरचीचे सर्वाधिक क्षेत्र आंध्रप्रदेशात (२ लाख हेक्टर व उत्पादन आठ लाख, ८३ हजार मे. टन) असून महाराष्ट्रातील क्षेत्र फक्त साडे सात हजार हेक्टरच्या आसपास आहे व उत्पादन ३५ हजार, ८७५ मे. टन आहे. मिरची पिकाखालील क्षेत्र उत्पादकता वाढविण्यास महाराष्ट्राला खूप संधी आहे.



जैन फळ प्रक्रिया उद्योगातील उत्पादित उत्पादने




# जल सप्ताहातील मंथन

**२२ मार्च हा आंतरराष्ट्रीय जल दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. या जलदिनानिमित्त जळगाव येथे जैन इरिगेशन सिस्टिम्स लि., गांधी रिसर्च फाऊंडेशन, भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाऊंडेशन आणि तापी विकास सिंचन महामंडळाच्या वतीने 'जलदिंडी', चित्रकला स्पर्धा, कविता वाचन, व्याख्याने, परिसंवाद, भित्तीपत्रके स्पर्धा, पाण्यावरची गाणी अशा विविध कार्यक्रमांचे २७ मार्च पर्यंत आयोजन करण्यात आले होते. या जलसप्ताहात झालेल्या विविध कार्यक्रमांचा श्री. दिनेश दिक्षीत यांनी घेतलेला हा संक्षिप्त आढावा.**

## जलसाठे लागले आटू

वर्ल्ड रिसोर्सेस इन्स्टिट्यूटने जगातील ५ लाख धरणांचा नुकताच रिमोट सेन्सींगद्वारे अभ्यास करून एक अहवाल तयार केला. त्यात भारत, मोरोक्को, इराक आणि स्पेन या चार देशांमधील जलसाठे व जलस्त्रोत मोठ्या प्रमाणावर आटत असल्याचे नमूद केले आहे. यामागे पाण्याची वाढती मागणी, गैरव्यवस्थापन आणि हवामान बदल अशी तीन प्रमुख कारणे असल्याचे अहवालात सांगण्यात आले आहे. हा अहवाल म्हणजे आता भारतातील नागरीकांसाठी मोठा इशारा असून आपण वेळीच सावध होऊन पाण्याचा काटकसरीने व अचूक वापर करायला हवा. पाणी मानवाला तयार करता येणार नाही. ती निर्सगाकडून मिळालेली देणगी आहे म्हणून ते जपून वापरणे हे आपले कर्तव्य आहे. अन्यथा पाण्यावरून जगभर संघर्ष वाढून अशांतता पसरत आहे. तशीच अवस्था आपलीही होणार आहे. भारतात या पाण्याच्या प्रश्नावरून आता मोठ्या प्रमाणावर संघर्ष सुरू झाले आहे. कावेरी नदीच्या पाण्यावरून कर्नाटक आणि तामिळनाडूचा संघर्ष १८७४ पासून चालू आहे. आता नव्याने नर्मदा नदीच्या पाण्यावरून मध्यप्रदेश आणि गुजरात मध्ये ही संघर्ष सुरू झाला आहे. नर्मदा ही देशातील सर्वात जुनी व पहिली नदी मानली जाते. तिला कुमारी नदी असेही म्हणतात. ही कुमारी पेटली तर देशातील शांतता पेटल्याशिवाय राहणार नाही. कारण पाणी आता राजकारणाच्या आर्वतात खेचले गेले आहे.

जैन उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री भवरलालजी जैन यांनी पाण्याच्या बाबत नेहमीच काटकसरीचा आणि योग्य उपयोग करण्यावर भर दिला. आयुष्यभर त्यांनी पाणी बचतीचा मंत्र सर्वांना दिला. स्वत:च्या कृतीतून त्यांनी हा विचार अंगीकारला आणि पुढच्या पिढीकडे स्वाधीनही केला. शेतात पाणी कसे वाचवता येऊ शकते हा विचार सर्वप्रथम त्यांनी मांडला. त्यामुळे शेतामधुन वाहणारे पाणी थांबले. त्याजागी शेतात ठिबक सिंचनाचा वापर करून मोठ्या प्रमाणात पाण्याची बचत होऊ लागली. पाणी बचत झाल्यामुळे साहजिकच शेतकऱ्यांच्या घरात समृद्धी नांदू लागली हा भाग वेगळा. भवरलालजी जैन यांचा पाणी बचतीचा विचार पुढे चालवण्यासाठी जैन इरिगेशन सिस्टिम्स लि. सातत्याने विविध प्रयोग आणि उपक्रम राबवित असते. त्याचाच एक भाग म्हणून २२ ते २७ मार्च दरम्यान जागतिक जलदिनानिमित्त जळगावात जलसप्ताह साजरा करण्यात आला. या सप्ताहात पाणी बचत, पाण्याचे महत्व, पाण्याचे प्राचीन संदर्भ, पाणी विषयावर चित्रकला स्पर्धा, पाणी विषय घेऊन काव्यमैफल आणि पाणी विषयावरच गाणी असा सगळा जलमहोत्सव घडवून आणण्यात आला. या महोत्सवात सर्वांनीच उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला.

२२ मार्चला सकाळी जलदींडीने सुरवात झाली. जिल्हाधिकारी किशोर राजे निंबाळकर यांनी हिरवा झेंडा दाखवून दींडीची सुरवात केली. महात्मा गांधी उद्यान ते भाऊंचे उद्यान असा दींडीचा मार्ग होता. या दींडीत विविध शाळा, महाविद्यालयातील मुले सहभागी झाली होती. दींडीत सहभागी मुलांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. पाणी बचतीचे संदेश देणारी ही मुले सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. सजविलेल्या बैलगाड्यांवर महात्मा गांधीजींचे पाणी बचतीबाबतचे विचार प्रदर्शित केलेले होते. त्यामागे असलेल्या ट्रॅक्टरवर पाण्याचा पंप चितारण्यात आला होता. पाणी बचत केली नाही तर भविष्यात पेट्रोल सारखे पाणी देखील पंपावरच मिळेल, असा अर्थपूर्ण आणि पाण्याचे गांभिर्य अधोरेखित करणारा संदेश होता. याच दिवशी संध्याकाळी भाऊंचे उद्यान येथे पाण्याच्या संदर्भातील सहकारी आनंद पाटील यांनी तयार केलेल्या पोस्टर प्रदर्शनाचे उद्घाटन संघपती दलूबाबा जैन, डॉ. गौरी राणे, डॉ. किसन पाटील, तुषार चिनावलकर यांच्याहस्ते करण्यात आले. या प्रदर्शनात पाण्याचा दुरूपयोग, पाणीबचतीचे महत्व, पाण्याबाबत संतांचे आणि भवरलालजी जैन यांचे विचार मांडण्यात आले होते. या प्रदर्शनाला सप्ताहाभरात असंख्य नागरिकांनी भेटी दिल्यात.

## पाण्याचे प्राचीन संदर्भ

आपल्या पूर्वजांनी जलव्यवस्थानाचे सोपे व कार्यक्षम मार्ग शोधले. बारवा अथवा मालगुजारी तळी काय, त्यांचे व्यवस्थापन गावपातळीवर होऊ शकत असल्याने नेत्यांना आपले वर्चस्व दाखवणे शक्य होत नाही. लोकांना जेवढे परावलंबी बनवता येईल तेवढे बनवले तरच त्यांचे महत्त्व वाढते या समजापोटी पारंपरिक जलव्यवस्थापनाचा गळा घोटला जात आहे. परंतु पुढील पिढीसाठी



जैन इरिगेशन सिस्टिम्स लि, गांधी रिसर्च फाऊंडेशन, भवरलाल ॲन्ड कांताबाई जैन फाऊंडेशन आणि तापी विकास महामंडळ आयोजित जलसप्ताहाची सुरवात कलशपुजनाने करताना जिल्हाधिकारी किशोर राजे निंबाळकर, तापी महामंडळाचे तुषार चिनावलकर यांच्यासह जैन इरिगेशनचे सहकारी.




जलदिंडीतील पालखी खांद्यावर घेऊन निघालेले जिल्हाधिकारी किशोर राजे निंबाळकर. विविध शाळांतील विद्यार्थी आणि जैन इरिगेशनचे सहकारी.

पारंपरिक जलव्यवस्थापन अबाधित ठेवण्याची जबाबदारी आपली प्रत्येकाची असल्याचे इतिहासाचे अभ्यासक भुजंगराव बोबडे यांनी सांगितले. भुजंगराव बोबडे पुढे म्हणाले, कोणत्याही देशाच्या विकासावर तिथल्या भूगोलाचा प्रभाव असतो. भारतावर प्रभाव पडला आहे तो मोसमी पावसाचा. कुलधर्म-कुलाचार, सण-समारंभ, आहार-विहार, आचार-विचार, वस्त्र-प्रावरणे यावरही त्याचा कसा प्रभाव पडला आहे याचे अनेक ग्रंथांमध्ये उल्लेख असल्याचे त्यांनी सांगितले. भारतीय संस्कृती नदीमातृक अर्थात जलकेंद्रीत होती. शेतीसाठी नदीच्या पाण्याचा उपयोग केला जाई, पण पाणी आणि नदी या गोष्टी केंद्रस्थानी असल्याने या व्यवस्थांवर कधीच ताण पडला नाही. अगदी इसवी सन पूर्व ३००० वर्षांपूर्वीच्या सिंधू संस्कृतीपासून ते इसवी सन १३०० पर्यंत (चोल राजवट) अशीच स्थिती होती. त्यामुळे दुष्काळ, पूर, पावसातील चढउतार यासारख्या समस्या आल्या तरी नदी आणि माणूस यांच्यातील नाते टिकून होते. मात्र लोकांना जेवढे परावलंबी बनवता येईल तेवढे बनवले तरच आपले महत्त्व वाढेल अशी भावना राजकीय नेत्यांमध्ये निर्माण होवू पाहत असल्याने नदी आणि माणसाचे नाते दुरावत आहे. बारवा आणि मालगुजारी तळी व त्यामागीलचे शास्त्र इतिहासजमा होण्याआधीच त्यांना पुन्हा अत्यंत कार्यक्षमतेने वापरात आणण्याची गरज आहे. मोठी धरणे असावीत की नसावीत, हा वेगळ्या चर्चेचा मुद्दा आहे, पण आधी जे अस्तित्वात आहे, त्याचे जतन करण्याची गरज असल्याचे बोबडे म्हणाले. भारतीय प्राचीन हस्तलिखित ग्रंथामध्ये जलसाठवण, जलवाटप, पर्जन्यानुमान, तडागनिर्मिती याविषयी सविस्तर विवेचन आढळते. ऋग्वेदामध्ये निसर्ग देवतांची स्तुती, प्रार्थना केलेली दिसते. पाण्यासंदर्भात जैन-बौद्ध साहित्य, कुरान, बायबल, गुरूग्रंथ साहिब प्राचीन हस्तलिखिते यातील संदर्भ त्यांनी दुर्मिळ साहित्य प्रत्यक्ष दाखवून स्पष्ट केलीत. गेली २८०० वर्षे हा प्रवास आणि अभ्यास ह्या रितीने सुरू आहे. तो ठिकठिकाणी नोंदवून ठेवलेला आहे, म्हणून आपणास तो निदान कळतोय तरी. भारतीय प्राचीन हस्तलिखित ग्रंथामध्ये जलसाठवण, जलवाटप, पर्जन्यानुमान, तडागनिर्मिती ह्या विषयी सविस्तर विवेचन आढळते. प्राचीन ग्रंथापैकी एक असलेल्या ऋग्वेदामध्ये निसर्ग देवतांची स्तुती, प्रार्थना केलेली आहे. एकुण ३४ नद्यांचे उल्लेख आहेत. सरस्वती नदीचे सर्वाधिक म्हणजे ७९ वेळा आढळतात. सिंधूचा उल्लेख २२ वेळा येतो. नद्यांचे उल्लेख असलेल्या ९९ ऋचा आहेत. तर नौकानयनासंबंधी ९० ऋचांमध्ये या सगळ्यांतून जलविषयक त्या काळात काय ज्ञान होते याचा शोध घ्यायवयाचा आहे. संत एकनाथांनी, माझी बहीण चंद्रभागा, करितसे पाप भंगा' असे सांगत नदीला बहिणीचे रुप दिले आहे. तर संत चोखामेळा चंद्रभागेच्या पाण्याने अंगअंग न्हाऊ, विठ्ठलाचे नाम घेऊ होऊनी नि:संग' असे सांगून ठेवले आहे. संत तुकडोजी महाराज आपल्या भजनात म्हणतात, सुंदर मनकर्णिका जलाने, भरली अति गोड, गमे जणू ही काशिच दुसरी, कोरियला पहाड'. जलाने भरलेली मनकर्णिका (नदी) गोड भासते, ती इतकी गोड

आहे की तिच्या भोवती काशीच असल्याचा भास होतो आहे, अशी भावना तुकडोजी महाराजांनी व्यक्त केली आहे.

## लोकसंख्या वाढ लक्षात घेऊन व्हावे नियोजन

औरंगाबादचे माहिती आयुक्त व्ही. डी. पाटील यांनी पाणी आणि शासकीय धोरण याबाबत उपयुक्त अशी माहिती दिली. ते म्हणाले, जळगाव जिल्ह्याला तापी, गिरणा, वाघुर आणि पांझरा या नद्यांची चांगली साथ लाभली आहे. तापीचे पाणी जळगाव शहरातून वाहून जाते. ते अडवता येत नाही. त्यामुळे तापीच्या पाण्याचा आपल्याला तसा फारसा उपयोग होत नाही. मात्र गिरणा वाघुर आणि पांझरा या नद्यांच्या पाण्याचा उपयोग जिल्हावासियांना होतो. गिरणावर असलेले बंधारे त्या-त्या परिसरातील शेतकरी आणि नागरिकांची तहान भागविण्यास पुरेसे आहेत. मात्र गिरणा नदीवर असलेल्या धरणात पुरेसा साठा झाल्यावरच नदीत पाणी येते. अशावेळी भविष्यातील लोकसंख्यावाढ लक्षात घेऊन पाण्याचे नियोजन केले गेले पाहिजे अशी भूमिका त्यांनी मांडली. यावेळी व्ही. एस. जवंजाळ यांनी पाणी निर्मितीची रचना सांगितली. जमिनीखाली असलेल्या बेसॉल्ट खडकाच्या संदर्भातील मनोरंजक माहिती दिली. तर डॉ. हेमंत पाटील यांनी केलेल्या पाणी बचतीच्या प्रयोगांची माहिती दिली. लोकसहभागातून प्रयत्न केल्यास पाण्याची निश्चितपणे बचत होऊ शकते असे त्यांनी प्रयोगातून सिद्ध केल्याचे यावेळी सांगितले. वर्धमान भंडारी यांनी देखील त्यांच्या मित्रमंडळींच्या सहकार्याने विविध गावांत पाणी बचतीसाठी केलेल्या कामांची माहिती सादर केली. लामकानीचे डॉ. धनंजय नेवाडकर यांनी पाणी वाचवण्यासाठी जमिन वाचवली पाहिजे, या गोष्टींवर भर दिला. ते म्हणाली, पावसाच्या पाण्याबरोबर माती वाहून जाते त्यामुळे नद्या, तलाव गाळाने भरतात आणि पाणसाठे कोरडे पडण्याचे प्रमाण वाढते. हे थांबवायचे असेल तर माती अडवा हे धोरण आधी राबविले गेले पाहिजे असे त्यांनी ठामपणे सांगितले.

## पाणी आरोग्यासाठीही उपयोगी

आपण दिवसभरात किती पाणी पितो, किती प्यायला हवे, कसे प्यायला हवे याबाबत नेहमीच प्रत्येकाच्या मनात काही ना काही संभ्रम असतो. हा दूर करण्यासाठी जलसप्ताहात तज्ज्ञ डॉक्टरांनी निमित्रित करण्यात आले होते. पाणी आणि आरोग्य या चर्चासत्रात मोठी रंगत आली. दिवसभरातून किती पाणी प्यायला हवे. पाणी पिण्याची योग्य पद्धत कोणती. कोणते पाणी प्यायला पाहिजे या सर्व प्रश्नांची उत्तर डॉ. दीपक पाटील यांनी दिली. ते म्हणाले, सर्वच प्राणीमात्रांच्या जीवनात पाणी अत्यंत महत्त्वाचे आहे. ६५ किलो वजन असलेल्या पुरूषात ६० टक्के पाणी म्हणजेच ते जवळ-जवळ ४० लीटर असते. तर स्त्रियांच्या शरिरामध्ये हेच १० टक्क्यांनी कमी असते. पाणी आणि आरोग्य यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. सकाळी उठल्याबरोबर तोंड न धुता पाणी पिणे केव्हाही योग्य. त्याबरोबरच दिवसभरात साधारणपणे ८ ते ९ ग्लास पाणी प्यायला हवे. जेवणाच्या ४० मिनिटे आधी आणि जेवणाच्या ४० मिनिटे नंतर पाणी पिणे योग्य असल्याचे ते म्हणाले.

## कोणते पाणी शुद्ध

आपल्या घरात पाणी नळाव्दारे, जारव्दारे, बाटलीव्दारे पाणी येत असते. हे पाणी शुद्ध असते का? याबाबत मात्र आपल्याला योग्य उत्तर सापडत नाही. शुद्ध पाणी कोणते असते, पाणी शुद्ध कसे करावे या सारख्या अनेक प्रश्नांची उत्तरे चर्चासत्रातून मिळाली. पाण्याचे महत्व सांगताना जैन इरिगेशन सिस्टिम्सचे सहकारी श्रीपाद जोशी म्हणाले की, पिण्याच्या पाण्याचे कोणतेही तंत्रज्ञान सुरक्षित नाही. आरओ सारख्या तंत्रज्ञानातून शरीरोपयोगी घटक लोप पावतात. यातून गंभीर आजार होवु शकतात. त्यामुळे पाणी शुद्धीकरण्याचे गुणवत्तापूर्ण तंत्रज्ञान वापरायला हवे. सदृढ आरोग्यासाठी पाण्याची गुणवत्ता महत्त्वाची आहे. यासोबत जोशी यांनी बाजारातील शुद्ध पेयजल संयंत्राची निवड कशी करावी यावर मार्गदर्शन केले. अभिषेक निरखे यांनी सांगितले की, पेयजल शुद्धीकरण काळाची गरज असून पिण्यायोग्य पाणी कसं शुद्ध करता येईल यासाठी अचुक तंत्रज्ञाची निवड करायला हवी असे सांगितले. यासाठी बाजारातील तंत्रज्ञानाची कशी सांगड घालावी याबाबतही निरखे यांनी मार्गदर्शन केले. तसेच भारतातील पाण्याविषयी मानके सांगितले. गर्भवती स्त्रियांनी शक्यतो आरओचे पाणी पिऊ नये असे सांगत पाण्याच्या गुणवत्तेबाबत मार्गदर्शन केले.

## चित्रकलेतून मुलांनी सुचवले पाणी बचतीचे उपाय

पाणी या विषयावर जलसप्ताह दरम्यान चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत जिल्हाभरातील शाळांमधील १८५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेत सहभागी असलेल्या मुलांनी



चित्रकला स्पर्धेत पारितोषिक मिळविलेले विद्यार्थी



बहिणाबाईंची कविता सादर करताना अनुभूती स्कुलच्या संचालिका निशा जैन, डॉ. संगीता म्हसकर, सौ. मनिषा किनगे, डॉ. किसन पाटील, ज्ञानेश्वर शेंडे.

पाणी बचतीचे अनेक उपाय चित्रांच्या माध्यमातून सुचवले. पाणी नसेल तर कशी गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते, पाणी वाचवण्यासाठी काय करायला हवे याच बरोबर दैनंदिन वापरात आपण पाणी कसे वाया घालवतो याबद्दलचे चित्र मुलांनी साकारले. स्पर्धेतून पाणी बचतीबाबत भावी पिढी किती संवेदनशील आहे याबाबतचा संदेश मुलांकडून दिला गेला. या स्पर्धेत नर्सरी ते ४ थी या गटात विद्या इंग्लिश मीडियम स्कूलची ३ री इयत्तामधील निकीता देवराज पाटील हिचा प्रथम क्रमांक आला. पोद्दार इंटरनॅशनल स्कूलचा तिसरीतील विद्यार्थी अभिनव अ. पाटील व्दितीय, तृतीय केतकी युवराज महाजन (विद्या इंग्लिश मीडियम स्कूल), या गटात उत्तेजनार्थ पारितोषीक संकेत रवींद्र वाघ (भगिरथ इंग्लिश मीडीयम स्कूल), अनुष्का प्रल्हाद पाटील (विद्या इंग्लिश मीडियम स्कूल), सफा बानो अशपाक हुंगोरा (सेंट लॉरेन्स हायस्कूल) हे विजेते झालेत. ५ वी ते १० वी या दुसऱ्या गटात किशोर ज्ञानेश्वर सुरवाडे प्रथम, कु. रोशनी लालचंद सोनवणे व्दितीय (दोघे भगिरथ इंग्लिश मीडियम स्कूल), तृतीय कु. कांचन राजेश बडगुजर (अहिल्यादेवी कन्या विद्यालय, भुसावळ), उत्तेजनार्थ हर्षदा संतोष पाटील (विद्या इंग्लिश मीडियम स्कूल), चंदन भोजवानी (सेंट टेरेसा हायस्कूल), खुशी भगवान पाटील (अनुभूती इंग्लिश मीडियम स्कूल), प्रणित पुंडलिक साळुंखे (बारी समाज माध्य. विद्यालय,शिरसोली), खुशाल एस. हटकर (अनुभूती इंग्लिश मीडियम स्कूल), अझीझी झैनाब इफ्तेकार (सेंट टेरेसा) यांना गौरविण्यात आले. तर खुला गटामध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषीक पाचोरा येथील एसएसएमएम कॉलेजचा विद्यार्थी वैभव नामदेव शिंपी याने पटकाविले. व्दितीय ओजस्वीनी कॉलेजचा अजय रवींद्र पाटील, तृतीय पीयूष प्रशांत बडगुजर (ओजस्वीनी कॉलेज) तर उत्तेजनार्थ म्हणून अमृता दीपक वाणी (ओजस्वीनी), कला शिक्षक तुषार दिनकराव चौधरी (भगिरथ इंग्लिश मीडियम स्कूल) यांनी क्रमांक मिळविला.

## पाण्याची गाणी अन कविताही

मानवी जीवनात पाण्याचे महत्व खुप आहे. पाणी विविध रुपाने मानवाला नेहमीच भुरळ घालत आलेलं आहे. पाण्यावर असंख्य कविता आणि गाणीही रचली गेली आहेत. जलसप्ताहात पाण्यावरची गाणी हा विशेष कार्यक्रम सादर करण्यात आला. स्वरवेध फाऊंडेशनच्या भागवत पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हे सादरीकरण केले. त्यांनी पाण्यावरील हिंदी, मराठी गीतांचे सादरीकरण केले. तर काव्यवाचनात उपस्थितांनी मराठी साहित्यिकांच्या उत्कृष्ट रचना सादर केल्या. बहिणाबाईंची आला पहीला पाऊस, शिपडली भुई सारी, धरत्रीला परमय, माझं मन गेलं भरी’ या कविता अनुभूती स्कुलच्या संचालिका निशा जैन यांनी सादर केल्या. प्राचार्य डॉ. किसन पाटील यांनी लोकसाहित्यातील जलतत्व यावर मनोगत व्यक्त करून कवितेचेही सादरीकरण केले. ज्ञानेश्वर शेंडे यांनी विद्याधर करंदीकर यांची किनारा घननीळ सागराचा घननाद, येत कानी घुमती, दिशादिशांत, लहरींमधील गाणी’ व बा. भ. बोरकर यांची माझ्या गोव्याच्या भूमीत, लाल माती, निळे पाणी खोल, आरक्त घावांत, शुद्ध वेदनांची गाणी’ या कविता सादर केल्यात. श्रीपाद जोशी यांनी शांता शेळकेंची पावसाच्या धारा येती झरझरा झाकळले नभ, वाहे सोसाट्याचा वारा, रस्त्याने ओहोळ जाती खळखळ, जागजागीं खाचांमध्ये तुडुंबले जळ’ व ना. धों. महानोर यांची पाणी, पाणी, पाणी, पाण्याविना दाही दिशा, आम्ही अनवाणी या कविता सादर केल्या. तर विनया जोशी यांनी वैभव कीर्तनकार यांची पाणी आहे जोपर्यंत, जीवन आहे तोपर्यंत एकच आधार आहे जगण्याचा, तो थेंब केवळ पावसाचा’ व अभय देशपांडे यांची ये रे ये रे पावसा, म्हणून लहानपणी, घातलेली साद आठवते का तुला, तेव्हापण होती तुला पैशाचं लालुच, रागही होता खोटाचा..’ व विशाल म्हसके यांची आला दुष्काळ हा वैरी जिनं केलं या हराम कधी मिळेल हो सांगा या यातनांना विराम..’ या कवितांना रसिकांनी दाद दिली. दीपक चांदोरकर यांनी उस्मान बेग यांची पाणी विषयावरील दीर्घ कविता सादर केली. दीपिका चांदोरकर यांनीही कविता सादर केलीत. नामदेव बडगुजर यांनीही कविता सादर केली.

## कलावंताचाही सहभाग

या जलसप्ताहात पाण्याच्या संदर्भातील सर्वांगिण विचार केला गेला. पाणी आणि आरोग्य, पाणी आणि पर्यावरण, पाणी आणि चित्र याबरोबरच पाण्याच्या संदर्भातील कलाकृती असे देखील सादरीकरण करण्यात आले. या सादरीकरणात विविध कलावंतांनी सहभाग नोंदवला. चोपड्याचे पंकज नागपुरे, सुनील नागपूरे यांनी अक्षरलेखन केले, पाण्यावरील शिल्प निरंजन शेलार यांनी साकारले, मिलिंद विचारे यांनी पाणी बचतीचे महत्व सांगणारे पोस्टर रंगवले तर नशिराबादच्या शाम कुमावत यांनी लाईन आर्टव्दारा सादरीकरण केले.

## ग्रॅफिटी



# अरे खोप्यामधी खोपा

अरे खोप्यामधी खोपा
सुगरणीचा चांगला
देखा पिल्लासाठी तिनं
झोका झाडाले टांगला

पिल्लं निजली खोप्यात
जसा झुलता बंगला
तिचा पिलामधी जीव
जीव झाडाले टांगला

सुगरीण सुगरीण
अशी माझी रे चतुर
तिले जल्माचा सांगती मिये
गण्या गंप्या नर

खोपा इनला इनला
जसा गिलक्याचा कोसा
पाखराची कारागिरी
जरा देख रे माणसा

तिची उलूशीच चोच
तेच दात, तेच ओठ
तुले दिले रे देवानं
दोन हात, दहा बोटं

– बहिणाबाई

# पाण्याविना जगणे कठीण रे।

थेंब थेंब वाचवूया,
पाण्याचे मोल जाणूया,
पाण्याविना जगणे कठीण रे।
जीवापाड जपू त्यास,
नको नको मुळीच ऱ्हास,
निर्मिकाची अनमोल देण रे।।
पाण्याविना जगणे कठीण रे।
जीव–जगताचे मुळ पाणी आहे,
सृष्टीवरच्या जीवांची ते निशाणी आहे,
पाणी आस आहे,
पाणी श्वास आहे,
त्रिकाल सत्य हे वचन रे।
पाण्याविना जगणे कठीण रे।।

पाण्यापुढे आहे फिकी अमृताची गोडी,
कटीबद्ध होऊन थांबवू पाण्याची नासाडी,
पाणी ध्यास आहे..
पाणी खास आहे...
ही गुज एक मनी नितांत जाण रे।
पाण्याविना जगणे कठीण रे।

**– नामदेव बडगुजर**

# अभ्यासदौरा व प्रशिक्षण

आमच्या जैन कृषी संशोधन, विकास आणि प्रात्यक्षिक केंद्र व जैन उच्च कृषी तंत्रज्ञान प्रशिक्षण संस्थेस जग व देशातील विविध शेतकरी, शास्त्रज्ञ, कृषी अधिकारी, बँक अधिकारी, स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी, संशोधन संस्था यांनी केलेला अभ्यासदौरा व झालेल्या प्रशिक्षणाची छायाचित्रे



राजस्थान राज्यातील, बुंदी जिल्ह्यातील शेतकरी वर्ग




वाल्मी भोपाळ, मध्यप्रदेश राज्यातील प्रशिक्षणार्थी



जळगाव जिल्ह्यातील नाबार्डचे अधिकारी वर्ग

आम्ही नाबार्डमधील काही अधिकारी जैन हिल्सवर भेट देण्यासाठी आलो. इथले काम पाहून अतिशय अचंबित झालो. पद्मश्री भवरलाल जैन यांचे अथक परिश्रम हे या विकासासाठी कारणीभूत आहेत यासाठी शब्द अपुर्ण पडतील.

जी.एम.सोमवंशी
व सहकारी



मध्यप्रदेश राज्यातील, धार तालुक्यातील कृषि विभागांतर्गत उपस्थित शेतकरी

या ठिकाणी श्री. भवरलाल जैन यांची दूरदृष्टी आणि निर्मिती ही अप्रतिम आहे हे दिसून येते. त्यांचे जीवन शेतकरी व समाजाकरीत समर्पित होते. येथे वापर विज ही सौरऊर्जेद्वारे बनविली जाते. नैसर्गिक साधनसंपतीचा येथे पुर्णपणे उपयोग येथे केला जातो.

एस.जे. कुंभार
सोलापूर



सिद्धेश्वर साखर कारखान्याचे व्यवस्थापकीय संचालकांचा अभ्यास दौरा



हॉर्टिकल्चर विभागातंर्गत, जिल्हा अनंतपूर, आंध्रप्रदेशातील शेतकरी



शेतकरी प्रशिक्षण योजनेतंर्गत नंदुरबार जिल्ह्यातील शेतकरी वर्ग



नाबार्ड अंतर्गत शेतकरी शैक्षणिक धोरणांतर्गत उत्तरप्रदेशातील शेतकरी

# वर्गणी भरणेबाबत आवाहन

जैन इरिगेशनच्यावतीने फेब्रुवारी २०१७ पासून 'कृषिजल' हे मासिक सुरू करण्यात आल्याचे आपणा सर्वांना माहितीच आहे. गेले वर्षभर आम्ही हे मासिक कोणतीही वर्गणी न घेता आपल्याला भेट म्हणून पाठवित होतो. आता भारत सरकारच्या रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स यांनी आम्हांला 'कृषितीर्थ' हे नाव मासिकासाठी अधिकृतपणे दिले आहे. त्यामुळे यापुढे मासिकाचे नाव 'कृषिजल' ऐवजी कृषितीर्थ हे राहील याची आपण नोंद घ्यावी.

शेती, पाणी व तत्सम शेतीपूरक उद्योगांसंबंधीचे सर्व अद्ययावत ज्ञान व तंत्रज्ञान या मासिकाच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत व शेतीशी संबंधित असणाऱ्या सर्व घटकांपर्यंत पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे. जून २०१८ पासून सुरू होणाऱ्या 'कृषितीर्थ' मासिकाची वार्षिक वर्गणी १००/– रूपये असून ती आपण धनादेश वा डी.डी. द्वारा **'जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.–कृषितीर्थ'** या नावाने भरू शकता. तसेच कंपनीचे जे अधिकृत वितरक (डिलर) आहेत त्यांच्या दुकानात जाऊनही भरू शकता. प्रत्येक जिल्ह्यात कंपनीची कार्यालये ही आहेत. तिथे जाऊन आपण मासिकासाठी नाव नोंदणी करू शकता.

आपण मासिकाची वर्गणी त्वरीत भरून सभासद व्हावे ही नम्र विनंती. वर्गणी भरणाऱ्यांना दर महिन्याचे मासिक पोस्टाने घरपोच मिळेल. त्यासाठी संपूर्ण पत्ता आमच्याकडे पाठवावा आणि वर्गणीची पावती जपून ठेवावी.

कळावे,

लोभ आहेच. तो वृद्धींगत व्हावा हीच अपेक्षा.

आपला नम्र

ता.क. वार्षिक वर्गणीचा शंभर रूपये रकमेचा धनादेश / डी.डी.
**'जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.–कृषितीर्थ'** या नावाने काढावा.

**पत्रव्यवहाराचा पत्ता:** **'कृषितीर्थ मासिक'** जैन प्लास्टीक पार्क, रा.म. क्र.६, पो.बॉ. ७२,
जळगांव – ४२५००१. महाराष्ट्र. दुरध्वनी: ०२५७–२२५८०११

मी ______________________________

संपूर्ण पत्ता ______________________________

मोबाईल क्र. ____________

आपल्या कृषितीर्थ मासिकाची दि. ........................ पासून .................................. पर्यंतची वार्षिक वर्गणी १००/– रूपये पाठवित आहे.

कृपया मला वरील पत्त्यावर पोस्टाने दर महिन्याला मासिक पाठवावे ही विनंती.




जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.
कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.®

'**कृषिजल**' हे मासिक प्रकाशन, मुद्रक, मालक **श्री. अतुल जैन** यांनी जैन इरिगेशन सिस्टिम्स् लिमिटेडसाठी, स्पेन्टा मल्टीमिडीया, पेनीसुला स्पेन्टा, मथुरादास मिल कम्पाऊन्ड, एन.एम.जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई (महाराष्ट्र) येथे छापून जैन इरिगेशन सिस्टिम्स् लिमिटेड, जैन प्लास्टिक पार्क, पो. बॉ. नं. ७२, जळगाव-४२५००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक:** डॉ. सुधीर जगन्नाथ भोंगळे **मुखपृष्ठ:** मिलींद पाटील, **कला:** इकबाल मन्सुरी, योगेश पाटील, **अक्षर जुळवणी:** नामदेव बडगुजर, गिरीश बोरगांवकर **छायाचित्रे:** योगेश सोनार **दूरध्वनी:** ०२५७-२२५८०११/२२ **फॅक्स:** ०२५७-२२५८१११/२२ **ई मेल** : krushijal@jains.com **संकेतस्थळ** : www. jains.com, वर्ष: २ अंक: ३ (मार्च २०१८/ फक्त खासगी वितरणासाठी)